• पुणे, रविवार, २ जून २०२४ • RASHTRA SANCHAR-Vol-3-issue 176 • वर्ष ३ रे, अंक १७६ • किंमत ₹ ६ • पाने : १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com BEYOND THE NEWS



## एक्झिट पोलने केले चित्र स्पष्ट

# मतदारांचा कौल पुन्हा मोदींनाच !


■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** लोकसभेच्या सातही टप्प्यांसाठी शनिवारी मतदान पूर्ण झाल्यानंतर जाहीर झालेल्या एक्झिट पोलनुसार, पुन्हा एकदा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भाजप सरकार केंद्रात सरकार स्थापन करेल, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. सर्वच माध्यमांनी रालोआला बहुमत दिले आहे. दि. ४ जून रोजी कोणाचे सरकार स्थापन होईल, हे निकाल जाहीर झाल्यानंतर स्पष्ट होणारच आहे. मात्र, त्याआधीच एक्झिट पोलचे आलेले निकाल भाजपला दिलासा देणारे आहेत. सर्व वाहिन्यांच्या एक्झिट पोलनुसार मोदी सरकार पुन्हा येणार असले, तरी रालोआ ४०० पार करेल, अशी शक्यता कोणीही वर्तवली नाही.


भाजपने २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत अपेक्षेपेक्षा चांगली कामगिरी करत, ३०३ जागांवर विजय मिळवला होता, त्यावेळी काँग्रेसला केवळ ५२ जागा मिळाल्या होत्या. वायआरएससीपी आणि द्रमुक यांना प्रत्येकी २३ जागा तर तृणमूल काँग्रेसला सर्वाधिक २२ जागा मिळाल्या होत्या. शिवसेना १८, जेडीयू १६, समाजवादी पक्ष ५ आणि बसपाने १० जागांवर विजय मिळवला होता. बहुतेक एक्झिट पोलमध्ये, रालोआला ३७० जागा मिळण्याची अपेक्षा आहे, तर विरोधकांच्या इंडिया आघाडीला १२५ ते १५० जागा मिळू शकतात. महाराष्ट्राबाबत सर्वच वाहिन्यांच्या अंदाज वेगवेगळे असून, महायुती आणि मविआ यांना किती जागा मिळणार, यांचे अंदाज वेगवेगळे आहेत.

दरम्यान, शनिवारी सकाळी काँग्रेसने एक्झिट पोलवरील वाहिन्यांच्या चर्चेत सहभागी न होण्याचा निर्णय जाहीर केला. भाजपने या विरोधात टीका करत, काँग्रेसला पराभवाची चाहूल लागल्यानेच, चर्चेपासून पळ काढत » पान ४ वर



> पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखाली लोकसभा निवडणुकीत मतदार भाजपला ३७० हून अधिक, तर रालोआला ४०० हून अधिक जागा जिंकून देतील, असा पूर्ण विश्वास आहे. जनतेने सक्षम, विकसित, स्वावलंबी भारतासाठी आणि तुष्टीकरण, घराणेशाही व भ्रष्टाचार यांच्या विरोधात मतदान केले आहे.
>
> — जे. पी. नड्डा भाजप पक्षाध्यक्ष




## सातव्या टप्प्यातील मतदान सरासरी ५८.३४ टक्के

■ राष्ट्रसंचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** लोकसभा निवडणूक-२०२४ च्या सातव्या आणि अंतिम टप्प्यातील मतदान पूर्ण झाले आहे. काल म्हणजेच १ जून रोजी ७ राज्ये आणि १ केंद्रशासित प्रदेशातील ५७ जागांवर मतदान झाले. निवडणूक आयोगाच्या व्होटर टर्नआउट अॅपनुसार संध्याकाळी ५ वाजेपर्यंत ५८.३४ टक्के मतदान झाले आहे. सर्वाधिक ६९.८९% मतदान पश्चिम बंगालमध्ये झाले आणि सर्वात कमी ४८.४६% मतदान बिहारमध्ये झाले. याशिवाय ओडिशातील विधानसभा निवडणुकीसाठी ६२.४६% मतदान झाले. ४ राज्यांतील विधानसभेच्या ९ जागांवरही पोटनिवडणुकीसाठी मतदान झाले.

बलिया येथे मतदानासाठी आलेल्या एका वृद्धाचा मतदान केंद्रावर मृत्यू झाला. उष्णतेमुळे वृद्धाचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांचे म्हणणे आहे. सातव्या टप्प्यातही पश्चिम बंगालमधून हिंसाचार झाल्याच्या बातम्या आल्या आहेत. पश्चिम बंगालच्या भांगरमध्ये सीपीआय(एम) आणि आयएसएफ कार्यकर्त्यांनी टीएमसी समर्थकांवर बॉम्ब हल्ल्याचा आरोप केला आहे.

राज्याच्या मुख्य निवडणूक कार्यालयाने ट्विट केले की जमावाने जयनगरमधील बेनिमाधवपूर शाळेजवळ सेक्टर ऑफिसरचे राखीव ईव्हीएम आणि कागदपत्रे लुटली. निवडणूक आयोगाने दिलेल्या माहितीनुसार, सातव्या टप्प्यात ९०४ उमेदवार निवडणूक लढवत आहेत. त्यापैकी ८०९ पुरुष आणि ९५ महिला उमेदवार आहेत.या टप्प्यातील सर्वात श्रीमंत उमेदवार हरसिमरत कौर बादल या पंजाबमधील भटिंडा येथील उमेदवार आहेत. त्यांच्याकडे १९८ कोटी रुपयांची संपत्ती आहे.लोकसभेच्या ५४२ जागांपैकी सहाव्या टप्प्यापर्यंत ४८५ जागांवर मतदान झाले आहे. शेवटच्या ५७ जागांसाठी काल १ जून रोजी मतदान झाले आहे.

### पोलिस पाटलाच्या अल्पवयीन मुलीकडून अपघात एक ठार

# शिरुर तालुक्यात घडला खळबळजनक पोर्शे पॅटर्न

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**शिक्रापूर :** पुणे जिल्ह्यातील हिट अँड रण प्रकरणात एका बड्या बांधकाम व्यावसायिकाच्या मुलाने दारुच्या नशेत आलिशान पोर्शे कार चालवून दोघांना उडवल्याची घटना देशभरात गाजत असताना नुकतेच शिरुर तालुक्यात या पोर्शे पॅटर्नचीचे पुनरावृत्ती झाली असुन एका पोलिस पाटलाच्या अल्पवयीन मुलीने मालवाहू पिकअप चालविताना दुचाकीला धडक दिल्याने एका युवकाचा जागीच मृत्यू होऊन एक




तरुण गंभीर जखमी झाला असल्याने शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे पोलीस पाटलासह त्याच्या अल्पवयीन मुलीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आरणगाव ता. शिरुर येथील वडगाव बांडे रस्त्याने अरुण मेमाणे व मच्छिंद्र बांडे हे दोघे त्यांच्या जवळील एम एच १२ व्ही आर २०७२ या दुचाकीहून चाललेले असताना अचानक आरणगावचे पोलीस पाटील संतोष लेंडे यांची एम एच १२ एस एफ ३४३९ हि पिकअप पोलीस पाटील यांची अल्पवयीन मुलगी चालवत असताना अचानकपणे पिकअपची मेमाणे यांच्या दुचाकीला धडक बसली दरम्यान पिकअपने दुचाकीसह दोघांना काही अंतर फरपटत नेले यावेळी पोलीस पाटील संतोष लेंडे देखील त्यांच्या अल्पवयीन युवती शेजारी बसलेले होते मात्र अपघात होताच शेजारील नागरिकांनी दुचाकीवरील दोघांना शिरुर येथील रुग्णालयात उपचारासाठी हलवले मात्र » पान ४ वर

## शनिवार वाड्यावर आढळली बेवारस बॅग

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** प्रसिद्ध शनिवार वाड्यात बेवारस बॅग आढळल्याने एकच खळबळ माजली. शनिवारवाड्यात बेवारस बॅग असल्याचा एक कॉल आला आणि पुळे पोलिसांनी तत्काळ तिथे धाव घेतली. पर्यटकांनी गजबजलेला शनिवार वाडा काही क्षणात रिकामा करण्यात आला. ट्रेन केलेल्या श्वानांना घेऊन बॉम्बशोधक पथकही शनिवार वाड्यात दाखल झाले असून शोधमोहिम सुरू आहे. प्राथमिक माहितीनुसार, आज ( शनिवार) सकाळी साडेनऊच्या सुमारास कंट्रोल रूमला एक फोन आला. शनिवार वाड्यासमोर एक बेवारस बॅग आढळली असे फोनवरील व्यक्तीने सांगितले. ही माहिती कळताच पुणे पोलिस तसेच बॉम्ब शोधक व नाशक पथकाने तातडीने तेथे धाव घेतली. » पान ४ वर

# पुण्यात कर्वे रोडवरील अपघातात एक ठार

■ राष्ट्रसंचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुण्यातील कर्वे रोड परिसरात क्रेनने चिरडल्याने एका वृद्ध व्यक्तीचा मृत्यू झाला. ही घटना आज सकाळी १० वाजताच्या सुमारास घडली. याप्रकरणी क्रेन चालकाला पोलिसांनी अटक केली असून पुढील चौकशीला सुरुवात केली आहे. मात्र, या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली आहे. देवळी (वय,६६) असे क्रेनखाली चिरडून मृत्यू झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. देवळी हे मजूर असून कोथरूड येथील रहिवासी आहेत. मयत आज सकाळी सायकलवरून कामावर जाताना कर्वे रोडवरील सोनल हॉलजवळ क्रेनने त्यांना चिरडले.

या अपघातात देवळी यांचा जागीच मृत्यू झाला, अशी माहिती डेक्कन पोलिसांनी दिली. याप्रकरणी क्रेन चालक सलीम अली याला पोलिसांनी अटक केली असून पुढील तपासाला सुरुवात केली. डेक्कन पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक विपिन हसबनीस यांनी दिलेल्या माहितीनुसार, "सकाळी कर्वे रोडवरील सोनल हॉलजवळ हा अपघात झाला. सकाळी दहाच्या सुमारास देवळी क्रेनच्या मागून जात होते. क्रेन चालक सलीम अली क्रेनच्या पाठीमागे देवळी असल्याचे दिसले नाही. त्यामुळे देवळी क्रेन खाली चिरडले गेले. या अपघातात देवळी यांचा जागीच मृत्यू झाला. याप्रकरणी सलीम विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मृताचा वैद्यकीय अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कारवाईला सुरुवात केली जाईल. कर्वे रोडवर फूटपाथ आणि सायकल मार्गाचे बांधकाम सुरू आहे. यामुळे रहदारीसाठी रस्ता अरुंद झाला आहे.

# 'पोर्शे' प्रकरणात कोणतीही लपवाछपवी नाही : अजित पवार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पोर्श कार अपघात प्रकरणात राज्य सरकार आणि पोलीस योग्यप्रकारे कारवाई करत आहेत. याप्रकरणात कोणतीही लपवाछपवी किंवा कोणालाही पाठीशी घालण्याचा प्रकार होतोय, असे अजिबात नाही असे उपमुख्यमंत्री आणि पालकमंत्री अजित पवार यांनी पत्रकारांशी बोलताना स्पष्ट केले.

विरोधकांकडून होणाऱ्या आरोपासंदर्भात उपमुख्यमंत्री पवार म्हणाले, विरोधक याप्रकरणात काय आरोप करतायत, हा त्यांचा अधिकार आहे. पण ही घटना घडल्यापासून आजपर्यंत चौकशीत जे जे दोषी आहेत, त्यांच्यावर कारवाई होत आहे. अपघात प्रकरणाची माहिती मिळाली



तेव्हाच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पुण्याचा पालकमंत्री म्हणून मी, आम्ही चौकशीचे आदेश दिले. चौकशी जसजशी पुढे सरकत गेली याप्रकरणात अनेकांचा सहभाग दिसून आला. सुरुवातीच्या काळात अल्पवयीन मुलाला जामीन मिळाला. हा जामीन न्यायालयाने दिला होता, त्यामध्ये सरकारची कोणतीही भूमिका नव्हती. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी याप्रकरणात लक्ष घातले तेव्हा अल्पवयीन मुलाविरोधात आणखी कलमं लावण्यात आली. चौकशीत दोन पोलीस अधिकाऱ्यांनी दिरंगाई केल्याचे समोर आले. त्यांच्यावरही कारवाई झाली. या प्रकरणात ससून रुग्णालयातील डॉक्टरही दोषी आढळले, त्यांच्यावरही कारवाई करण्यात आली'. » पान ४ वर

## प्रोजेक्ट मॅनेजर अँटी करप्शनच्या जाळ्यात

■ राष्ट्रसंचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** म्हाडा तर्फे लॉटरी पद्धतीने मिळालेली सदनिका पुन्हा वितरित करुन आरटीजीएस चलन काढून देण्यासासाठी म्हाडा कार्यालयातील कंत्राटी प्रोजेक्ट मॅनेजर याला दोन लाख ७० हजार रुपयांची लाच स्वीकारताना पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा रचून रंगेहाथ पकडले. ही कारवाई शुक्रवारी (दि.३१) सायंकाळी साधु वासवानी चौकातील परमार चेंबर येथील स्टेटस फॅमिली रेस्टॉरंट अँड बारमध्ये करण्यात आली. अभिजीत व्यंकटराव जिचकार (वय-34 रा. वाकड) असे लाचखोर अधिकाऱ्याचे नाव आहे.

याबाबत ६० वर्षीय व्यक्तीने पुणे एसीबी कार्यालयात तक्रार दिली आहे. तक्रारदार यांना म्हाडा तर्फे लॉटरी पद्धतीने घर मिळाले होते. » पान ४ वर

# रक्ताचे नमुने बदलले; अल्पवयीन मुलांची ओळख झाली उघड

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** कल्याणीनगर अपघात प्रकरणात आरोपी असलेल्या १७ वर्षीय तरुणाच्या रक्त तपासणी अहवालात फेरफार केल्याप्रकरणी दोन डॉक्टर आणि एका शिपायाला अटक करण्यात आली आहे. पुणे गुन्हे शाखेने ससून हॉस्पिटलचे डॉ. अजय तावरे आणि डॉ. श्रीहरी हळनोर यांना अटक केली आहे.



पुण्यातील पोर्शे कार अपघात प्रकरणी रोज नवनवीन खुलासे होत आहेत. ससुनच्या डॉक्टरांनी सीसीटीव्ही नसलेल्या ठिकाणी अल्पवयीन आरोपीच्या रक्ताचे नमुने घेतल्याचे पुढे आले आहे.

या पूर्वी डॉक्टरांनी अल्पवयीन आरोपीचे रक्त नमुने बदलून त्याच्या आईच्या रक्ताचे नमुने घेतल्याचे देखील वृत्त होते. मात्र, पोलिसांनी याबाबत अधिकृतपणे काहीही सांगितलेले नाही.

दरम्यान, कारमध्ये असलेल्या आरोपीच्या दोन मित्रांच्या रक्ताचे नमुनेही विशाल अगरवालने बदलले असल्याची माहिती पुढे आली आहे. ज्यावेळी ससूनमध्ये रक्ताचे नमुने घेऊन फेरफार करण्यात आले त्यावेळी फक्त अल्पवयीन आरोपीच नाही तर आणखी दोघा अल्पवयीन मुलांच्या रक्ताचे नमुने घेण्यात आले होते. जे कोझी आणि ब्लॅक बारमध्ये पार्टीसाठी गेले होते.

तसेच, अपघातावेळी हे दोघेही अल्पवयीन आरोपीसह कारमध्ये होते. त्यांचेही रक्ताचे नमुने घेण्यात आले होते आणि अल्पवयीन आरोपीप्रमाणे त्यांच्या रक्ताचे नमुने फेकून देऊन ते देखील बदलण्यात आले आहेत.

अल्पवयीन मुलाच्या रक्ताचा नमुना त्याच्या आईच्या रक्ताशी बदलला गेला. तर इतर दोन अल्पवयीन मुलांच्या रक्ताचे नमुने त्यांच्या नातेवाईकांसोबत बदलले गेले. » पान ४ वर

# संपूर्ण अग्रवाल कुटुंबाला अटक




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** रक्ताच्या नमुन्यातील फेरफार प्रकरणी शिवानी अग्रवाल हिला ताब्यात घेण्यात आले आहे. कल्याणीनगर अपघात प्रकरणी अल्पवयीन आरोपीची आई शिवानी अग्रवाल हिला देखील अटक करण्यात आली आहे. गुन्हे शाखेने ही कारवाई केली आहे. अग्रवाल यांची चौकशी केली जाणार आहेत. त्यामुळे याप्रकरणी नवी काही माहिती समोर येण्याची शक्यता आहे.

अल्पवयीन आरोपीच्या रक्त नमुन्यामध्ये फेरफार केल्याचा आरोप पोलिसांनी केला आहे. याप्रकरणी आरोपीच्या आईने रक्त दिल्याचा संशय पोलिसांना आहे. त्यामुळे शिवानी अग्रवालला अटक करण्यात आली आहे. याप्रकरणात तिचा काही सहभाग आहे का? याचा तपास केला जाणार आहे. यापूर्वीच पोलिसांनी शिवानी अग्रवालची चौकशी सुरु केली होती. आता तिला गुन्हे शाखेने अटक केली आहे.

अल्पवयीन आरोपीचे रक्त नमुने बदलल्याप्रकरणी पोलिसांनी याआधीच ससून हॉस्पिटलमधील दोन डॉक्टरांना अटक केली आहे. डॉ. अजय तावरे आणि श्रीहरी हळनोर या दोघांनी पैसे किंवा दबावापोटी आरोपीचे रक्त बदलल्याचा आरोप पोलिसांनी केला होता. » पान ४ वर

# निकालाचा काऊंट डाऊन; उमेदवारांना धाकधूक!




■ विजय कुलकर्णी

**पुणे :** लोकसभेच्या शेवटच्या आणि सातव्या टप्प्यातील मतदाने लोकशाहीचा उत्सवाची सांगता काल झाली. अगदी दोन दिवसावर येऊन ठेपलेल्या निकालाचा काऊंट डाऊन सुरु झाला आहे. लोकसभेच्या ५४३ जागांसाठी झालेल्या निवडणुकीत भाजपाने १ एक जागा बिनविरोधक करत आपले खाते उघडले तर उरलेल्या ५४२ जागांसाठी देशभरात चुरशीचे मतदान झाले. याच मतदानाच्या निकालाकडे सर्व देशवासियांचे लक्ष लागून राहिले आहे.

एक्झीट पोलनुसार जनतेने कौल पुन्हा मोदींनाच दिल्याचे स्पष्ट दिसत असले तरी, खरा निकाल हा ४ जून रोजी स्पष्ट होणार आहे. त्यामुळे सध्या उमेदवारांमधून धाकधाकू वाढत असल्याचे दिसत आहे.


लोकसभेची निवडणूक शनिवारी १ जून रोजी पार पडली. यंदा मतदानाचा काही टक्का वाढला, ही समाधानाची बाब आहे. उमेदवारांचे भवितव्य मशीनबंद झाले आहे. आता सर्वांना उत्सुकता आहे ती निवडणुकीच्या निकालाची. लोकसभा निवडणुकीचे बिगुल १९ एप्रिल २०२४ रोजी वाजले आणि निवडणुकीचे पडघम सुरू झाले. त्या दिवसापासूनच उमेदवारी कोणाला मिळणार? याच्या चर्चा रंगू लागल्या. वास्तविक लोकसभेचे तिकीट मिळावे यासाठी अनेक इच्छुकांनी तयारी सुरू केली होती. विविध उपक्रम राबवून मतदारांच्या मनामध्ये स्थान मिळविण्याचे प्रयत्न सुरू झाले होते. कोणत्याही सार्वजनिक कार्यक्रमात अनेकांची उपस्थिती दर्शवली तर काही कार्यकर्त्यांमध्ये उठबस वाढू लागली. इच्छुकांनी नवस, गाऱ्हाणे, पक्षश्रेष्ठांची मनधरणी असे प्रकारही केले. परंतु शेवटी पक्षश्रेष्ठींनी जे नाव ठरविले, त्या नावाला मान्यता देणे अपरिहार्य ठरले. देशात भाजप विरुद काँग्रेसह इतर घटक पक्ष यांच्यात ही निवडणूक झाली.नावे जाहीर होताच उमेदवार खऱ्या अर्थाने प्रचारासाठी रिंगणात उतरले. अर्जभरणा करताना प्रत्येकांनीच शक्तिप्रदर्शन केले. मोठ-मोठ्या सभा, कॉर्नर सभा, शक्तीप्रदर्शन करत आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झाडल्या गेल्या. » पान ४ वर

#रा

## ‘मेड इन इंडिया’ असलेली ही ट्रेन पुण्याची गतिमानता वाढवणार

# 'पुणे मेट्रो लाईन ३' साठी पहिली ट्रेन पुण्यात दाखल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** हिंजवडीच्या आयटी हबला शिवाजीनगरच्या मध्यवर्ती केंद्राशी जोडणाऱ्या पुणे मेट्रो लाईन ३ या प्रकल्पाचे काम वेगाने सुरू आहे. या वेगात भर घालण्यासाठी आणि एकूणच पुणे शहराची गतीमानता वाढविण्यासाठी ‘पुणेरी मेट्रो’ची पहिली ट्रेन पुण्यात दाखल झाली आहे. 'अलस्टॉम' या प्रसिद्ध कंपनीने आपल्या श्रीसिटी (आंध्रप्रदेश) येथील कारखान्यात विकसित केलेली ही तीन डब्यांची मेट्रो ट्रेन पूर्णपणे स्वदेशी बनवटीची - ‘मेड इन इंडिया’ – आहे. कित्येक वैशिष्ट्यांनी सुसज्ज असलेली ही पहिली पुणेरी मेट्रो ट्रेन रविवार ०२ जून रोजी पुणे मेट्रो लाईन ३ च्या माण येथील डेपोमध्ये दाखल होईल, अशी माहिती पुणे आयटी सिटी मेट्रो रेल लिमिटेडतर्फे देण्यात आली.

हिंजवडी ते शिवाजीनगर मार्गावरील पुणे मेट्रो लाईन ३ चे काम पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण 'पीएमआरडीए' तर्फे सार्वजनिक खासगी भागीदारी (पीपीपी) तत्वावर टाटा समूहाने हाती घेतले असून त्याच्या कार्यान्वनासाठी पुणे आयटी सिटी मेट्रो रेल लिमिटेड या स्पेशल पर्पज व्हेईकल (एसपीव्ही) कंपनीची स्थापना करण्यात आलेली आहे.

टाटा समूहाच्यावतीने ‘अलस्टॉम’ कंपनीला पुणे मेट्रो लाईन ३ प्रकल्पासाठी प्रत्येकी तीन डबे असलेल्या एकूण २२ ट्रेनचा संच उपलब्ध करून देण्याचे कंत्राट देण्यात आले आहे. ताशी ८५ किलोमीटर इतक्या अधिकतम वेगाने धावू शकणाऱ्या या प्रत्येक ट्रेनमधून एका फेरीत तब्बल १००० (एक हजार) प्रवासी वाहून नेण्याची क्षमता आहे.

पहिल्या ट्रेनचे माण डेपोमध्ये स्वागत करण्याच्या निमित्ताने पुणे आयटीसिटी मेट्रो रेल लिमिटेडचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. आलोक कपूर म्हणाले, “पुणे मेट्रो लाईन ३ प्रकल्पाचे काम एका शाश्वत वेगाणी पूर्णत्वाकडे सरकत आहे. अशातच या प्रकल्पासाठीची पहिली ट्रेन येथे प्रत्यक्ष येऊन दाखल झाल्याने सर्वांचा उत्साह आणखी वाढला आहे. माण - हिंजवडी ते शिवाजीनगर या मार्गावर उपयोगात आणल्या जाणाऱ्या सर्व ट्रेन्स अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज असतील. या मार्गावरील सर्व ट्रेन थर्ड रेल प्रणालीचं अवलंब करून धावणार आहेत, तसेच त्यांना अधिक कार्यक्षम आणि ऊर्जावान बनविण्यासाठी त्यामध्ये ‘रीजनरेटिव्ह ब्रेकिंग’ यंत्रणेचा देखील समावेश करण्यात आलेला आहे. पुणेकरांना सुरक्षित, विश्वासार्ह आणि पर्यावरणपूरक वाहतुकीचा पर्याय मिळवून देण्याच्या दृष्टीने या ट्रेन्सची रचना आदर्श आहे.”

“हिंजवडी ते शिवाजीनगर मार्गावरील मेट्रोच्या उभारणीमुळे सुलभ, वेगवान व स्वस्त सार्वजनिक वाहतुकीचा पर्याय उपलब्ध होणार आहे. नागरिकांच्या सुविधेसाठी हाती घेण्यात आलेल्या या प्रकल्पाच्या सर्वच टप्प्यांत गुणवत्ता आणि सुरक्षितता याबाबत कुठलीही तडजोड न करण्याचे टाटा समूहाचे धोरण आहे,” असेही आलोक कपूर यांनी नमूद केले.

याला दुजोरा देताना पुणे आयटी सिटी मेट्रो रेल लिमिटेडच्या संचलिका नेहा पंडित यांनी सांगितले, की “हिंजवडी ते शिवाजीनगर या मार्गावर दररोज प्रवास करताना पुणेकरांना अतिशय सुखद अनुभूती मिळावी या दृष्टीने ‘पुणेरी मेट्रो’ च्या गाड्यांचे आरेखन करण्यात आले आहे.

### पुणे मेट्रो लाईन ३ बाबत माहिती

- पुणे मेट्रो लाईन ३ हा हिंजवडीच्या आयटी हबला शिवाजीनगरच्या मध्यवर्ती केंद्राशी जोडणारा २३ किमीचा उन्नत मेट्रो रेल्वे प्रकल्प आहे. हा सार्वजनिक खाजगी भागीदारी (PPP) प्रकल्प आहे, जो पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (PMRDA) द्वारे टाटा समूहाच्या ट्रिल अर्बन ट्रान्सपोर्ट प्रायव्हेट लिमिटेड (TUTPL) आणि सिमेन्स प्रोजेक्ट व्हेंचर्स (Siemens Project Ventures GmbH) यांचा समावेश असलेल्या कन्सोर्टियमला प्रदान करण्यात आला आहे. हा प्रकल्प डिझाईन, बिल्ड, फायनान्स, ऑपरेट आणि ट्रान्सफर (DBFOT) तत्त्वावर पुणे आयटीसिटी मेट्रो रेल लिमिटेड या विशेष उद्देश कंपनी द्वारे ३५ वर्षांच्या सवलतीच्या कालावधीसाठी विकसित आणि ऑपरेट केला जाणार आहे.

राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स रा

## कॅशलेस सुविधा झाली अधिक गतिमान

**पुणे :** कॅशलेस उपचारांसाठी एका तासांत मान्यता द्या आणि रुग्णालयातून घरी सोडताना अवघ्या तीन तासांमध्ये दाव्यावर निर्णय घ्या, असा आदेश विमा नियामक आणि विकास प्राधिकरणाने (आयआरडीएआय) दिला आहे. त्यामुळे रुग्ण आणि रुग्णालयांना मोठा दिलासा मिळाल्याची भावना पुण्यातून व्यक्त झाली.

गुंतागुंतीच्या आणि महागड्या उपचारासाठी मोठा खर्च येत असल्याचे दिसून आले. त्यामुळे बहुतांश कंपन्यांमध्ये वैद्यकीय विम्याची सुविधा उपलब्ध केली आहे. तसेच, वैयक्तिक वैद्यकीय विमा उतरविण्याचे प्रमाणही वाढत आहे. त्यामुळे शहरातील रुग्णालयांमध्ये वैद्यकीय विम्याचे संरक्षण असलेल्या रुग्णांची संख्या ६० टक्क्यांपर्यंत वाढली असल्याचे निरीक्षण नोंदविण्यात आले. यामध्ये रुग्ण उपचारासाठी दाखल झाल्यानंतर रुग्णालयातर्फे विमा कंपन्यांकडे दावा दाखल केला जातो. पण, त्याची मंजुरी लवकर मिळत नाही. त्यामुळे रुग्णावर उपचाराला उशीर होतो. याची गंभीर दखल घेऊन प्राधिकरणाने एका तासांत दाव्याला मंजुरी देण्याचा आदेश विमा कंपन्यांना दिला. तसेच, उपचार पूर्ण झाल्यानंतर रुग्णालयातर्फे खर्चाचा अंतिम दावा कंपन्यांना केला जातो. मात्र, वैद्यकीय विमा कंपन्यांच्या 'थर्ड पार्टी एडमिनिस्ट्रेटर'तर्फे (टीपीए) बहुतांशवेळा हा दावा निकाली काढायला अधिक वेळ लागतो. काहीवेळा या दाव्यात त्रुटी काढल्या जातात. त्याचे स्पष्टीकरण 'टीपीए'तर्फे मागविण्यात येते. त्याची पूर्तता करून पुन्हा नव्याने दावा सादर केला जातो. या प्रक्रियेदरम्यान रुग्णालयातून रुग्णाला घरी सोडता येत नाही. दुसऱ्या गरजू रुग्णाला उपचारासाठी दाखल करून घेता येत नाही. त्यामुळे वैद्यकीय विम्याचा दावा निकाली काढण्यासाठी कंपन्यांना तीन तासांचा वेळ निश्चित करून दिला आहे. या वेळेतच कंपन्यांनी रुग्णालयाला या दाव्याचा निकाल द्यावा, असेही प्राधिकरणाने स्पष्ट केले.

## मोफत शिबिर...

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**पुणे :** नारायण सेवा संस्थानतर्फे ९ जून रोजी मोफत नारायण कृत्रिम अंग शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

### नारायण सेवा संस्थानतर्फे मोफत नारायण कृत्रिम अंग शिबीर

# २१,४०० हून अधिक दिव्यांगांनी घेतला लाभ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** नारायण सेवा संस्थानतर्फे पुण्यातील दिव्यांगांच्या कल्याणासाठी रविवार, दि. ९ जून रोजी क्वीन्स गार्डनअल्पबचत भवन येथे सकाळी ८ ते संध्याकाळी ६ यावेळेत मोफत नारायण कृत्रिम अंग शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. उदयपूर, राजस्थानच्या राष्ट्रीय पुरस्कार विजेत्या संस्थानतर्फे हे शिबीर घेण्यात येत असून ज्या व्यक्तींचे हात-पाय काही अपघात किंवा आजारामुळे निकामी होऊन अपंगत्व आले आहे, त्यांना अपंगत्वाच्या जीवनातून मुक्त करण्यासाठी संस्था प्रयत्नशील असल्याचे संस्थानचे विश्वस्त संचालक देवेंद्र चौबिसा यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

पत्रकार परिषदेला संस्थानचे माध्यम व जनसंपर्क संचालक भगवान प्रसाद गौड़ यांसह इतरही मान्यवर उपस्थित होते. यावेळी संस्थेचे विश्वस्त देवेंद्र चौबिसा, माध्यम व जनसंपर्क संचालक भगवान प्रसाद गौड़ आणि पुणे आश्रमाचे प्रभारी सुरेंद्र सिंह झाला, मुकेश सैन यांच्या हस्ते शिबिराच्या पोस्टरचे लोकार्पण करण्यात आले.

देवेंद्र चौबिसा म्हणाले, पद्मश्री विभूषित संस्थापक कैलास मानव आणि अध्यक्ष प्रशांत अग्रवाल यांच्या प्रेरणेतून संस्था गेली ३९ वर्षे मानवतेच्या क्षेत्रात सेवा करत आहे. 'कुआं प्यासे के पास' या योजनेंतर्गत महाराष्ट्रातील दिव्यांगांना मदत करण्याचा संकल्प घेऊन हे शिबीर होत असून शिबिराचे उद्घाटन सकाळी ११ वाजता होणार आहे. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

शिबिरात दिव्यांग बांधवांना संस्थेच्या अनुभवी व तज्ज्ञ ऑर्थोटिस्ट व प्रोस्थेटिक डॉक्टरांकडून तपासण्यात येणार असून, अवयवांचे मोजमाप पद्धतशीरपणे करून उच्चांकी कास्टिंग करण्यात येणार आहे.

Selected

### पुण्यात धावतात २५ पोर्शे स्पोर्ट्स कार



**पुणे :** पुण्यातील कल्याणीनगर भागात आलिशान पोर्शे कारने दोघांना उडवल्यानंतर पोर्शे कार चर्चेत आली आहे. या कारची किंमत कोटीच्या घरात आहे. पुणे शहरामध्ये मागील साडेतीन वर्षात आरटीओ कार्यालयात २५ पोर्शेकारची नोंद झाली आहे. शहरातील बांधकाम व्यावसायिक, उद्योजक तर काही कंपन्यांच्या मालकीच्या या आलिशान कार असल्याचे समोर आले आहे. पुणे शहरामध्ये पोर्शे कारशिवाय जॅग्वार, फेरारी आणि लॅम्बोर्गिनी या सारख्या महागड्या कार खरेदी करण्याकडे पुणेकरांचा कल असल्याचे पाहायला मिळते. कल्याणी नगर अपघातानंतर पुणे शहरात पोर्शे कार किती आहेत याची माहिती पुणे आरटीओ कार्यालयाकडून घेतली. मागील साडेतीन वर्षात २५ पोर्शे स्पोर्ट्स कारची खरेदी झाल्याचे पाहायला मिळाले. याशिवाय पुणेकरांनी पोर्शे कारप्रमाणे जॅग्वार, फेरारी व लॅम्बोर्गिनी या स्पोर्ट्स कारबरोबर ‘बीएमडब्ल्यू’ची खरेदी केल्याचे दिसून येते. मात्र, या महागड्या स्पोर्ट्स कार उद्योगपती, बांधकाम व्यावसायिक यांच्या लाडक्या बाळांकडे असतात.

**गाडी मालकांची नावे गोपनीय**

पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालयात २०२१ मध्ये तीन पोर्शे स्पोर्ट्स कारची नोंद आहे. २०२२ मध्ये १० तर २०२३ मध्ये ७ आणि चालू वर्षात २०२४ मध्ये एप्रिल महिन्यात चार पोर्शे कार खरेदी केल्याची नोंद आहे. या कार कोणी खरेदी केली त्यांची नावे देण्यास आरटीओ कार्यालयाने नकार दिला आहे. एम वाहन या मोबाईल ॲपवर त्या कार मालकांची नावे शोधा असे आरटीओ कार्यालयाने स्पष्ट सांगितले. मात्र, एम वाहन या मोबाईल ॲपवर या कार मालकांची नोंद नाही. इतर दुचाकी व कार मालकाची माहिती लगेच मिळते, पण महागड्या गाड्यांची माहिती या ॲपवर मिळत नाही.

### रास्ता पेठे येथे झाड कोसळले

**पुणे :** रास्ता पेठ येथील महावितरण कार्यालयाच्या परिसरात आंब्याचे झाड कोसळल्याची घटना घडली आहे. सुदैवाने यात कोणतीही जीवित हानी झाली नाही. मात्र, यातून महापालिका प्रशासनाचा ढिसाळपणा समोर येत आहे. झाड कोसळण्याची घटना घडताना तिथेच उपस्थित असणारे व प्रत्यक्षदर्शी युवक काँग्रेसचे सरचिटणीस रोहन सुरवसे पाटील यांनी तात्काळ महापालिका प्रशासनाशी संपर्क करून झाड हटवण्याच्या सूचना केली. या घटनेसंदर्भात बोलताना सुरवसे पाटील म्हणाले, सुदैवाने या झाड कोसळण्याच्या घटनेत कोणालाही दुखापत झाली नाही किंवा कोणत्याही प्रकारची हानी झाली नाही. मात्र, अत्यंत वर्दळीच्या परिसरात असणारे हे झाड वादळवारा नसतानाही कोसळले हे आश्चर्य आहे. जर हे झाड कमकुवत असेल तर महापालिकेच्या वृक्ष प्राधिकरणाला यासंदर्भात माहिती नाही का? चुकून या घटनेत कोणाचा जीव गेला असता तर त्याला जबाबदार कोण? ह्या घटनेची माहिती महापालिका आयुक्तांनी घ्यावी व जबाबदार अधिकाऱ्यांना योग्य त्या सूचना करून शहरातील कमकुवत असणाऱ्या झाडांचे सर्वेक्षण करावे. अशी मागणी होत आहे.

### विद्यापीठातील गांजा विषयाला धरून अभाविप आक्रमक

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये काही दिवसांपूर्वी विद्यार्थ्यांच्या वस्तीगृहामध्ये गांजा सापडला होता. काही महिन्यांपूर्वी सुद्धा विद्यापीठ परिसरामध्ये अंमली पदार्थ व दारूच्या बाटल्या सापडल्या होत्या. विद्यापीठ प्रशासन करत असलेल्या हलगर्जीपणामुळे विद्यापीठामध्ये अशा प्रकारच्या घटना घडत आहेत. या घटना थांबाव्यात म्हणून विद्यापीठाने उपाययोजना अद्याप केल्या नाहीत. त्याचबरोबर ज्या विद्यार्थ्यांकडे अशा पद्धतीच्या वस्तू सापडल्या आहेत. त्यांच्यावर सुद्धा काहीही कारवाई झालेली नाही या विरोधामध्ये अखिल भारतीय विद्यार्थी परिषद पुणे महानगर कडून आंदोलन करण्यात आले. यावेळी पोलीस प्रशासन विद्यापीठ सुरक्षा रक्षकांकडून विद्यार्थी परिषदेच्या कार्यकर्त्यांना धक्काबुक्की करण्यात आली. त्यानंतर विद्यार्थी परिषदेच्या कार्यकर्त्यांनी मुख्य इमारती समोर धरणे आंदोलन करून प्रशासनाला जागे केले.

# आजी-माजींमुळे कारवाई मंदावली

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महापालिकेच्या बांधकाम विभागाने शहरात २२ मे पासून अनधिकृत बार, पब, रेस्टॉरंटवर कारवाई सुरू केली आहे. सुरुवातीला कारवाईचा जोर चांगला होता, पण आता कारवाई संथ झाली आहे. कोथरूड, बाणेर, बालेवाडी, कोंढवा, महंमदवाडी, हडपसर या भागांत अनेक अनधिकृत बार, पब आहेत. यामध्ये आमदार, माजी आमदार, माजी नगरसेवकांसह अन्य पदाधिकाऱ्यांची भागीदारी आहे. हे बार अनधिकृत असल्याची माहिती असूनही अजून कारवाई झालेली नाही.

कल्याणीनगर येथील अपघाताच्या घटनेनंतर महापालिकेच्या बांधकाम विभागाने शहरात अनधिकृत पब, बार, रेस्टॉरंटवर कारवाई सुरू केली आहे. गेल्या सहा दिवसांत ५५ अनधिकृत बार, पबवर कारवाई करून १ लाख ७ हजार हजार चौरस फुटाचे बांधकाम पाडण्यात आले. पण आता कारवाईचा वेग मंदावला आहे. शहरात अद्यापही अनेक अनधिकृत रुफटॉप हॉटेल, बार असून, राजकीय पदाधिकाऱ्यांचा आश्रय असल्याने त्यांच्यावर कारवाई करण्यास टाळाटाळ केली जात आहे.

पुणे शहरात बाणेर, बालेवाडी, कोथरूड, कोरेगाव पार्क, कात्रज, भांडारकर रस्ता, कोंढवा, बिबवेवाडी, आंबेगाव, धायरी, नऱ्हे, वारजे, लोहगाव, हडपसर, पिसोळी, उंड्री, खराडी, मुंढवा, कल्याणीनगर, वडगाव शेरीसह इतर भागांत इमारतींवर 'रुफटॉप हॉटेल' सुरू केली आहेत. मोकळ्या जागा, नदीकाठच्या मोकळ्या प्लॉटमध्ये पब सुरू आहेत. बांधकाम विभागाकडून अशा हॉटेलना परवानगी देण्यात आली नाही.

### अशी झाली कारवाई

| तारीख | कारवाईची संख्या | पाडलेले क्षेत्र (चौरस फुटांमध्ये) |
|---|---|---|
| २२ मे | ४० | ५४,३०० |
| २४ मे | १४ | १५,९२५ |
| २५ मे | १२ | ११,९२५ |
| २७ मे | ४ | १०३४९ |
| २८ मे | ५ | १२,८०० |
| २९ मे | २ | २००० |
| एकूण | ७९ | १,०७,२९९ |

> झोन १, २, ३ या भागांतील अनधिकृत बार, रेस्टॉरंटवर कारवाई करण्यात आलेली आहे. कारवाई केलेल्या ठिकाणांची यादी राज्य उत्पादन शुल्क विभागालाही दिली आहे. आणखी काही ठिकाणे राहिली असतील तर त्यावरही कारवाई केली जाणार आहे."
> — श्रीधर येवलेकर
> अधिक्षक अभियंता

> बांधकाम विभागाने जुन्या हद्दीतील झोन ४, ५, ६मध्ये कारवाई केली आहे. जवळपास ७० ते ८० टक्के अनधिकृत बार, रेस्टॉरंटवर कारवाई केली आहे. कारवाईचा जोर कमी झालेला नाही. बांधकाम शेड काढल्यानंतर पुन्हा हॉटेल सुरू करण्याचा प्रयत्न केला तर कारवाई केली जात आहे" — राजेश बनकर
> अधिक्षक अभियंता

# मिळकतकर भरणा समस्यांवर आयुक्तांनी केली नागरिकांशी चर्चा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सध्या मिळकत करांसंदर्भात नागरिकांमधून संभ्रम अवस्था असल्याने यासंदर्भात चर्चा करण्यासाठी आयुक्तांनी बैठकीचे आयोजन केले होते. या बैठकीला भरणा समस्यांनविषयी पुणे शहरातील विविध संस्था, संघटनांचे प्रतिनिधी, ११ आणि २३ गावातील नागरिक, नांदेड सिटीमधील रहिवासी उपस्थित होते. यावेळी महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले, अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी., उपायुक्त माधव जगताप यांनी उपस्थित नागरिकांशी संवाद साधला. महापालिकेचा मिळकतकर भरताना नागरिकांना येणाऱ्या अडचणी समजून घेणे, बिलाची आकारणीबाबतचे आक्षेप याबाबत नागरिकांचे म्हणणे प्रशासनाने ऐकून घेतले आहे. त्या अडचणी सोडविण्यासाठी सकारात्मक प्रतिसाद दिला असून, लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता संपल्यानंतर याबाबत निर्णय घेतला जाणार आहे. समाविष्ट गावातील नागरिकांनी कर आकारणी जास्त होत आहे. ग्रामपंचायतीच्या करापेक्षा ही रक्कम जास्त आहे. त्याचप्रमाणे समाविष्ट गावातील नागरिकांना स्वतंत्रपणे पीटी ३ अर्ज न भरता ग्रामपंचायतीच्या नोंदीवरून करात ४० टक्के सूट द्यावी अशी मागणी बैठकीत केली. २३ गावांमध्ये आणि ११ गावांमध्ये कर आकारणी भिन्न पद्धतीने झालेली आहे. त्याचा फटका २३ गावातील नागरिकांना बसत आहे. ११ गावांप्रमाणे कर आकारणी करावी अशी मागणी नागरिकांनी केली. त्याचप्रमाणे गावे समाविष्ट झाल्यानंतर पाच वर्षांनी १०० टक्के कर आकारणी सुरु होते. या पाच वर्षात ४० टक्क्यांची सवलत कशी मिळणार आहे असा प्रश्न उपस्थित करण्यात आला. नांदेड सिटीतील नागरिकांनी त्यांना करामध्ये आवश्यक असणारी सवलत त्याबाबतही चर्चा केली. नागरिकांचे म्हणणे ऐकून घेतले आहे. त्यावर ४ जूननंतर निर्णय घेतला जाईल असे आयुक्तांनी नागरिकांना सांगितले.

### दरवर्षी राज्यातून तीन लाखांहून अधिक अर्ज

# आरटीई प्रवेश अर्ज भरण्याकरिता मुदतवाढ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आरटीई'नुसार आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि वंचित घटकातील विद्यार्थ्यांना खासगी शाळांमध्ये प्रवेशासाठी २५ टक्के जागा राखीव ठेवल्या जातात. या जागांवरील प्रवेशासाठी प्राथमिक शिक्षण विभागातर्फे केंद्रीय प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येते. या प्रक्रियेंतर्गत दरवर्षी राज्यातून तीन लाखांहून अधिक अर्ज येत असतात.

शिक्षण हक्क कायद्यानुसार (आरटीई) खासगी शाळांमधील २५ टक्के राखीव जागांवरील प्रवेशासाठी केंद्रीय ऑनलाइन प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

### 'आरटीई' प्रवेशासाठी आलेल्या अर्जांची स्थिती

- जिल्हा : शाळा : रिक्त जागा : आलेले अर्ज
- पुणे : ९७० : १७,७१४ : ४५,५३४
- अहमदनगर : ३५७ : ३,०२३ : ६,८७०
- छत्रपती संभाजीनगर : ५७४ : ४,४५१ : १४,०६२
- कोल्हापूर : ३२५ : ३,०३२ : ३,५४१
- नागपूर : ६५५ : ६,९२० : १९,३१८
- नाशिक : ४२८ : ५,२७१ : १३,६९९
- ठाणे : ६४३ : ११,३७७ : १८,३५५

### प्रवेश प्रक्रियेतील आकडेवारी

- एकूण शाळा : ९,२०९
- रिक्त जागा : १,०५,११६
- आलेले अर्ज : २,२५,९४२

### पालकांनी हे करावे

- अर्ज भरताना आपल्या राहत्या घराचा पूर्ण पत्ता आणि गुगल लोकेशन तपासून पाहावे
- संपूर्ण अर्ज बरोबर असल्याची खात्री झाल्याशिवाय अर्ज सबमिट करू नये
- आपल्या बालकाचा अर्ज भरताना जन्म दाखल्यावरीलच जन्म तारीख लिहावी
- एक किलोमीटर, एक ते तीन किलोमीटर अंतरावर शाळा निवडताना कमाल दहाच शाळा निवडाव्यात
- अर्ज भरताना आवश्यक कागदपत्रे तयार ठेवावीत
- प्रवेशाची सोडत (लॉटरी) जाहीर झाल्यानंतर कागदपत्रे नसल्यास प्रवेश रद्द होऊ शकतो
- एका पालकाने आपल्या बालकांसाठी डुप्लिकेट अर्ज भरू नयेत
- एकाच बालकाचे दोन अर्ज आढळल्यास दोन्ही अर्ज बाद होतील आणि ते अर्ज सोडत प्रक्रियेत समाविष्ट केले जाणार नाहीत.

#रा

## दुष्काळामुळे शेतकरी आले संकटात

# उभ्या पिकांवर कुऱ्हाड

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जालना :** सध्या राज्यात उन्हाचा पारा चांगलाच वाढला आहे. बहुतांश जिल्ह्यात तापमानाचा पारा हा ४० अंशाच्या पुढे गेला आहे. त्यामुळं अनेक ठिकाणी पाणीटंचाई निर्माण झाली आहे. नागरिकांबरोबर जनावरांच्या पाण्याचा चाऱ्याचा प्रश्न निर्माण झालाय.

शेतकऱ्यांची उभी पिकं करपू लागल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. जालना जिल्ह्यात देखील अशीच परिस्थिती पाहायला मिळत आहे. दुष्काळामुळे जालना जिल्ह्यातील ३५०० हेक्टरवरील फळबागांचे मोठं नुकसान झाले आहे. तर २५०० हेक्टरवरील मोसंबीच्या बागा जळाल्या आहेत. उन्हामुळे शेतकऱ्यांची पिके करपू लागल्यामुळे बळीराजाचे मोठे नुकसान होत आहे.

### पाण्याअभावी फळबागांवर कुऱ्हाड

● जालना जिल्ह्यात भीषण अशा दुष्काळाच्या झळा बसत असून, जवळपास ३५०० हेक्टर वरील फळबागा नष्ट झाल्या असून त्या पैकी अडीच हजार हेक्टर मोसंबी बागा जळाल्याच समोर आलंय. अनेक शेतकरी पाण्याअभावी फळबागांवर कुऱ्हाड चालवत आहेत. दुष्काळामुळं या फळबागा करपून गेल्याचं भीषण वास्तव शेत शिवारात पाहायला मिळतेय.

### राज्यात अनेक ठिकाणी पाण्याचा प्रश्न निर्माण

● सध्या राज्यात अनेक ठिकाणी पाण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. मागील वर्षी अपेक्षीत प्रमाणात पाऊस झाला नव्हता. याचा मोठा फटका शेती पिकांना बसला होता. धरण, तलाव, नदी नाल्यांमध्ये मोठ्या प्रमाणात पाण्याचा साठा नव्हता. जेवढा साठा होता, तेवढा साठा आता संपत आला आहे. अनेक ठिकाणी धरणं, नदी नाले तलाव कोरडेठाख पडले आहेत. त्यामुळं पिण्याच्या पाण्यासोबतच शेतीच्या पाण्याचा प्रश्न देखील निर्माण झाला आहे. तसेच पाणीच नसल्यामुळं जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न देखील निर्माण झाला आहे. त्यामुळं शेतकरी चिंतेत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे.

---

## नागपूर-रत्नागिरी महामार्गाचे काम शेतकऱ्यांनी

# कोल्हापुरात बंद पाडले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कोल्हापूर जिल्ह्यातून जात असलेल्या प्रस्तावित शक्तिपीठ महामार्गाला कोल्हापूर जिल्ह्यातून कडाडून विरोध होत असतानाच आता दुसऱ्या बाजूने सुरू असलेल्या नागपूर रत्नागिरी महामार्गाला सुद्धा शेतकऱ्यांनी कडाडून विरोध केला. कोल्हापूर जिल्ह्यातील करवीर तालुक्यातील शिये, भुयेवाडी, भुये या परिसरातील शेतकऱ्यांनी आज पाणंद रस्ता बंद झाल्याने आक्रमक भूमिका घेतली. या महामार्गाची पूर्णपणे नव्याने निर्मित होत असल्याने अनेक ठिकाणी पर्यायी रस्ता नसल्याने शेतकरी आक्रमक झाले.

**आम्हाला किंमत आहे की नाही?**

यावेळी शेतकऱ्यांनी काम घेतलेल्या ठेकेदारासह अधिकाऱ्यांना सुद्धा धारेवर धरले. यावेळी शेतकऱ्यांनी दबाव आणत असल्याचा आरोप करत आम्हाला किंमत आहे की नाही? अशी विचारणा अधिकाऱ्यांकडे केली. अधिकाऱ्यांकडून मोबदल्याचा मुद्दा उपस्थित होताच आम्ही मेल्यावर मोबदला द्या, अशी संतप्त प्रतिक्रिया शेतकऱ्यांनी दिली.

शेतकऱ्यांचा आक्रमक पवित्रा पाहून अधिकारी व ठेकेदारांनी तुम्हाला सोयीस्कर असेल त्या पद्धतीने काम करून देतो, असे सांगण्याचा प्रयत्न केला. रस्त्याच्या खालून ओव्ह साईज पाईप टाकावी अशी मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात आली.

### शक्तीपीठ महामार्ग रद्द करावा, जिल्हाधिकारी कार्यालयावर महामोर्चा

● दरम्यान, पुन्हा एकदा प्रस्तावित शक्तीपीठ महामार्ग विरोधात वातावरण कोल्हापूर जिल्ह्यात तापण्यास सुरुवात झाली आहे. शक्तीपीठ महामार्ग रद्द करण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन गावे बंद ठेवून सहकुटुंब १८ जूनला दसरा चौकातून जिल्हाधिकारी कार्यालय असा मोर्चा काढण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. कोल्हापूर व हातकणंगले या दोन्ही लोकसभा मतदारसंघातील हजारो शेतकऱ्यांची जमीन शक्तीपीठासाठी जाणार आहे. मात्र अल्प प्रमाणात नुकसान भरपाई मिळणार असल्याने शेतकऱ्यांचा विरोध आहे.

---

## सलमान खानवर पुन्हा हल्ल्याचा कट

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** बॉलिवूडचा भाईजान अभिनेता सलमान खानच्या घरावर झालेल्या गोळीबाराच्या घटनेमुळं मुंबईच नव्हे, तर संपूर्ण देश हादरला होता. दरम्यान सलमान खानला टार्गेट करण्याचा एक कट उघड झालाय. या कटात बिश्नोई गँगचा म्होरक्या लॉरेन्स बिश्नोईचा हात आहे, हे देखील समोर आलंय. समोर आलेल्या माहितीनुसार, बिश्नोई गँगकडून सलमान खानच्या कारवर हल्ला करण्याचा कट रचण्यात आला होता. पाकिस्तानमधून शस्त्रास्त्र पुरवणाऱ्या एका तस्कराकडून शस्त्रं मागणवण्याचीही योजना आखण्यात आली होती.


बिश्नोईच्या टोळीतील चौघांना अटक : नवी मुंबई पोलिसांनी या प्रकरणात गुन्हा दाखल करत लॉरेन्स बिश्नोईच्या टोळीतील चौघांना अटक केली आहे.

---

राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स रा

## २०४७ पर्यंत मी काम करावे ही तर श्रींची ईच्छा

**नवी दिल्ली :** देशभरात लोकसभा निवडणुकीच्या शेवटच्या अर्थात सातव्या टप्प्यासाठी मतदान होत असताना पंतप्रधान



नरेंद्र मोदींनी केलेलं एक विधान पुन्हा चर्चेत आलं आहे. याआधी एका मुलाखतीमध्ये "माझा जन्म आईच्या पोटी झाला नसून मला देवानं पाठवलं आहे", असं विधान मोदींनी केलं होतं. या विधानावरून विरोधकांनी भारतीय जनता पक्षाला व खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदींनाही लक्ष्य केलं होतं. त्यानंतर आता मोदींनी केलेलं आणखी एक विधान चर्चेत आले आहे.

### काय म्हणाले होते पंतप्रधान मोदी?

● इंडिया टीव्हीवरील एका कार्यक्रमात मोदींनी एका प्रश्नाला दिलेल्या उत्तरादरम्यान हे विधान केलं. फायनान्शियल एक्स्प्रेसनं यासंदर्भातलं सविस्तर वृत्त दिलं आहे. "माझा असा विश्वास आहे की प्रत्यक्ष देवानंच मला विशिष्ट जबाबदारी देऊन इथे पाठवलं आहे. 'विकसित भारत'चं ध्येय साध्य करण्यासाठी देवानं मला २०४७ सालापर्यंत दिवसाचे २४ तास आणि आठवड्याचे सातही दिवस काम करण्याचे आदेश दिले आहेत", असं पंतप्रधान नरेंद्र मोदी या कार्यक्रमात म्हणाले. "मला वाटतं देवानंच मला या विशेष हेतूसाठी पृथ्वीवर पाठवलं आहे. २०४७ सालापर्यंत विकसित भारताचं लक्ष्य पूर्ण करण्याचं ध्येय साध्य करायचं आहे. ईश्वर मला त्यासाठी मार्ग दाखवतो. ईश्वरच त्यासाठी मला ऊर्जा देतो. २०४७ सालापर्यंत हे लक्ष्य मी साध्य करेन याचा मला पूर्ण विश्वास आहे. जोपर्यंत ते लक्ष्य साध्य होत नाही, तोपर्यंत ईश्वर मला परत बोलवणार नाही", असेही मोदी यावेळी म्हणाले.

---

» Selected

## शिंदेंचा ठाकरे गटाला धक्का

**नाशिक :** विधान परिषद निवडणुकांपूर्वी राजकीय घडामोडींना वेग आला आहे. विधान परिषद निवडणुकीपूर्वी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांना आणखी एक धक्का दिला आहे. शिवसेना ठाकरे गटाचे विद्यमान नाशिक शिक्षक मतदारसंघाचे आमदार किशोर दराडे हे शिवसेनेच्या वाटेवर आहेत. किशोर दराडे हे शिवसेनेत प्रवेश करणार असल्याची माहिती समोर येत आहे. हा शिवसेना ठाकरे गटासाठी मोठा धक्का मानला जात आहे. दरम्यान किशोर दराडे हे शिवसेनेत प्रवेश करणार असल्याने उद्धव ठाकरेंनी नाशिकमध्ये दराडेंच्या जागेवर नवा पर्याय शोधला आहे. नाशिक शिक्षक मतदार संघ ही जागा महाविकास आघाडीमध्ये ठाकरे गटाच्या वाट्याला आल्याने काँग्रेसचे ज्येष्ठ नेते गोपाळराव गुळवे यांचे पुत्र संदीप गुळवे हे शिवसेना ठाकरे गटात प्रवेश करणार आहेत.

## "मंडीतून मी जिंकणारच" कंगना

**मुंबई :** देशात लोकसभा निवडणुकांसाठी शेवटच्या टप्प्यातील मतदान हिमाचल प्रदेशमध्ये सुरू आहे. हिमाचल प्रदेशमध्ये लोकसभा निवडणुकांसाठी मंडी येथे मतदान सुरू आहे. लोकांनी सकाळीच मतदान केंद्रावर हजेरी लावत मतदानाचा हक्क बजावला आहे. हिमाचलमधून प्रसिद्ध अभिनेत्री कंगना रणौत निवडणुकीच्या रिंगणात उभी आहे. मंडीमधून भाजपकडून कंगनाला तिकिट देण्यात आलं आहे. कंगनानं देखील मतदानाचा हक्क बजावला. तसंच तिनं प्रतिक्रिया देत पंतप्रधान मोदींच्या ध्यानधारणेबद्दल वक्तव्य केलंय. कंगना नेहमीप्रमाणे तिच्या कूल अंदाजात मतदान केंद्रावर पोहचली. तिनं मतदानाचा हक्क बजावला. कंगनासोबत तिचे कुटुंबीयही होते. यावेळी कंगना खूप आनंदी दिसत होती. मतदान केंद्रावर आलेल्या अनेकांशी तिनं संवाद साधला आणि मतदान करण्याचं आवाहन केलं.

---

# रस्ता ओलांडणाऱ्या महिलेला बसने फरफटत नेले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**ठाणे :** वसईच्या सातिवली रोडवर एका बसने महिलेला चिरडल्याची धक्कादायक घटना घडली आहे. यात महिलेचा जागीच मृत्यू झाला. हा अपघात इतका भीषण होता, की यात महिलेच्या शरीराच्या चिंधड्या झाल्या आहेत. अपघात इतका भीषण होता, की अपघातानंतर महिला २०० मीटरपर्यंत बसच्या चाकाखाली फरफरटत गेली .

काल (१ जून रोजी )सकाळी साडेनऊ वाजताच्या सुमारास ही घटना घडली. महिला रस्ता ओलांडत असताना भरधाव वेगाने येणाऱ्या बसने तिला चिरडलं. सातिवली रस्त्यावर वाहनांची प्रचंड गर्दी असते. या मुख्य रस्त्यावर वाहतूक पोलीस उपस्थित नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

सध्या पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून पंचनामा करून महिलेचा मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्याचं काम सुरू आहे. या अपघातामुळे सातिवली मुख्य रस्त्यावर प्रचंड वाहतूक कोंडी निर्माण झाली आहे. घटनेतील महिलेची अद्यापही ओळख पटलेली नाही .

### समृद्धी महामार्गावरही भीषण अपघात

● दुसरीकडे समृद्धी महामार्गावरही अपघात झाल्याची घटना समोर आली आहे. या घटनेत कामगारांना डंपरनं चिरडलं. या अपघातामध्ये एकाचा मृत्यू झाला आहे, तर दोन जण गंभीर जखमी झाले आहेत. शहापूर तालुक्यातील कसारा विभागातील वाशळा गावाच्या परिसरात हा अपघात झाला आहे, या गावाच्या परिसरात समृद्धी महामार्गाच्या अंतिम टप्प्याचं काम सुरू आहे. या मार्गाचं काम करणाऱ्या कामगारांना डंपरनं चिरडलं. २५ ते ३० कामगार या महामार्गाच्या कडेला झोपले होते. परंतु रात्रीच्या सुमारास याच महामार्गाच्या कामासाठी लावण्यात आलेलं एक डंपरने तीन कामगार चिरडले.

---

## 'मला १०० टक्के विश्वास, दोन लाखांच्या फरकाने जिंकणार'

# निलेश लंकेंनी स्वत:चा एक्झिट पोल सांगितला!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**अहमदनगर :** लोकसभा निवडणुकीचे एक्झिट पोल हे काही तासात समोर येणार आहेत. तर चार जूनला निकाल लागणार आहे. या पार्श्वभूमीवर अहमदनगर लोकसभेचे महाविकास आघाडीचे उमेदवार निलेश लंके यांनी मोठा दावा केला आहे. तब्बल दोन लाखांच्या फरकाने निवडून येणार, असे त्यांनी म्हटले आहे.

मला १०० टक्के विश्वास आहे की, निवडणुकीचा निकाल माझ्याच बाजूने लागणार आहे. निवडणुकीची रणधुमाळी सुरु झाली तेव्हा मी जाहीर केले होते की मी दोन लाखांच्या फरकाने विजयी होणार आहे. मी आजही माझ्या वक्तव्यावर ठाम आहे, असे निलेश लंके यांनी म्हटले आहे.

**निलेश लंकेंचा सुजय विखेंना टोला :** इतर उमेदवारांसारखे आपले आकडे कमी होत नाहीत, तर वाढतच आहेत. कारण सर्वसामान्य जनता आपल्या सोबत आहे असं म्हणत निलेश लंके यांनी अप्रत्यक्षरीत्या त्यांनी सुजय विखे पाटील यांना टोला लगावलाय. निवडणूक झाल्याबरोबर आपण इतरांप्रमाणे आराम करण्यासाठी कुठे गेलो नसून जनतेसोबत असल्याचं म्हणत माझं दैनंदिन काम सध्या देखील सुरू असल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

**विखेंकडून प्रशासनाचा गैरवापर :**

काही दिवसांपूर्वी सुपा एमआयडीसी परिसरात जी अतिक्रमण विरोधी कारवाई करण्यात आली ती सूडबुद्धीने करण्यात आल्याचा आरोप करत पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे नाव न घेता त्यांच्याकडून सत्तेचा गैरवापर केला जात असल्याचे निलेश लंके यांनी म्हटले आहे. मात्र गोरगरिबांचे व्यवसाय उद्ध्वस्त करून त्यांनी काय मिळवलं? विखेंकडून प्रशासनाचा कसा गैरवापर करण्यात आला. हे चार तारखेनंतर सर्वांसमोर सांगू, असाही इशारा त्यांनी यावेळी दिला आहे.



### मतमोजणीसाठी निवडणूक यंत्रणा सज्ज

● दरम्यान, लोकसभा निवडणुकीसाठी मंगळवार दि.४ जून रोजी मतमोजणी होणार आहे. अहमदनगर लोकसभा मतदारसंघासाठी मतमोजणी महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, एमआयडीसी, नागापूर, अहमदनगर येथे सकाळी ८ वाजेपासून सुरू होणार आहे. या मतमोजणीसाठी सुमारे एक हजार पाचशे अधिकारी, कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असून मतमोजणीसाठी सर्व निवडणूक यंत्रणा सज्ज असल्याची माहिती निवडणूक शाखेने दिली आहे.

---

## मतदान प्रक्रिया...

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा




दक्षिण आफ्रिका येथे २९ मे रोजी झालेल्या दक्षिण आफ्रिकेच्या निवडणुकीत मत देण्यासाठी लोक रांगेत उभे आहेत.

---

# मतदानापासून अडवले; मतदारांनी ईव्हीएम उचलून थेट तळ्यात फेकले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कोलकाता :** पश्चिम बंगालमध्ये सातव्या टप्प्यातील मतदानावेळी अनेक धक्कादायक घटना घडत आहेत. काही ठिकाणी बॉम्ब फेकल्याच्या तर काही ठिकाणी हिंसाचाराच्या घटना घडल्या आहेत. जयनगर लोकसभा मतदारसंघात कुलटाली इथं मतदानापासून रोखल्यानं मतदारांनी ईव्हीएम उचलून थेट तळ्यात फेकल्याचा प्रकार समोर आला आहे. कुलटलीच्या मेरीगंज नंबर २ विभागातील बूथ नंबर ४० आणि ४१ वर ही घटना घडली. या घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पण त्यांना वाटेतच इतर ग्रामस्थांनी अडवलं.



मतदानापासून अडवलेल्या ग्रामस्थांनी वाटेत झाडांच्या फांद्या टाकून पोलिसांची वाट रोखली. भाजप उमेदवार अशोक कंडारी यांनी आरोप केला की, तृणमूल काँग्रेस विरोधी पक्षाच्या एंजटना बसू देत नाहीय. निवडणूक आयोग आणि केंद्रीय सुरक्षा दलाकडेही त्यांनी बोट दाखवलं.

भाजपने दावा केला की, भाजप कार्यकर्त्यांच्या एका गटाला बसूही दिलं नाही. तसंच इतकी मारहाण केली की ते उठू शकत नव्हते. पोलीस आणि तरी त्यांना काही करता आलं नाही. ग्रामस्थांनीही अशी तक्रार केली की तृणमूल काँग्रेसच्या समर्थकांनी मत देण्यापासून रोखलं.

तणावाच्या वातावरणात मारहाणीत भाजप कार्यकर्ता जखमी झाला. घटनेबद्दल भाजप कार्यकर्त्याच्या आईने सांगितलं की, तिचा मुलगा यावेळी भाजपचा बूथ एजंट बनला. पण जेव्हा बूथवर तो बसण्यासाठी गेला तेव्हा मारहाण झाली. या घटनेची माहिती मिळताच निवडणूक अधिकारी घटनास्थळी पोहोचले. आता या प्रकरणाची चौकशी निवडणूक आयोग करत आहे.

पश्चिम बंगालमधील सीपीआय (एम) आणि आयएसएफ कार्यकर्त्यांनी या हल्ल्याचा आरोप टीएमसीवर केला आहे.

---

## नाशिककरांनो सावधान! स्वाईन फ्लूमुळे दोघांचा मृत्यू

# आतापर्यंत आठ जण दगावले; मनपा अलर्ट

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नाशिक :** स्वाईन फ्लूमध्ये नाशिककरांची चिंता वाढली आहे. नाशिकमध्ये स्वाईन फ्लूमुळे दोघांचा बळी गेल्याची धक्कादायक माहिती समोर येत आहे. मृतांमध्ये शहरातील ५० वर्षीय पुरूष तर दिंडोरीतील ४२ वर्षीय महिलेचा समावेश आहे. यामुळे नाशिकमधील स्वाईन फ्लू बळींची संख्या आठवर गेली असून आतापर्यंत शहरातील २८ जणांना स्वाईन फ्लूची लागण झाली आहे. नाशिक शहरात स्वाईन फ्लूच्या रुग्णांमध्ये झपाट्याने वाढ होत असल्याने महापालिका प्रशासन खडबडून जागी झाली आहे.

नाशकात स्वाईन फ्लूमुळे दोन जणांचा मृत्यू

गेल्याच आठवड्यात नाशिकमधील जेलरोड भागातील ५८ वर्षीय सेवानिवृत्त एअरफोर्स कर्मचाऱ्याचा मृत्यू झाला आहे. या रुग्णावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू होते. मृत्यूनंतर रुग्णाचा तपासणी अहवाल पॉझिटीव्ह आला आहे. दिंडोरीतील ४२ वर्षीय महिलेला स्वाईन फ्लूची लागण झाल्याने नाशिकमधील खासगी रुग्णालयात उपचार सुरू असताना तिचे निधन झाले.

**आतापर्यंत आठ जण दगावले**

दरम्यान, जानेवारी ते एप्रिल या चार महिन्यात शहरात स्वाईन फ्लूचे २३ बाधित रुग्ण आढळून आले होते. एप्रिलमध्ये जेलरोड येथील ५९ वर्षीय डॉक्टरचा या आजारामुळे मृत्यू झाल्याने या आजाराचे गांभीर्य वाढले. त्यानंतर मे महिन्यात सिन्नर मधील दातली गाव येथील एका ६३ वर्षीय महिला, मालेगाव येथील ६५ वर्षीय व्यक्ती आणि २९ वर्षीय महिला, निफाड येथील ६८ वर्षीय महिला तर कोपरगाव येथील ६५ वर्षीय महिलेचा नाशिकमध्ये उपचारादरम्यान मृत्यू झाला होता. आता नाशिकमधील स्वाईन फ्लूने मृत्यू झालेल्यांची संख्या आठवर पोहोचली आहे. यामुळे मनपा प्रशासन अलर्ट मोडवर आली असून इतर स्वाईन फ्लूच्या रुग्णांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती महापालिकेच्या आरोग्य विभागाने दिली आहे.

### नेमका कशामुळे होतो स्वाईन फ्लू?

● स्वाईन फ्लू, ज्याला स्वाईन इन्फ्लूएन्झा असेही म्हणतात, त्याचा परिणाम डुकरांमध्ये तीव्र श्वसन रोग झाला, जो नंतर मानवांमध्ये फ्लूचा क१२१ प्रकार, ए




इन्फ्लूएंझा व्हायरसमध्ये विकसित झाला. स्वाईन फ्लूच्या विषाणूचा मानवांमध्ये प्रसार होण्याचा प्रमुख मार्ग म्हणजे जेव्हा संक्रमित व्यक्ती शिंकतो किंवा खोकतो. जेव्हा एखादी व्यक्ती विषाणूने संक्रमित झालेल्या एखाद्या गोष्टीला स्पर्श करते किंवा संपर्क करते किंवा संक्रमित झालेल्या व्यक्तीच्या नाक, तोंड आणि आसपासच्या भागांना स्पर्श करते तेव्हा विषाणूचा संसर्ग होतो. स्वाईन फ्लू हा आजाराच्या पहिल्या पाच दिवसात संसर्गजन्य असतो. लहान मुले आणि वृद्धांमध्ये हे प्रमाण वाढू शकते. त्यामुळे लक्षणे आढळल्यास त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्या.

#रा

# लॉजमध्ये आढळला अनोळखी इसमाचा मृतदेह

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**यवत :** दौंड तालुक्यातील चौफुला येथे असलेल्या प्रियांका नावाच्या लॉजच्या रुममध्ये एक इसम मृतावस्थेत आढळून आल्याची घटना शनिवारी सकाळी घडली असल्याची माहिती यवत पोलिसांनी दिली. मनोज पी. के. कोचू कुंजू (वय ४१) रा. पुथेन वीडू वडाक्कथिल, थाझाथु वडाक्कु पो, पट्टाझी वडाक्केकारा, कोल्लम, थझाथुवुदाक्कू राज्य केरळ) असे मृतदेह आढळलेल्या इसमाचे नाव आहे.

याप्रकरणी यवत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बोरीपारधी गावच्या हद्दीत चौफुला येथे प्रियांका नावाचे लॉज असून या लॉजच्या रूम नंबर 3 मध्ये मनोज पी. के. कोचू कुंजू हे दोन दिवसांसाठी राहायचे आहे म्हणून मुक्कामी आले होते. शनिवारी सकाळी मनोज पी. के. कोचू कुंजू हा रूम बाहेर न आलेने लॉज मालकाने रूमचा दरवाजा वाजवून त्याला आवाज दिला असता, त्याने आवाज दिला नाही. बराच वेळ झाला तरी त्याने दरवाजा उघडला नाही. म्हणून लॉज मालक तसेच त्यांचे वडील सदाशिव निंबाळकर त्यांचे मित्र गणेश भोसले, वैभव डेंम्बळकर यांच्या मदतीने सर्वांनी दरवाजाची कडी तोडून आतमध्ये प्रवेश केला. यावेळी रूममध्ये जाऊन पाहिले असता तो बाथरूममध्ये खाली पालथा पडलेला दिसला. त्यांची काही एक हालचाल दिसत नव्हती. तसेच त्याच्या नाका तोंडातून लालसर चिकट स्त्राव आलेचे दिसत होते. मृत मनोज पी. के. कोचू कुंजू याला रुग्णवाहिकेमधून उपचारासाठी यवत ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले. तेथील डॉक्टरांनी तपासून तो उपचारापुर्वीच मयत झाल्याचे घोषित केले. यवत पोलिसांनी घटनेची नोंद केली असून मनोज पी. के. कोचू कुंजू याने आत्महत्या केली की अन्य कारणाने मृत्यू झाला, याचा तपास यवत पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नारायण देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस नाईक विशाल जाधव हे करीत आहेत.

## स्वागताध्यक्षपदी दिग्विजय जेधे, तर निमंत्रकपदी सागर फडके यांची निवड
# साहित्य संमेलनात कार्यक्रमांची मेजवानी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**यवत :** अखिल भारतीय मराठी साहित्य संशोधन परिषद व भीमथडी मराठी साहित्य प्रतिष्ठान आयोजित चौफुला (ता. दौंड) येथे होणाऱ्या तिसऱ्या राज्यस्तरीय भीमथडी मराठी संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी दिग्विजय जेधे यांची तर निमंत्रकपदी सागर फडके व सहनिमंत्रकपदी मोहन जाधव यांची निवड करण्यात आली असल्याची माहिती संमेलनाचे मुख्य प्रवर्तक ज्येष्ठ साहित्यिक दशरथ यादव यांनी दिली.

तिसरे राज्यस्तरीय भीमथडी मराठी साहित्य संमेलन दि. १६ व १७ जून २०२४ रोजी होणार आहे. संमेलनाच्या संयोजन बैठकीला भीमथडी मराठी साहित्य प्रतिष्ठानचे अध्यक्ष संजय सोनवणे, सचिव दीपक पवार, राजाभाऊ जगताप, कैलास शेलार, डॉ. भालचंद्र सुपेकर, रवींद्र खोरकर, सुशांत जगताप, बाळासाहेब मुळीक, अरविंद जगताप, रामभाऊ नातू, राहुल यादव उपस्थित होते. भीमथडी साहित्य संमेलनात ग्रंथदिंडी, जलाभिषेक, उद्घाटन समारंभ, पुरस्कार वितरण, कथाकथन, नाट्यप्रयोग, परिसंवाद, कलारंग, कविसंमेलन व समारोप असे भरगच्च कार्यक्रम होणार आहेत अशी माहिती अध्यक्ष संजय सोनवणे यांनी दिली.

दिग्विजय सर्जेराव जेधे हे देशभक्त केशवराव जेधे फाउंडेशनचे अध्यक्ष असून, हे बारामतीचे पहिले खासदार स्वातंत्र्यसैनिक देशभक्त केशवराव जेधे यांचे पणतू आहेत. केशवराव जेधे यांच्या स्वातंत्र्यपूर्व काळातील देशासाठीचे योगदान, त्यांनी सुरू केलेल्या चळवळी, सत्यशोधक कार्याचा प्रचार आणि प्रसार या संस्थेच्या मार्फत ते करत आहेत. दिग्विजय जेधे हे सिंहगड, राजगड, तोरणा या सह्याद्रीच्या पराक्रमी गडांवर होणारी महाराष्ट्रातील पहिली आंतरराष्ट्रीय अल्ट्रा ट्रेल मॅरेथॉनचे ते संस्थापक अध्यक्ष आहेत. गेली ७ वर्ष ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या गडकिल्ल्यांचा प्रचार व प्रसार या मॅरेथॉनच्या माध्यमातून करत आहेत. स्वराज्यावर अफझलखान चालून आला, त्यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरणी स्वतःच्या वतनावर पाणी सोडणारे स्वराज्य वीर कान्होजीराव जेधे यांचे ते १३ वे वंशज आहेत. गेली १५ वर्ष अविरतपणे शिवकार्य, समाजकार्य ते करत आहेत. आग्रा ते राजगड-गरूडझेप मोहिम- १७ ऑगस्ट १९६६ रोजी छत्रपती शिवाजी महाराजांनी औरंगजेबाच्या कैदेतून स्वतःची सुटका करून घेतली व ते राजगडावर सुखरूप आले. त्या घटनेला मानवंदना देण्यासाठी ४ राज्यांतून हातामध्ये धगधगती शिवज्योत घेऊन आग्र्याच्या लाल किल्ल्यापासून ते स्वराज्याची राजधानी राजगडपर्यंत सुमारे २ हजार युवक १२५३ किलोमीटर १३ दिवसांत धावत आले. जेधे हे गरूडझेप मोहिमेचे उपाध्यक्ष आहेत. ही मोहिम भारतातील आजपर्यंतची सर्वात मोठी शिवज्योत आहे.

सागर फडके हे राष्ट्रवादी कॅंग्रेस पार्टी (अजित पवार गट) दौंड तालुका युवक अध्यक्ष आहेत. राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे माजी प्रदेश सरचिटणीस स्व. नानासाहेब फडके यांचे हे सुपुत्र आहे. सागर फडके हे तालुक्यात तरुणासाठी नेहमी सक्रीय असतात. मोहन जाधव हे महाराष्ट्र राज्य कैकाडी महासंघाचे उपाध्यक्ष म्हणून काम करत आहेत. साहित्य चळवळीत सक्रिय सहभाग नेहमी घेत असतात.-

## पान १ वरून

### मतदारांचा कौल पुन्हा मोदींनाच !

आहे. असा घणाघात केला. त्यानंतर संध्याकाळी उशिरा कॉंग्रेसने आपला निर्णय बदलला. तथापि, या निर्णयाचा जो राजकीय फटका बसायचा होता, तो कॉंग्रेसला बसला. यापूर्वीच्या एक्झिट पोलमध्ये २०१४ मध्ये भाजपच्या रालोआला २८३ तर कॉंग्रेसला १०५ जागा मिळतील, असा अंदाज वर्तवण्यात आला होता, त्यावेळी भाजप २८२ जागांवर, तर रालोआ ३३६ जागांवर विजयी झाले होते. २०१९ मध्ये, रालोआला ३०६ जागा देण्यात आल्या, त्यावेळी प्रत्यक्षात भाजप ३०३ तर रालोआ ३५३ जागांवर विजयी झाली होती. कॉंग्रेसला केवळ ५२ जागा मिळाल्या होत्या.

### शिरुर तालुक्यात घडला खळबळजनक पोर्शे पॅटर्न

उपचारापूर्वीच अरुण विठ्ठल मेमाणे वय ३० वर्षे रा. वडगाव बांडे ता. दौंड जि. पुणे याचा मृत्यू झाला तर महिंद्र रावसाहेब बांडे वय २६ वर्षे रा. वडगाव बांडे ता. दौंड जि. पुणे हा जखमी झाला, अपघातानंतर पोलीस हवलदार किशोर तेलंग व लहानू बांगर यांनी घटनास्थळी धाव घेत पाहणी देखील केली, तर याबाबत सतिश विठ्ठल मेमाणे २६ रा. वडगाव बांडे ता. दौंड जि. पुणे यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी आरणगावचे पोलीस पाटील संतोष लेंडे निवृत्ती व त्यांची अल्पवयीन युवती दोघे रा. आरणगाव ता. शिरुर जि. पुणे या दोघांवर गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप साळुंखे हे करत आहे. आरणगाव येथे पिकअप व दुचाकीचा अपघात घडल्यानंतर पोलीस पाटील संतोष लेंडे यांनी स्वतः शिक्रापूर पोलीस स्टेशन तसेच तळेगाव ढमढेरे पोलीस चौकीमध्ये फोन करुन अपघाताची माहिती दिली असल्याचे देखील पोलिसांनी सांगितले आहे.

### शनिवार वाड्यावर आढळली बेवारस बॅग

शनिवार वाड्याचा संपूर्ण परिसर रिकामा करण्यात आला, सर्वांना तेथून बाहेर पाठवण्यात आले. आणि त्यानंतर बॉम्बशोधक पथकाने तपास सुरू केला. बेवारस बॅगेची कसून तपासणी सुरू असल्याचे समजते. सध्या सुट्टीचे दिवस असल्याने आणि आज वीकेंड असल्याने मोठ्या प्रमाणत लोकं, पर्यटक शनिवारवाडा पाहण्यासाठी आले होते. मात्र बेवारस बॅगेची बातमी ऐकताच एकच घबराट पसरली आणि लोकांनी बाहेर धाव घेतली. सध्या शोधमोहिम सुरू असून शनिवार वाड्याबाहेर पोलीस बंदोबस्त वाढवण्यात आला आहे. सकाळी नियंत्रण कक्षाला एक कॉल आणि शनिवारवाड्यात बेवारस बॅग ठेवली असून त्यामध्ये बॉम्ब आहे, असे फोनवरील व्यक्तीने सांगितले. त्या अनुषंगाने आम्ही सध्या तपास करत आहोत. बॉम्बशोधक पथकही बोलावण्यात आलं आहे. पण आत्तापर्यंत अशी कोणतीही संशयित वस्तू किंवा बॅग इथे आढळून आली नाही. शनिवारवाड्यात आतला संपूर्ण परिसर चेक करण्यात येत आहे. फायर ब्रिगेडची टीमही घटनास्थळी आहे, असे एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले. तो फेक कॉल असू शकतो, असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

### प्रोजेक्ट मॅनेजर अँन्टी करप्शनच्या जाळ्यात

या घराच्या जाहिरातीच्या वेळेस अधिकची रक्कम लागेल याची माहिती नमूद केली नसल्याने तक्रारदार यांना घराचा वाढीव हप्ता भरता आला नाही. यासाठी तक्रारदार यांनी या घराचे फेरवितरन होऊन आरटीजीएस चलन मिळण्यासाठी पुणे गृहनिर्माण क्षेत्र विकास मंडळ (म्हाडा) येथे अर्ज केला होता. तक्रारदार या अर्जाचा पाठपुरावा करत होते. ते म्हाडा कार्यालयातील प्रोजेक्ट मॅनेजर अभिजीत जिचकार यांना भेटले. त्यावेळी जिचकार याने तक्रारदार यांच्याकडे सदनिकेचे फेर वितरण होवून आरटीजीएस चलन देण्यासाठी दोन लाख रुपयांची लाच मागितली. जिचकार लाच मागत असल्याची तक्रार तक्रारदार यांनी एसीबी कार्यालयात केली. एसीबीच्या पथकाने पडताळणी केली असता जिचकार यांनी तक्रारदार यांच्याकडे त्यांची सदनिका पुन्हा वितरित करुन आरटीजीएस चलन काढून देण्यासाठी मुख्याधिकारी म्हाडा, पुणे यांच्याकरीता दोन लाख 20 हजार व स्वत: करीता 50 हजार असे एकूण 2 लाख 70 हजार रुपये लाच मागितल्याचे निष्पन्न झाले. तसेच लाचेची रक्कम साधु वासवानी चौकातील स्टेटस फॅमिली रेस्टॉरंट आणि बार येथे स्वीकारण्याचे मान्य केले. त्यानुसार पथकाने सापळा रचला. तक्रारदार यांच्याकडून लाचेची रक्कम स्वीकारताना अभिजीत जितकार याला रंगेहाथ पकडण्यात आले. आरोपीवर बंडगार्डन पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करुन अटक केली आहे.

### रक्ताचे नमुने बदलले; अल्पवयीन मुलांची ओळख झाली उघड

एकाचे त्याच्या वडिलांसोबत तर दुसऱ्याचा भावासोबत बदलला गेला. पुणे पोलिसांनी कारमध्ये आरोपी अल्पवयीन मुलासोबत असलेल्या आणि त्याच्याच शाळेतील दोन अल्पवयीन मुलांची ओळख उघड केलेली आहे. पण, त्यांच्यावर चुकी केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही. हे तिघेही एकाच वर्गात शिकतात आणि संध्याकाळी त्यांच्या शाळेत फेअरवेल पार्टीला गेले होते. त्यानंतर त्यांनी पार्टीत न थांबण्याचा निर्णय घेतला, त्यामुळे ते पार्टीतून निघाले, नंतर ते कल्याणीनगरमधील पबमध्ये पार्टी करत असल्याचे आढळून आले.

### ‘या’ प्रकरणात कोणतीही लपवाछपवी नाही : अजित पवार

अपघात प्रकरण दडपण्याचा प्रयत्न होत असल्याचे सर्व आरोप फेटाळून लावताना उपमुख्यमंत्री पवार म्हणाले, “ अल्पवयीन मुलाच्या नावाने कोणाच्या रक्ताचे नमुने पुढे करण्यात आले होते, याची चौकशी सुरु आहे. आपघात घडला तेव्हा हसन मुश्रीफ परदेशात होते. ससून रुग्णालय त्यांच्या वैद्यकीय शिक्षण खात्याच्या कक्षेत येते. त्यांनीही संबंधितांच्या चौकशीचे आदेश दिले. उत्पादन शुल्क खात्याचे मंत्री शंभुराज देसाई यांनीही आपल्या खात्याल सूचना दिल्या आहेत. हे प्रकरण सगळ्यांनी गांभीर्याने घेतले आहे. सरकार कोणतीही लपवाछपवी करत नाही.”

### संपूर्ण अग्रवाल कुटुंबाला अटक

त्यानंतर त्यांना अटक करण्यात आली. याप्रकरणी चौकशीसाठी एक समितीची स्थापना करण्यात आली होती. यात या दोघांनी मिळून रक्त नमुन्यात फेरफार केल्याचं समोर आलं होतं. कल्याणीनगर अपघात प्रकरणाला दररोज नवीन वळण मिळत असल्याचं दिसत आहे. याप्रकरणी सुरुवातीला आरोपीच्या वडिलांना ताब्यात घेण्यात आले होते. त्यानंतर चालकाला धमकवल्याप्रकरणी आजोबा सुरेंद्र अग्रवाल याला देखील अटक करण्यात आली. कोर्टाने या दोघांना १४ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. त्यांची याप्रकरणात चौकशी सुरु आहे.

# शेतामधील महागड्या केबल वायर चोरी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** जुन्नर शहरालगतच्या पाडळी कबाडवाडी येथील सुमारे ४० शेतकऱ्यांच्या शेती पंपांच्या महागड्या केबल वायर अनोळखी चोरट्यांनी चोरून नेलेल्या असून या आधीही अशाच प्रकारे केबल चोरीच्या घटना वारंवार घडत असल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. पाडळी कबाडवाडी येथील शरद कबाडी, अरुण पापडे, नवनाथ कबाडी, राजेंद्र पापडे, तान्हाजी ठोसर, प्रताप गोरे, महेंद्र बुट्टे, संतोष कबाडी आदींसह अनेक शेतकऱ्यांच्या शेतामधील महागड्या केबल वायर चोरीची तक्रार पोलिस ठाण्यात देण्यात आली आहे. या भागातील अनेक शेतकऱ्यांच्या कुकडी नदी किनारी शेती करता लागणाऱ्या वीज मोटारी बसविण्यात आले आहेत. या पंपांच्या केबल वायरची वारंवार चोरी होत आहे. दोन तीन दिवसांपूर्वी या भागातील सुमारे ४० शेतकऱ्यांच्या शेती पंपांच्या केबल वायर चोरट्यांनी चोरून नेल्या आहेत. पाडळी कबाडवाडी चे अनेक शेतकऱ्यांनी पोलिस ठाण्यात येऊन वारंवार होत असलेल्या केबल चोरीच्या घटनांबाबत संताप व्यक्त करीत काही संशयितांची नावे पोलिसांना दिली.

## विजयउत्सवाचे झळकले बॅनर

छायाचित्र : विजयकुमार हरिचंद्र




**जेजुरी :** बारामती लोकसभा निवडणूक नुकतीच पार पडली असताना जेजुरीतील एका उत्साही कार्यकर्त्याने अजित पवार गटाच्या उमेदवार विजयी झाल्याचे घोषित करत जेजुरी मोरगाव मार्गावर बॅनर झळकवला आहे.

# कर्नलवाडीत दशक्रिया विधीत अभिनव उपक्रम

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नीरा :** शासनाकडून शतकोटी वृक्षलागवडीची संकल्पना सुरू असून या संकल्पनेला गावागावातून प्रतिसाद मिळू लागला आहे. कर्नलवाडी (ता. पुरंदर) येथे दशक्रिया विधीला एक रोपटे लावून ते जगविण्याची हमी दिवंगत व्यक्तीच्या कुटुंबीयांनी घेण्याची अभिनव संकल्पना करण्यात आली. गावातील तसेच परिसरातील ज्येष्ठ नागरिकांनी पिंपळ वृक्ष लावत या संकल्पनेला खत पाणी घातले. गावातील सांप्रदायिक क्षेत्रातील जेष्ठ जगन्नाथ विष्णूबा निगडे (वय ७८) यांचे नुकतेच निधन झाले.

गावाचे ग्रामदैवत असलेल्या श्री ज्योतिबा मंदिराच्या जडणघडणीत त्यांचा मोलाचा वाटा होता. कर्नलवाडी गावात अखंड हरिनाम सप्ताह सुरु करुन सलग बारा वर्षे त्यांनी तो चालवला होता. संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यात ते नियमित वारकरी होते. त्यांच्या निधनानंतर शनिवारी दशक्रिया विधीला पिंपळ वृक्षाचे रोपण करण्यात आले.

यावेळी ज्योतिबा देवस्थानचे अध्यक्ष रामदास निगडे, कर्नलवाडीचे माजी सरपंच सुधिर निगडे, गुळुंचेचे माजी सरपंच संतोष निगडे, नारायण निगडे, बबनराव ताटे, कांचन निगडे, यात्रा कमेटीचे पंच हणमंत निगडे, पोपट निगडे, जयसिंग निगडे यांसह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. कै. जगन्नाथ निगडे यांच्या स्मरणार्थ त्यांचे जावई शहाजी खराडे, विजय निंबाळकर, सतिश शिंदे, प्रविण माने यांच्या हस्ते दशक्रीविधी दरम्यान पिंपळ वृक्षा लावण्यात आला.

दरम्यान, यापूर्वी माजी गटविकास अधिकारी शहाजी निगडे यांचे वडील कोंडीराम निगडे यांचे निधन झाल्यानंतर त्यांनी या उपक्रमाला सुरुवात केली होती. त्यानंतर सलग आठ वर्ष दरवर्षी ज्येष्ठांच्या निधनानंतर वड, पिंपळ, चिंच, जांभळं अशा देशी वृक्षांची लागवड करण्यात आली आहे. आता दहा ते बारा वृक्ष या परिसरात आहेत. ज्येष्ठ नागरिक व तरुणांनी एकत्र येत या उपक्रमाला प्रतिसाद दिल्याने त्यांचे कौतुक करण्यात आले.

# हायपरटेंशनबाबत जनजागृती

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** १ जून २०२४ संशोधनकेंद्रित जागतिक औषध कंपनी ग्लेनमार्क फार्मास्युटिकल्स लिमिटेडने (ग्लेनमार्क) मे महिना हा ‘हायपरटेंशन जनजागृती महिना‘ म्हणून साजरा केला. ग्लेनमार्कने उच्च रक्तदाबाबत (हायपरटेंशन) जनजागृती पसरविण्यासाठी देशभरातील २५० पेक्षा अधिक शहरे आणि ४०० पेक्षा अधिक रुग्णालयांतील १००० पेक्षा अधिक वैद्यकीय व्यावसायिकांशी भागीदारी केली.

तसेच ४०० पेक्षा अधिक हायपरटेंशन जनजागृती रॅली व तपासणी शिबिरांचे आयोजन केले. वैद्यकीय व्यावसायिक भागीदारांच्या नेतृत्वाखालील सामान्य माहिती देणारे सत्र असे या रॅलींचे स्वरूप होते. त्यांनी उच्च रक्तदाबाशी संबंधित चिन्हे, लक्षणे आणि प्रतिबंधात्मक उपाय यांबाबत सखोल माहिती दिली. याच अनुषंगाने सामान्य लोकांना आपल्या रक्तदाबाची पातळी जाणून घेण्यास मदत करण्यासाठी रक्तदाब तपासणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले.

## पान १ वरून

### निकालाचा काउंट डाऊन; उमेदवारांमधून धाकधूक!

आपला उमेदवार निवडुन आणण्यासाठी पक्षश्रेष्ठींनी घेतलेल्या सभा, शक्तीप्रदर्शनाद्वारे उमेदवारांच्या पाठीशी खंबीर उभे राहून तो उमेदवार निवडून आणला पाहिजे या दृष्टीने केलेला प्रयत्न दिसून आला. कॉंग्रेसकडून राहूल गांधी, प्रियांका गांधी, खर्गे तर भाजपाकडून पंतप्रधान नरेंद्र मोदी भाजप उमेदवारांच्या प्रचारासाठी आले आणि त्यांनी जाहीरसभा घेतली. भाजप कार्यकर्त्यांचा उत्साह दुणावला. प्रचारात कसर ठेवली नाही. निवडणूक जवळ येवू लागली तसतशी प्रचाराला गती आली.एकूणच गेले महिनाभर प्रचाराची रणधुमाळी सुरू राहिली. या दरम्यान जिल्हा प्रशासनानेही मतदान जागृतीबाबत सातत्याने काम केले. विविध संघ-संस्थांनीही मतदान जागृतीसाठी रॅली काढल्या. लोकसभा निवडणुकीचे कामकाज कसे चालते हे पाहण्यासाठी परदेशातील प्रतिनिधी दाखल झाले, हे यंदाच्या निवडणुकीचे वैशिष्ट्य होते. प्रशासनाने निवडणुकीचे गांभीर्य लक्षात घेऊन ठिकठिकाणी तपासनाके उभारून अवैध रक्कम व बेकायदेशीर दारूसाठा मोठ्या प्रमाणात जप्त केला. गेल्या लोकसभा निवडणुकीपेक्षा यंदा मतदानाचे प्रमाण वाढले. मतदारांमध्ये राष्ट्रीय कर्तव्याबाबत निर्माण झालेली जागृती हे याचे फलित म्हणावे लागेल. सर्व उमेदवारांचे भवितव्य मशीन बंद झाले. आता ४ जून रोजी निकाल जाहीर होतील. तोपर्यंत उमेदवारांसह कार्यकर्ते आणि मतदारांची उत्सुकता शिगेला पोहोचणार आहे. शेवटी मतदारराजाने कोणाला कौल दिला, हे या दिवशी समजणार आहे. निवडणुकीमध्ये आपल्या नेत्यांच्या समर्थनार्थ प्रचारासाठी फिरलेल्या कार्यकर्त्यांना निवडणूक झाल्याने दिलासा मिळाला.पहिल्या,दुसऱ्या आणि तिसऱ्या टप्प्यातील मतदानाचा टक्का घसरला होता. परंतु चौथ्या आणि पाचव्या टप्प्यातील मतदानाचा टक्का वाढल्याने सर्वच उमेदवारांना विजयाची आशा दिसू लागली. महाराष्ट्रात गेल्या ३ ते ४ वर्षात पक्ष फोडाफोडीने अक्षरशः राजकारणाचा बट्ट्याबोळ झाला आहे.

निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाल्यापासून सर्वांनाच निकालाची प्रतीक्षा आहे. गेल्या महिनाभरापासून जिकडे-तिकडे फक्त निवडणुकीचीच चर्चा असून, कोणता उमेदवार जिंकेल आणि कोणत्या पक्षाला किती जागा मिळतील, याची गणिते मांडली जात आहेत. काही ठिकाणी पैजा रंगल्या होत्या. २०१९ मध्ये जी समीकरणे होती, तशीच यावेळीही होती. परंतु, यावेळी जातींचे धुव्रीकरण होऊ शकले नाही. त्यामुळे ही निवडणूक एका कुणाच्याच बाजूने झुकली नाही. सत्ताधारी पक्षाबद्दल असलेली नाराजी या निवडणुकीत प्रकर्षाने दिसून आली. एकूणच मतदारांनीच ही निवडणूक हातात घेतल्याने त्याचे श्रेय नेत्यांना घेता आले नाही. कोण निवडून येणार, हे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच किती मताधिक्यांनी निवडून आला, तसेच कोणत्या विधानसभा मतदारसंघात कोणत्या पक्षाला किती मते मिळाली, यावर पुढील राजकीय गणिते अवलंबून असल्याने ही आकडेवारी पाहण्यासाठी मंडळी सावध असणार आहे. यावेळी मतदारांनी शेवटपर्यंत आपला कल कळू न दिल्याने अतिशय चुरशीत मतदान प्रक्रिया पार पडल्याने अंदाज लावणे कठीण झाले आहे. विशेष म्हणजे अनेक गावांत तर मतदारांपर्यंत उमेदवार पोचलेही नव्हते, तरीही मतदार घराबाहेर निघाल्याने उमेदवारांप्रति आस्था होती की रोष, याचा अंदाज बांधणे कठीण झाले आहे. मात्र मतदान वाढल्याने समाधानही व्यक्त होत आहे. त्यामुळे आता सर्व देशवासियांचे या निकालाकडे लक्ष लागले आहे आणि खासदारकीची माळ कुणाच्या गळ्यात पडणार? हे पाहणे आता औत्सुकाचे ठरणार आहे.

‘राष्ट्र संचार’ हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave

Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

SUNDAY EDGE
राष्ट्रसंचार www.rashtrasanchar.com @rashtrasanchar 02•06•2024



# लोकशाहीचा महाउत्सव



**भा**रतातील लोकशाही ही जगातील सर्वात मोठी लोकशाही आहे. १४० कोटी लोकसंख्येच्या देशात होत असलेल्या सार्वत्रिक निवडणुका हा म्हणूनच जगासाठी औत्स्युक्याचा विषय असतो. भारतातील मतदारांची संख्या ९७ कोटी इतकी मोठी असल्याने, येथे पारदर्शक वातावरणात निवडणुका घेणे हे अशक्यप्राय आव्हान भारतीय निवडणूक आयोग पार पाडते.

लोकसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करताना, देशातील सणवार, ऋतू यांचा विचार करून त्यांचे आयोजन करावे लागते. यंदा प्रथमच सात टप्प्यांत मतदानाची प्रक्रिया जाहीर केली गेली. २०१९ मध्ये १० मार्च रोजी वेळापत्रक जाहीर केले गेले होते. ११ एप्रिलपासून सात टप्प्यांत निवडणुका घेतल्या गेल्या, तर २३ मे रोजी मतमोजणी करण्यात आली. त्यात भाजपने ३०३ जागा जिंकत सलग दुसऱ्यांदा सरकार स्थापन केले होते. आता १९ एप्रिल ते १ जून अशी सात टप्प्यांत निवडणूक झाली असून, मतमोजणी ४ जून रोजी होणार आहे. लोकसभेचा कार्यकाळ १६ जून रोजी संपत आहे. त्यापूर्वीच मतमोजणी होऊन नवी लोकसभा अस्तित्वात येईल. भारतात ९७ कोटी एकूण मतदार असून, त्यापैकी ४७.१ कोटी महिला मतदार आहेत. या महिला मतदारांची मते कळीची ठरतील. गेल्या वेळी अमेरिकेत झालेल्या निवडणुकीत चीनने हस्तक्षेप केल्याचा आरोप केला

**लोकसभा निवडणूक '२४**

गेला. माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना पराभव पत्करावा लागल्यानंतर, तेथे मोठ्या प्रमाणात हिंसाचार झाला. राष्ट्राध्यक्ष जो बायडेन हे चीनचे हस्तक असल्याचा आरोप तेथील विश्लेषकांनी केला होता.

**विश्लेषक**
संजीव ओक
राष्ट्रसंचार

भारताने तसे कोणतेही वातावरण नाही. पाश्चात्य माध्यमे भारताबद्दल चुकीचे चित्र मांडण्याचा प्रयत्न करतात. जॉर्ज सोरोसचे हस्तक टूलकिट राबवतात. त्यातून काही प्रमाणात मतदार भ्रमित होतातही. ऑल आईज ऑन राफाह या नावाने दोन दिवसांपूर्वीच एक हॅशटॅग ट्रेंडिंग होता. गाझा पट्टीत इस्रायलने हमास या दहशतवादी संघटनेविरोधात राफाहमध्ये निर्णायक लष्करी कारवाई सुरू केल्यानंतर, जगभरातील पॅलेस्टिनी समर्थकांना सक्रीय केले गेले. त्यातूनच भारतातील सेलिब्रेटींनी एक ठराविक मजकूर आणि छायाचित्र त्यांच्या सोशल मिडियावर पोस्ट केली. अशाच पद्धतीने चुकीच्या गोष्टींना मांडले जाते. सोरोसने मोदी सरकार हे कसे उद्योगपतींचे हित जोपासणारे आहे, हे दाखवण्यासाठी मोहीम हाती घेतली होती.

तृणमूल काँग्रेसच्या महुआ मोइत्रा यांच्या लोकसभेच्या खात्याची गोपनीय माहिती विदेशातील पत्रकारांना रोख रक्कमेच्या मोबदल्यात दिली गेली. त्या माहितीचा दुरुपयोग करत लोकसभेत काही प्रश्न उपस्थित करण्यात आले. हे प्रकरण उघडकीस आल्यानंतर, मोइत्रा यांना निलंबितही केले गेले. म्हणजेच, भारतीय लोकशाही प्रक्रियेशी कोणी छेडखानी केली तर ती त्याला महागात पडते. हेच या उदाहरणावरून स्पष्ट होते.

## मोदी की हमी

**लोकसभा** निवडणुकीत पंतप्रधान मोदी यांची हमी, अयोध्येतील श्रीराम मंदिर, भाजप संविधान बदलणार, जातीय जनगणनेची काँग्रेसने केलेली मागणी हे प्रचारातील प्रमुख मुद्दे राहिले. पंतप्रधान मोदी हेच सत्ताधारी भाजपचे मुख्य प्रचारक होते. मोदी यांची हमी यावरच त्यांचा प्रचाराचा भर राहिला. भारताने गेल्या १० वर्षांत केलेली कामगिरी तसेच देशभरात राबवलेल्या समाज कल्याणाच्या योजना यांच्या जोरावर त्यांनी प्रचार केला. अयोध्येत श्रीराम जन्मभूमीवर उभारण्यात आलेल्या भव्य श्रीराम मंदिराचे झालेले लोकार्पण हाही भाजपच्या प्रचाराचा भाग होता. काँग्रेसने मंदिराविरोधात घेतलेली भूमिका, काँग्रेस आघाडीतील घटक पक्षांनी हिंदू विशेषतः सनातन धर्माच्या विरोधात केलेली टीका ही प्रचारात ऐरणीवर आली. तसेच काँग्रेस मुस्लिमांच्या तुष्टीकरण करत असल्याचा आरोप भाजपने केला. त्यानंतर, प्रचाराची दिशा बदलली. भारतात बेरोजगारी वाढत असल्याचा काँग्रेसने आरोप केला. तसेच भाजपच्या कार्यकाळात महागाई वाढल्याचा आरोपही काँग्रेसने केला. मात्र, देशातील गरिबांची संख्या लक्षणीयरित्या कमी झाल्याचे जागतिक बँक, संयुक्त राष्ट्रसंघ यांच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे. जगातील सर्वात मोठी पाचवी अर्थव्यवस्था म्हणून भारत गेल्या १० वर्षांच्या काळात उदयास आला.

देशाची वाढ सर्वांचे अंदाज चुकवत वेगाने होत असून, जगातील सर्वाधिक वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था असा तिचा लौकिक आहे. हे गेल्या १० वर्षांतच साध्य झाले. देशात लागू झालेली जीएसटी करप्रणाली प्रत्येक महिन्याला संकलनाचे नवनवे विक्रम प्रस्थापित करत आहे. जातनिहाय जनगणना हा वादग्रस्त मुद्दा असला, तरी प्रचारात काँग्रेसने त्यावरच भर दिला. महिलांसाठी भाजपने राबवलेल्या उपाययोजना या गेम चेंजर म्हणून भूमिका बजावतील. महिलांना दिलेले राजकीय आरक्षण, लखपती दिदी सारख्या भाजपने आणलेल्या योजना कळीच्या ठरणार आहेत. तिहेरी तलाकसारखी चुकीची प्रथा भाजपने रद्द केली. त्यामुळे महिला मतदारांची भूमिका निर्णायक राहील. नवी दिल्ली येथे काँग्रेस कार्यकारिणीच्या बैठकीत पक्षाचा जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला होता, त्यात २५ हमी काँग्रेसने दिल्या. मोदी की गॅरेंटी याला काँग्रेसी हमी असे याकडे पाहता येईल. त्याचवेळी २००४ मध्ये ज्याप्रमाणे भाजपची इंडिया शायनिंग ही मोहीम जशी फसली होती, तसाच प्रकार आता घडेल, असा दावा काँग्रेसने केला आहे. २०२४ मध्ये भाजप विजयापासून दूर राहील, असे काँग्रेसी अध्यक्षांचे म्हणणे आहे. म्हणूनच मोदी यांनी दिलेली हमी आणि काँग्रेसी हमी यात नेमका कोणता फरक आहे, ते समजून घेणे गरजेचे आहे. भाजपने गेल्या १० वर्षांत जाहीरनाम्यात दिलेली सर्व आश्वासने पूर्ण केली आहेत. काश्मिरमधील वादग्रस्त कलम ३७० हटवणे असो वा अयोध्या येथील श्रीराम जन्मभूमीवर भव्य मंदिराची उभारणी करेल असेल. कोणताही धाडसी निर्णय घेण्यात केंद्रातील सरकारने मागेपुढे पाहिले नाही. प्रसंगी स्वपक्षीय कार्यकर्तेही विरोधात मत व्यक्त करतील, याची पर्वा न करता, भाजपने हे निर्णय प्रत्यक्षात आणले.

## विकासाला चालना देणारे मोदी सरकार



**गेल्या** १० वर्षांच्या कालावधीत भारताने केलेली कामगिरी देशाला जागतिक पटलावर महत्त्वाचे स्थान देणारी ठरली. भारतीय अर्थव्यवस्थेच्या वाढीचा वेग हा जगभरातील विश्लेषकांना आश्चर्यचकीत करणारा ठरला असून, वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था असा तिचा लौकिक आहे. देशभरातील वाढत्या पायाभूत सुविधा, रेल्वेसह सर्वच क्षेत्रात झालेल्या लक्षणीय सुधारणा देशाच्या अर्थकारणाला बळ देणाऱ्या ठरल्या. भाजपने आपल्या जाहीरनाम्यातील सर्वच आश्वासनांची पूर्तता केल्याचे दिसून येते. काश्मिरमधील वादग्रस्त कलम ३७० हटवणे असो वा अयोध्यातील श्रीराम जन्मभूमीवर मंदिर उभारणी करणे असेल, सर्वच आश्वासनांची पूर्तता गेल्या १० वर्षांत भाजपने केली. देशात समान नागरी कायदाही लागू होणार असून, पाकिस्तान, अफगाणिस्तान, बांगलादेश येथील अल्पसंख्यकांना भारताचे नागरिकत्व देणारे नागरिकत्व सुधारणा विधेयक असो सर्वच आश्वासने प्रत्यक्षात आली आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताचे नाव आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर आदराने घेतले जात आहे. भारतीय नागरिकांना विदेशात सन्मानाची वागणूक मिळताना दिसून येते. अमेरिकेसह जगभरात भारतीयांचा डंका जोरात वाजत आहे. रशिया-युक्रेन युद्धाला तोंड फुटल्यानंतर, भारताने आपल्या नागरिकांना परत आणण्यासाठी दोन्ही देशांना तात्पुरता युद्धविराम करण्याची घोषणा केली. रशिया आणि युक्रेन या दोन्ही देशांनी ती मान्य करत २४ तास एकमेकांवर हल्ला केला नाही. त्या कालावधीत भारताने आपल्या नागरिकांना तेथून सुरक्षितपणे बाहेर काढले. जी-२० शिखर परिषदेचे यशस्वी आयोजन भारत सरकारने केले. भारताच्या भूमिकेला आंतरराष्ट्रीय स्तरावर महत्त्व प्राप्त झाले आहे.

भारतीय अर्थव्यवस्था आज पाचव्या क्रमांकावर असून, २०३० पर्यंत ती जगातील तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था म्हणून उदयास आली असेल, असा विश्वास जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी यांच्यासह विविध आंतरराष्ट्रीय संस्थांनी व्यक्त केला आहे. पायाभूत सुविधांसाठी विक्रमी तरतूद अंतरिम अर्थसंकल्पात करण्यात आली असून, २०४७ मध्ये भारत स्वातंत्र्याची शतक महोत्सव साजरा करत असताना, भारत हा विकसित भारत म्हणून ओळखला जावा, यासाठी आतापासूनच प्रयत्न केले जात आहेत. विकसित भारत यासाठी केंद्र सरकार काम करत असून, तेच भाजपच्या रालोआसाठी विजयाचे प्रमुख कारण ठरणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे केवळ भारताचे राहिले नसून, जागतिक नेते म्हणून त्यांची ओळख प्रस्थापित झाली आहे. म्हणूनच, पुन्हा एकदा रालोआने त्यांच्याच चेहऱ्यावर ही निवडणूक लढवली.

## एक्झिट पोल कितपत विश्वासार्ह?




**एक्झिट पोलच्या** अंदाजावर डोळे झाकून विश्वास ठेवण्यासारखी परिस्थिती आता राहिली नसल्याचा अनुभव, गेल्या काही निवडणुकांच्या एक्झिट पोलवरून आपण सगळ्यांनी घेतला आहे. अलीकडच्या काळात एक्झिट पोल आणि प्रत्यक्ष निकाल यात तफावत असल्याचे दिसून आले आहे. २०१४ तसेच २०१९ मध्येही देशाचा कौल नेमका कोणाला, हे नेमकेपणाने सांगण्यात संस्था अपयशी ठरल्या होत्या. २०१९ मध्ये, एक्झिट पोलनुसार सरासरी भाजपप्रणित रालोआला ३०६ जागा मिळतील, तर काँग्रेसच्या यूपीएला १२० जागा मिळतील, असे म्हटले होते. त्यावेळी रालोआ ३५२ तर भाजप ३०३ जागांवर विजयी झाली. यूपीएला ९३ आणि काँग्रेसला ५२ जागा मिळाल्या होता.

२०१४ मध्ये भाजपच्या नेतृत्वाखालील रालोआ सत्तेवर आले. त्याचा अंदाज लावण्यात एक्झिट पोल अयशस्वी ठरले होते. रालोआ सत्तेवर येत आहे, हे त्यांनी सांगितले होते. तथापि, भाजपला बहुमत मिळणार का, याचा अंदाज चुकला होता. त्यावेळी एक्झिट पोलने रालोआला २८३ जागा तर यूपीएला १०५ जागा मिळतील, असे म्हटले होते. प्रत्यक्षात रालोआ ३३६ तर भाजप २८२ जागा, यूपीए ६० आणि काँग्रेसला ४४ जागांवर विजय मिळाला होता.

आता २०२४ मधील लढत ही रालोआ आणि यूपीए यांच्यातील नसून, ती रालोआ आणि देशातील विरोधकांची इंडिया आघाडी यांच्यात होत आहे. निवडणुकीच्या अगोदर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रालोआसाठी ४००+ जागांचे लक्ष्य ठेवले, तर भाजप स्वबळावर ३७० जागांपेक्षा जास्त जागा मिळवेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. आता काँग्रेसने एक्झिट पोलवरील चर्चेत सहभागी न होण्याचा निर्णय घेत, प्रत्यक्षात निकाल जाहीर होण्यापूर्वीच पराभव मान्य केला का? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

## संविधान कोणी बदलले?

**सार्वत्रिक** निवडणुकीच्या सातही टप्पांत भाजप पुन्हा सत्तेवर आले तर संविधान बदलणार, असा प्रचार इंडिया आघाडीने केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अबकी बार ४०० पार, हा जो नारा दिला आहे, संविधानात बदलण्यासाठी असा आक्रमक प्रचार आघाडीने केला. बहुमतासाठी २७२ जागांची आवश्यकता असताना, भाजपला ४०० जागा कशासाठी हव्या आहेत, असा प्रश्न म्हणूनच काँग्रेससह सर्वच विरोधी पक्षांनी उपस्थित केला. त्याला प्रत्युत्तर देताना, भाजपने संविधानात बदल काँग्रेसनेच केले, असे ठळकपणे सांगितले. काँग्रेसने वेळोवेळी घटनेत केलेले बदल भाजपने जनतेला दाखवून दिले. संविधानाच्या प्रश्नावर जनमत आपल्या बाजूने वळवण्यात, इंडिया आघाडी यशस्वी ठरली का, याचे उत्तर ४ जून रोजीच मिळालेले असेल. मात्र, आजच्या तारखेला तरी भाजपच्या रालोआचे पारडे जड असल्याचे दिसून येते. भाजप सलग तिसऱ्यांदा सरकार स्थापन करणार असल्याचे संकेत मिळत आहेत.

NEWS ANALYSIS

*Is Modi Worried? India's Long-Deflated Opposition Finds Some Momentum.*

After setting a very high bar for his party in the election, Prime Minister Narendra Modi often appears on the defensive as the voting nears its end.

### न्यूयॉर्क टाईम्सचा दिशाभूल करणारा दावा

न्यूयॉर्क टाईम्सने नुकत्याच केलेल्या वार्तांकनात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पुन्हा सत्तेवर येणे अवघड असल्याचे मत व्यक्त केले आहे. ४०० पेक्षा जास्त जागा जिंकण्याचा दावा केलेल्या पीएम मोदी यांना प्रत्यक्षात सरकार स्थापन करताना दमछाक होत असून, सत्ताधारी भाजपला घाम फुटला असल्याचे मत न्यूयॉर्क टाईम्सच्या वार्तापत्रात करण्यात आला. भाजप सत्ता स्थापन करण्यासाठी मुस्लिमांच्या विरोधात जनभावना व्यक्त करत असल्याचा आरोप या वृत्तपत्राने केला आहे.

## घराणेशाही सांभाळणारी इंडिया आघाडी



**गेल्या** वर्षी ऑक्टोबर महिन्यात इंडिया आघाडी प्रत्यक्षात आली ती केवळ भाजपचा विजयरथ रोखायचा याच उद्देशाने. तसेच आपापला सुभा आणि घराणेशाही शाबुत ठेवायची म्हणूनच. लोकसभेत पराभव होण्याचे स्पष्ट संकेत मिळू लागल्यानेच, आघाडीतील नेत्यांची आतापासूनच फुटीची तयारी सुरू झालेली दिसून येते.

कर्नाटक येथे गेल्या वर्षी झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजप विरोधात काँग्रेसने सगळ्या विरोधकांना एकत्र केले. कर्नाटकचे निकाल जाहीर झाल्यानंतर, भाजपला रोखण्यासाठी म्हणून २८ विरोधी पक्ष एकत्र आले. मात्र, देशासाठी कोणतीही ठोस योजना आघाडीने जाहीर केली नाही. आपापला सुभा आणि घराणे वाचवणे हा त्यांचा समान किमान कार्यक्रम राहिला. म्हणूनच, आघाडीतील घटक पक्षांनी याकडे फारशा गांभीर्याने याकडे पाहिले नाही. एकीकडे भाजप २०२९ च्या निवडणुकांच्या तयारीला लागलेला असताना, विरोधक मात्र आत्ममग्न होते. विरोधकांची आघाडी मात्र पंतप्रधानपदाच्या उमेदवाराचे नाव जाहीर करायलाही कचरत होती. हे नाव जाहीर झाले तर विरोधक फुटतील, अशी काँग्रेसला भीती वाटत होती. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी तसे विधानही केले होते.

जानेवारी महिन्यात जेव्हा जागावाटपाचा मुद्दा ऐरणीवर आला, तेव्हा आघाडीतील पक्षांची मानसिकता स्पष्ट झाली. तृणमूल काँग्रेसच्या ममता बॅनर्जी यांनी काँग्रेससाठी पश्चिम बंगालमध्ये एकही जागा देण्यास नकार दिला, तर अरविंद केजरीवाल यांनीही पंजाबमध्ये काँग्रेसला सोबत घेण्यास नकार दिला. बिहारमध्ये नितीश कुमार यांनी आघाडीच्या स्थापनेसाठी पुढाकार घेतला होता. नितीश कुमार आघाडीला धक्का देत, भाजपत दाखल झाले. मल्लिकार्जुन खर्गे, शरद पवार हे तुलनेने ज्येष्ठ राजकारणी. त्यांनाही जनमताचा कानोसा घेण्यात अपयश आले असेच म्हणावे लागेल. रणनीतीकार प्रशांत भुषण यांनी आघाडीने निर्णय घेण्यास उशीर केला, असेच म्हटले आहे. म्हणूनच, भाजप पुन्हा एकदा सत्ता स्थापन करेल, अशा शब्दांत प्रशांत भुषण यांनी आघाडीचे राजकीय भवितव्य वर्तवले आहे.

## आंतरराष्ट्रीय माध्यमांची भूमिका

**भारतात** लोकशाहीची गळचेपी होत असून, येथील अल्पसंख्यक धोक्यात आले असल्याचे चुकीचे वार्तांकन काही पाश्चात्य माध्यमे करताना दिसून येतात. तशातच अमेरिका भारतातील निवडणुकीवर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप रशियाने केला. त्यानंतर पाश्चात्य माध्यमांची भूमिका ऐरणीवर आली.

गेल्याच महिन्यात भारताने अमेरिकेच्या निर्बंधांचा विचार न करता, इराणमधील चाबहार बंदर घेतले. अमेरिकेने भारताला सुनावण्याचा प्रयत्न केला असता, भारताने अमेरिकेला चोख प्रत्युत्तर दिले. भारताच्या या बदलत्या मानसिकतेने अमेरिका अस्वस्थ झाली असल्याचे मानले जाते. भारतात आपल्याला मानणारे सरकार हवे ही पाश्चात्य मानसिकता आहे. त्याला छेद देण्याचे काम गेल्या १० वर्षांत झाले. म्हणूनच, भारतात लोकशाही धोक्यात आहे, अल्पसंख्यांकांच्या जिवाला धोका असल्याचे चुकीचे वार्तांकन सातत्याने केले गेले. भारतातील एखादी जरी घटना घडली तरी त्यावर भाष्य करणारी ही माध्यमे अमेरिकी भूमिकेवर कोणतेही प्रश्नचिन्ह उपस्थित करताना दिसत नाहीत. भारतातील आंदोलनांवरून भाष्य करणारी माध्यमे अमेरिकेतील पॅलेस्टिनींना समर्थन करणारी आंदोलने पोलिसांनी बळाचा वापर करून मोडून काढली, तेव्हा गप्प बसली. भारताने तत्परतेने अमेरिकेला आरसा दाखवला होता. आताही परराष्ट्र व्यवहारमंत्री एस जयशंकर यांनी पाश्चात्य माध्यमांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. भारतातील अंतर्गत व्यवहारांत अमेरिका हस्तक्षेप करत असल्याचा आरोप रशियाने केला आहे.

# सावधान!! सायबर चोरट्यांची नवी शक्कल "डिजिटल अरेस्ट"!






## सायबर क्राईम

व्यंकटेश कल्याणकर

राष्ट्रसंचार

एके दिवशी तुम्हाला एखाद्या कस्टम अधिकाऱ्याचा, पोलिसांचा, अंमलबजावणी संचालनालयाच्या (ईडी) किंवा तत्सम अधिकाऱ्याचा व्हिडिओ कॉल किंवा ऑडिओ कॉल येऊ शकतो. तुम्ही परदेशात ड्रग किंवा तत्सम बंदी असलेली वस्तू पाठवली असल्याचे भासवले जाऊ शकते. तुमचा आधारकार्ड क्रमांक आणि अन्य खाजगी माहिती अचूकपणे सांगून तुमची खात्री पटवली जाऊ शकते. आणखी खात्री करण्यासाठी एखाद्या पोलीस स्थानकात येण्याबाबतही कळवले जाऊ शकते. आणि अखेर हे प्रकरण मिटवण्यासाठी विशिष्ट रकमेची लाच मागितली जाऊ शकते. जोपर्यंत ठरलेली रक्कम दिली जात नाही; तोपर्यंत तुम्हाला डिजिटल अटक केले असल्याचे सांगून तुम्ही व्हिडिओ कॉल बंद करू शकत नाहीत; बंद केल्यास आणखी कडक कारवाई केली जाईल अशी धमकी दिली जाऊ शकते. तेव्हा तुम्ही समजून जा की हा प्रकार सायबर गुन्ह्याचा नवा प्रकार आहे. काय आहे हा प्रकार त्याबाबत या लेखात प्रकाश टाकला आहे. नव्या कल्पनांचा आणि त्यास पूरक तंत्रज्ञानाचा गैरवापर करून फसवण्याच्या बाबतीत सायबर गुन्हेगार प्रचंड हुशार बनत चालले आहेत. तंत्रज्ञानातील नवसाक्षरांना अगदी सहजपणे आपल्या जाळ्यात ओढून बसल्याजागी लाखो रुपये कमावण्याचे प्रलोभन सायबर गुन्हेगारांना अधिक प्रोत्साहित करत आहे. "डिजिटल अरेस्ट" किंवा "डिजिटल हाऊस अरेस्ट" हा त्यातील एका नवा आणि अनोखा प्रकार आहे.

### काय आहे डिजिटल अरेस्ट?

- या प्रकारात सायबर गुन्हेगार आपण सार्वजनिकरित्या शेअर केलेली माहिती संकलित करतात. त्यामध्ये आपला संपर्क क्रमांक, पत्ता (शहर), ईमेल आयडी , आधार क्रमांक आणि इतर माहितीचा समावेश असू शकतो. ही माहिती घेऊन आपल्याला (ज्याला फसवायचे आहे त्याला) व्हिडिओ कॉल केला जातो. सीबीआय किंवा एनआयए किंवा पोलीस स्थानक किंवा सर्व एकत्र किंवा तत्सम सरकारी अधिकारी सरकारी कार्यालयातून बोलत असल्याचे सांगितले जाते. तसेच बोलणारा व्यक्ती गणवेशात असल्याचे दाखवले जाते. या टोळीने आपल्या माहितीचे विश्लेषण करून ठरवलेले नाट्य केले जाते. उदाहरणार्थ तुमचे अमुक पार्सल अडकले आहे त्यात ड्रग्स आहेत किंवा तुमच्या नावे असलेली पिशवी सापडली असून त्यात अवैध पासपोर्ट, अन्य गोष्टी आहेत किंवा वेगळा काहीतरी बनाव केला जातो. हे सगळं तुम्हाला व्हिडिओ कॉलद्वारे सांगितले जाते. खात्री पटवण्यासाठी एखाद्या पोलीस स्थानकात येण्याची सूचना केली जाते. कॉलमध्ये गुंतवत विश्वास ठेवावा इतपत खात्री पटवण्याचा प्रयत्न केला जातो.

### गुन्ह्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर

- "डिजिटल अरेस्ट" प्रकरणात विश्वासार्हता पटावी यासाठी सायबर गुन्हेगार कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करत आहेत. त्यामध्ये एखाद्या अधिकाऱ्याचा आवाज किंवा प्रतिमा वापरणे तसेच व्हिडिओ कॉल दरम्यान एखादी वस्तू पीडित व्यक्तीला दाखवणे. तसेच एखादे पोलीस स्थानक किंवा संबंधित शासकीय कार्यालय दाखवण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर केला जात आहे.

**हे लक्षात ठेवा :** लाच घेणाऱ्या व्यक्ती कोणताही पुरावा मागे न ठेवत नाही. लाच म्हणून घेतलेली रक्कम शक्यतो रोखीत एखाद्या मध्यस्थांमार्फतच स्वीकारतात. कधीही व्हिडिओ कॉल करून बँक खात्यात पैसे पाठविण्यास सांगितले जात नाहीत.

- "डिजिटल अरेस्ट" ही संकल्पना अस्तित्वात नाही. ती सायबर गुन्हेगारांनी तयार केलेली संकल्पना आहे.

**आपण काय करावे? :** शक्यतो सोशल मीडियाद्वारे आपली अत्यंत खाजगी माहिती आणि घटना शेअर करू नयेत.

- असा बनावट कॉल आल्यास गडबडून न जाता शांतपणे बोलणाऱ्या व्यक्तीला ओळखपत्र आणि इतर पुरावे मागावेत. त्यानंतर वकिलाला घेऊन जवळच्या पोलीस स्थानकात पोहचत असल्याचे कळवावे.
- ज्या क्रमांकावरून कॉल आला आहे तो क्रमांक जतन करून जवळच्या पोलीस स्थानकात तक्रार करावी.

# खाकी वर्दीतील बळीराजा






## सेवानिवृत्त पोलीस शेतकऱ्यांची गाथा

## सक्सेस स्टोरी

किशोर नागोराव नावंदे

राष्ट्रसंचार

सेवानिवृत्त पोलीस निरीक्षक, सदस्य बाल कल्याण समिती, नांदेड

मौजे कृष्णूर ता. नायगांव जि. नांदेड येथील सेवानिवृत्त पोलीसस निरीक्षक यांनी शेतात केशर अंबा व लिम्बोंनीची सेंद्रिय पध्दतीने फळबाग करीत असल्याचे दिसून आले दैनिक सकाळच्या अग्रोवन टिमने प्रत्यक्ष शेतावर जाऊन शेतीची व फळ बागेची पाहणी केली. प्रत्यक्षात शेतात केशर अंब्याचे ४०० झाडे लावण्यात आले आहे व अंब्यामध्ये ज्या ठिकाणी अंब्याचे झाड आले नाही त्याठिकाणी लिंम्बोणीचे १२५ झाडे लावलेली आहे. शेती ही मध्यम वृत्तीची असून शेतीसाठी पाण्याचा स्त्रोत हे बोरचे पाणीच आहे त्यावर ते त्याची फळबाग करतात. किशोर नागोराव नावंदे हे पोलीस खात्यात वरीष्ठ पोलीस, निरीक्षक म्हणून पुणे येथून सेवानिवृत्त झाले आहे. त्यांचे मुळ गांव कृष्णूर ता. नायगांव जि. नांदेड हे आहे त्यांचे सातवी पर्यतचे शिक्षण गावात झाले व मॅट्रीक पर्यतचे शिक्षण संगरोळी येथे झाले व उर्वरीत शिक्षण नांदेड येथे झाले आहे. ते उच्च शिक्षीत आहेत पोलीस खात्यात सेवा करतांना त्यांना अनेक पारितोषक व बक्षीस मिळाले आहे. सन दिनांक ३० सप्टेंबर १९९३ मध्ये महाभंयकर किल्लारीला भुंकप झाला त्यावेळेस ते पोलीस, स्टेशन किल्लारी येथे कार्यरत होते. त्यांनी भुंकपाची माहिती सर्व वरीष्ठांना दिली .भुंकपात आलेल्या अनुभवाच्या आधारे त्यांनी किल्लारी भुंकपाचा साक्षीदार या नावाचे पुस्तक लिहीले आहे. त्यांनी पोलीस खात्यात एकूण ३२ वर्षे सेवा केली आहे. या सेवेच्या काळात त्यांनी लातूर, परभणी, हिंगोली, औरंगाबाद, सोलापूर व पुणे येथे नोकरी केली आहे. शेवटी दिनांक ३१ जानेवारी २०२० रोजी वरीष्ठ पोलीस, निरीक्षक म्हणून पोलीस आयुक्तालय पुणे येथून सेवा निवृत्त झाले. तसे ते पुणे येथे स्थाईक झाले असले तरी त्यांच्या अंगी जन्मदाच शेतकऱ्याचा मुलगा असल्यामुळे लहानपणापासून शेतीकडे ओढ होती. किल्लारी, माळशिरस, फुल्लंब्री, पैठण या भागात नोकरी करीत असतांना, तेथे करीत असलेल्या शेतकऱ्यांचा त्यांना हेवा वाटत असे. आपण पण अशी शेती करावी असे त्यांच्या मनात नेहमी येत होते. अनेकवेळा त्यांनी आपल्या शेतात बोर मारले पण पाणी कमी प्रमाणात लागले. पाण्याचे इतर काही मार्ग नव्हता त्यामुळे बारमाई शेती करणे शक्य नव्हते. सन २०१४ मध्ये त्यांची नेमणूक पोलीस स्टेशन पंढरपूर जि. सोलापूर येथे झाली त्यादरम्यान ते गावाकडे सुट्टीवर आलो व श्री. विठ्ठल रुक्मीनीचे नांव घेऊन शेतात बोर मारला त्यास देवांच्या आर्शिवादाने ३ इंच पाणी लागले. त्यानंतर बारमाई शेती करण्याचे व निवृत्तीनंतर एक शेती व्यवसाय करण्याचे मार्ग दिसला अनेकाची चर्चा केली पण नोकरीमुळे प्रत्यक्ष शेती करणे शक्य नव्हते आणि जमीन ही मध्य प्रतीची असल्यामुळे ऊस, केळी दाक्षे, असे पिक घेणे शक्य नव्हते. शेवटी विचार करुन केशर अंब्याची लागवड करण्याचे ठरविले. त्याप्रमाणे केशर अंबा लागवडीचे ठेक्केदारांला ठेका देवून त्यांच्या मदतीने कोकणातून अंब्याचे रोप मागवून व त्यांच्या मार्गदर्शनाखाली १० x १० फुटावर २ x २ चे खडे करुन त्यामध्ये काळी माती कंपोष्ठ खंत सेंद्रिय खत मिक्स करुन ७०० अंबाची लागवड केली. ड्रिप करण्यात आली व त्यद्वारे पाणी देण्यास सुरुवात केली. नोकरीमुळे सहा- सहा महिने गावी जाणे शक्य नव्हते. परंतु शेतातील गड्यांनी योग्य ती काळजी घेतली नाही त्यामुळे जवळ पास ३०० झाडे जळून गेली. शेवटी आहे ती झाडे जगवण्यासाठी खुप प्रयत्न करुन नोकराच्या जिवावर फळबाग जिवंत ठेवली. सेवानिवृत्तनंतर त्यांनी स्वतः शेतीकडे लक्ष देण्यास सुरुवात केली व अनेक तज्ञांच्या मार्गदर्शनाखाली स्वतः अंब्याची काळजी घेतली. मागील चार वर्षापासून अंब्याला फळे येतात. दरवर्षी वाढत्या क्रमाने फळाची लागवड वाढत आहे. यावर्षी जवळपास दोन लाखाचे अंबा विक्रीतून उत्पन्न होईल असे वाटते. प्रथमच कृष्णूरचा केशर अंबा या नावाने बॅड्रींग करुन बॉक्स पॅकिंगच्या माध्यमातून बाजारात विक्रीसाठी ते उतरले आहोत. एकंदरीत फळ बागेचे उत्पन कमी अगर जास्त होईल पण सेवा निवृत्तीनंतरचा वेळ शेतात जातो त्यानिमित्ताने आरोग्य उत्तम राहते. गांवाशी नाळ जुळून राहते. त्यामुळे एक प्रकारचे मानसिक समाधान मिळत असल्याचे ते म्हणाले.





# कलेचा सच्चा उपासक - विजय भिसे

**पिंपळे सौदागर येथील कलाप्रेमी उद्योजक म्हणून विजय भिसे हे नाव चांगलेच परिचित आहे. पिंपरी चिंचवड कल्चरल फाऊंडेशन या आपल्या संस्थेच्या माध्यमातून वैविध्यपूर्ण सांगितिक उपक्रम, समाजप्रबोधनपर व्याख्याने, साहित्यिक, कलावंतांच्या मुलाखती घेणाऱ्या या व्यक्तिमत्वाविषयी...**



विजय न्यायाधीश

राष्ट्रसंचार



पुण्याजवळील पिंपरी - चिंचवड हे उपनगर उद्योग नगरी म्हणून जसे विकसित झाले आहे त्यानुसार आता सांस्कृतिकदृष्ट्याही या शहराने चांगलेच बाळसे धरले आहे. नाटक, संगीत मैफिली, संगीत महोत्सव, विविध कला स्पर्धा , नृत्य अशाप्रकारचे उपक्रम या भागात सातत्याने राबविले जात आहेत. एकूणच पिंपरी - चिंचवडची सांस्कृतिक चळवळ वाढीस लावण्यासाठी ज्या काही संस्था, व्यक्ती आपापल्यापरिने योगदान देत आहेत त्यामध्ये विजय भिसे आणि त्यांची "पिंपरी - चिंचवड कल्चरल फाऊंडेशन" या संस्थेचे नाव अग्रक्रमाने पुढे येते. एकीकडे औद्योगिक आणि सामाजिक क्षेत्रात कार्य करीत असताना सांस्कृतिक बांधिलकीची जाण ठेऊन विजय भिसे हे सातत्याने कलेचा प्रसार, प्रचार आणि संवर्धन करण्याच्या दृष्टीकोनातून आपल्या संस्थेद्वारे विविध उपक्रम हाती घेताना निदर्शनास येतात. दिवाळी पहाट, छोट्या मोठ्या स्वरुपातील संगीत मैफिली, समाज प्रबोधनपर व्याख्याने, कलावंतांच्या मुलाखती अशा वैविध्यपूर्ण उपक्रमाव्दारे सांस्कृतिक चळवळ वाढीस लावण्यासाठी ते कायम प्रयत्नशील असतात. सांस्कृतिक, साहित्यिक उपक्रमाव्दारे कलेच्या माध्यमातून पिंपरी - चिंचवड मधील रसिकांची अभिरुची संपन्न करण्याचे विजयजींचे हे कार्य निश्चितच मोलाचे आहे. कलावंत आणि रसिक यांच्यातील दुवा म्हणून आयोजक या नात्याने उदयोन्मुख कलावंतांना व्यासपीठ मिळवून देणे, प्रतिथयश कलावंतांच्या कलेचा रसिकांना आस्वाद मिळवून देणे , आणि त्यासोबतच कलाकारांच्या कलेला प्रतिसाद देत पुरस्काराच्या रुपाने त्यांचा सन्मान करण्याचे मोठे काम ते पिंपरी - चिंचवड कल्चरल फाऊंडशनतर्फे करत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून प्रख्यात अभिनेत्री आणि दिग्दर्शिका मृणाल कुलकर्णी हिला यंदा "कलाविभूषण "हा पुरस्कार देऊन विजय भिसे यांनी तिला सन्मानित केले. मृणालच्या आधी सुप्रसिद्ध गायिका सावनी रविंद्र आणि "सैराट" फेम नागराज मंजुळे यांना आपल्या संस्थेद्वारे विजयजींनी "कलाविभूषण" पुरस्कार देऊन सन्मानित केलेले आहे. एक यशस्वी उद्योजक, सामाजिक कार्यकर्ता, कला, साहित्य आणि संगीताची उत्तम जाण असलेले व्यक्तीमत्व म्हणून ओळखले जाणारे विजय भिसे हे पिंपळे सौदागर येथील रहिवासी असले तरी संपूर्ण पिंपरी - चिंचवड परिसरात सांस्कृतिक चळवळीला चालना देण्याचे काम ते ज्या निष्ठेने आणि तळमळीने करीत आहेत ते निश्चितच वाखाणण्याजोगे आहे.

# पाणी पैश्यासारखं वापरा... आणि पैश्यासारखं जपा

**सध्याची महाराष्ट्राची लोकसंख्या इतर राज्यापेक्षा जास्त आहे. कारण नोकरी उद्योग इत्यादी कारणामुळे इतर राज्यातून महाराष्ट्रात स्थालांतरित झालेल्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहेत. गावांचं शहरात रूपांतर होत असताना उंच इमारती, मोठमोठाले कारखाने अन त्यांना लागणारं पाणी या प्रश्नांपुढे आपली आहे ती धरणे कमी पडू लागली आहेत. टँकरचं जाळं शहरात असं विणलं गेलंय की त्यामुळे भूजलातील पाणीदेखील आटत चाललयं. शहरीकरणाच्या नादात माणसाने जी कुऱ्हाड झाडांवर निसर्गावर चालवली तीच दुष्काळ रुपी कुऱ्हाड आता माणसांवर घाव घालत आहेत. या संकटातून तुम्हाला सरकार नाही तर हा निसर्गच वाचवू शकतो. पाणी पैश्यासारखं वापरा... आणि पैश्यासारखं जपा.**





## पाणीबाणी

सचिन तळे

राष्ट्रसंचार

राज्यात उन्हाच्या दाहकतेने नद्या, विहिरी, ओढे, कालवे हि कोरडे ठणठणीत पडले आहेत. जनतेला पिण्याच्या एक घागरभर पाण्यासाठी वणवण भटकंती करावी लागत आहे. माणसांबरोबर जनावरांच्याही चाऱ्याचा व पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. अनेक ठिकाणी आठवड्यातून एकदा पाणी मिळत आहे. सरकार पाणी कपात करून करून किती दिवस करणार? सरकार टँकर तरी किती पुरवणार? धरणात पाणीच नाही म्हंटल्यावर सरकार तरी तुम्हाला पाणी कोठून आणून देणार? लातूरला ट्रेनच्या माध्यमातून पाणी पुरवले जात आहे. जोपर्यंत नागरिक जागरूक होणार नाही, वनीकरण आाणि वृक्ष लागवडीचा कार्यक्रम हाती घेणार नाही तोपर्यंत हा प्रश्न सुटणार नाही हे लक्षात घ्या. दुष्काळ निवारणासाठी पाणलोट क्षेत्र विकासात छोटी झाडे, गवत आणि झुडूपवर्गीय झाडांची लागवड इत्यादी आवश्यक असते. शासकीय विभाग, स्वयंसेवी संस्था किंवा व्यक्तींना रोपे पुरवठ्याची कामे सुद्धा वन विभाग, सामाजिक वनीकरण विभाग करत आहे त्यांच्याशी संपर्क साधून तुम्ही झाडे लावू शकता. अनेकजण झाडे लावण्याचे काम करत आहे पण लावलेली झाडे जगवण्याची जबाबदारी कोणी घेत नाही. लावलेली झाडे जगवली तरच पावसाचे प्रमाण नक्की वाढेल. आज आपण पाहतो की, वृक्षांची संख्या कमी होत आहे. वृक्षतोड होऊन त्याठिकाणी मोठ मोठ्या इमारतींचा विस्तार होत आहे त्यामुळे पाऊस कमी होत आहे अन दुष्काळ जन्य परीस्थिती दिसून येते.

पावसाचे पाणी जास्तीत जास्त गावाच्या शिवारात अडवून विकेंद्रित स्वरूपाचे पाणीसाठे निर्माण करणे, भूगर्भातील पाण्याच्या पातळीत वाढ करणे असे उपाय झाले पाहिजे. नद्यानाल्यांच्या खोलीकरण, रुंदीकरणातून जलसंधारण साधले गेले पाहिजे. राज्यात जी लहान-मोठी तलावे तुटलेली व गाळाने भरलेली आहेत त्यांची दुरूस्ती व गाळ काढने आवश्यक आहे. हा निसर्गनिर्मित दुष्काळ नसून मानव निर्मित दुष्काळच आहे. पाऊस कमी पडल्यामुळे कृषी उत्पादन कमी होते व भूकबळींची संख्या वाढते हे विसरता कामा नये. कोरड्या भागात दुष्काळ परिस्थिती नव्या वाळवंटाची निर्मिती करते. पावसाचे पाणी खाली जमिनीत झिरपले नाही तर भूगर्भातील पाण्याची पातळी देखील कमी होत जाते.

पाऊस कमी आहे हेच फक्त दुष्काळाचे एकमेव कारण नाही. बेजबाबदार नोकरशाही तसेच चुकीचे नियोजन यामुळेही दुष्काळाची तीव्रता वाढते. पाण्याचे दुर्भिक्ष, पिकांची झालेली नासाडी, दुष्काळग्रस्तांचे रोजगारासाठी होणारे स्थलांतर अशा स्वरूपात या दुष्काळाचे चटके बसत आहेत. राज्यातील तसेच आपापल्या भागातील विविध प्रकारे वाया जाणाऱ्या पाण्याचा एकत्रित विचार करण्यासाठी शासनाने राज्य, विभाग व जिल्हापातळीवर आणि लोकांनी आपापल्या स्तरावर समिती गठित करून ठोस नियोजन केल्यास सध्याचा पाणी प्रश्न सहज सुटू शकतो. गावात आणि शहरात पाण्याची काय परिस्थिती आहे आणि नेमके काय प्रश्न आहेत हे स्थानिक लोकप्रतिनिधी, कार्यकर्ते, अभ्यासक, शेतकरी, उद्योजक, आदी समाजघटकांनी पाहिले पाहिजे. पाणी नियोजनाशी निगडित काम करणाऱ्या जलसंपदा, जलसंधारण, ग्रामविकास, कृषी, वने, सामाजिक वनीकरण, भूजल सर्वेक्षण, पाणीपुरवठा आदी शासनाच्या संघटनेशी या कार्यकर्त्यांनी लोकांनी संपर्कात राहिले पाहिजे. आजची भयाण परिस्थिती तर तुमच्या डोळ्यासमोरच आहे. तुम्ही या उद्दिष्टांचा जाब विचाराल तर तुम्हाला उत्तर मिळेल की नाही, माहीत नाही; परंतु तुमचा पाणीप्रश्न आणि चाऱ्याचा प्रश्न सुटण्यास नक्कीच सुरुवात होईल. ज्याठिकाणी फळे, पिके अथवा नगदी पिके आहेत, अथवा पाणी वापर जास्त आहे, त्या ठिकाणी सिमेंट बंधारे मर्यादित ठरतात. पावसाची अनियमितता, बाष्पीभवन, दोन-तीन वर्षांत गाळाने भरणे आदी बाबींचा विचार करता सिमेंट बंधाऱ्याची उपयोगिता राज्याच्या दृष्टीने मूलत: मर्यादित स्वरूपाची आहे. भयाण दुष्काळातही उत्तम प्रकारे तग धरून राहिलेली एकमेव वनस्पती आपण पाहात असाल ती म्हणजे वेडीबाभूळ आहे. राज्यातील पाण्याचा प्रश्न कोणताही स्वतंत्र निधी न घेता केवळ लोकांच्या सोप्या व सरळ उपाययोजनांची अंमलबजावणी केल्यास सुटू शकतो. म्हणून पुन्हा एकदा विचार करा आणि पाणी पैश्यासारखे वापरा.

- पावसाचे पाणी साठवून ठेवण्याची व्यवस्था करावी व ह्याची सवय असू द्यावी.
- पावसाळ्यापूवी स्थानिक जलकुंभाची दुरुस्ती करून नवीन करावी.
- भूगर्भातील पाण्याचा स्तर वाढवण्यासाठी पावसाचे पाणी खड्यांमार्फत जिरवले गेले पाहिजे.
- जास्तीत जास्त अन मोठ्या प्रमाणात सोसायटी अन संस्थेने जलसंधारण कार्यक्रमात भाग घेणे गरजेचे आहे.
- घरगुती वापरासाठी वापरलेले पाणी पुन्हा झाडांना आणि रोपट्याना कसे वापरता येईल याचा विचार झाला पाहिजे.
- आंघोळ करताना, गाडी धुताना , घराची फ्लोरिंग स्वच्छ करताना, दैनंदिन जीवनात जिथे जिथे पाणी चा वापर आहे तिथे तिथे पाणी जपून वापरले पाहिजे.

# अहिल्या - एक उर्जास्त्रोत



स्वतःच्या व्यक्तित्वाची पायवाट स्वतःच्या सकारात्मकतेने उजळून दुसऱ्यांसाठी उर्जास्त्रोत होणाऱ्या काही शलाका या नेहमीच स्वयंप्रकाशी असतात. आपल्या असण्याने त्या आपल्या आजूबाजूचे सारे अंधारकोपरे उजळून टाकतात. देवघरातली समई होवून तेवत राहतात. कधीकधी निखाऱ्यावर राख जमली की जसा तो विझतो तसंच आपल्या मानवी मनाचंही होतं.. परिस्थितीची राख जमू लागली की आपलं मन ही सर्दावतं..पण काही मनं अशी असतात जी स्फुल्लिंग पावतात..काहीतरी करायचा ध्यास घेऊन उजळतात. फक्त विचार नाही तर कृतीच्या वाटा शोधतात. असे लोक रडत नाहीत तर लढतात. समाजासाठी, समाजातल्या कमकुवत घटकांसाठी ते उर्जास्त्रोत होतात. ते समाजाच्या दुःखांशी नाते सांगतात.त्यांच्यातलाच एक होऊन जगताना आपलं वेगळेपण जपतात. अहिल्याचा, 'अहिल्या ते राजमाता पुण्यश्लोक अहल्याबाई होळकर'हा प्रवास एका प्रकाश-शलाकेचा उर्जास्त्रोत होण्याचा प्रवास आहे. इंग्रजी लेखक लॉरेन्स यांनी अहिल्यादेवी होळकर, यांना भारताच्या"कॅथरीन द ग्रेट, एलिझाबेथ मागरिट" असे म्हटले आहे. थोडक्यात अहिल्याबाई यांची तुलना रशियाची राणी कॅथरीन द ग्रेट, इंग्लंडची राणी एलिझाबेथ तसेच डेन्मार्कची राणी मागरिट यांच्याशी एकत्रित केली आहे. त्याने म्हटले आहे की ज्या वेळेस जगातील सर्वात महान स्त्रीयांचा इतिहास लिहिला जाईल त्या वेळेस पुण्यशलोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव सर्व प्रथम लिहिले जाईल.

अहिल्या ही अहमदनगर जिल्ह्यातील चौरी/चौंडी गावातील माणकोजी शिंदे यांची कन्या ३१ मे १७२५ रोजी जन्मली. लहान वयातच तिच्यातील चुणूक ओळखून माणकोजी यांनी तिची लेखन, वाचन शिकण्याची घरीच व्यवस्था केली. अशी ही चुणचुणीत पोरगी मराठा सरदार मल्हारराव होळकर यांच्या नजरेस पडली आणि तिच्यातील हुशारी ओळखून त्यांनी आपला एकुलता एक मुलगा खंडेराव होळकर याच्याशी तिचे लग्न लावून दिले. मल्हारराव होळकर हे माळवा प्रांताचे शासक होते. लग्नानंतर त्यांनी अहिल्येला आपल्या मुलाच्या बरोबरीने दरबारी कामकाजाचे, युद्धनीतीचे आणि राज्यकारभार कसा करावा याचे धडे दिले.

इ.स. १७६५ मध्ये सत्तेसाठी झालेल्या एका लढाईदरम्यान लिहिलेल्या एका पत्रावरून मल्हाररावांचा अहिल्याबाईंच्या कर्तृत्वावर किती विश्वास होता हे दिसून येते." चंबळ पार करून ग्वाल्हेर येथे जावा. तेथे तुम्ही ४-५ दिवस मुकाम करू शकता. तुम्ही मोठे सैन्य ठेवू शकता व त्यांचे शस्त्रांसाठी योग्य तजवीज करा.....कूच करतांना, मार्गावर तुम्ही सुरक्षेसाठी चौक्या लावा." पूर्वीच शासक म्हणून तरबेज झाल्यामुळे, मल्हारराव व मुलाच्या मृत्यूनंतर, अहिल्यादेवींनी स्वतःलाच राज्यकारभार पाहू देण्याची अनुज्ञा द्यावी अशी पेशव्यांना विनंती केली. त्यांनी शासन करण्यास माळव्यात अनेकांचा विरोध होता, पण होळकरांचे सैन्य अहिल्याबाईंच्या नेतृत्वाखाली काम करण्यास उत्सुक होते. अहिल्यादेवी सैनिकी कवायतीत हत्तीच्या हौद्याच्या कोपऱ्यात चार धनुष्य आणि बाणांचे भाते ठेवत असत, असे म्हणतात. १७५४ मध्ये अहिल्याबाईंचे पती मल्हारराव यांचा मुलगा खंडेराव युद्धात मरण पावला तेव्हा गादी तिचा मुलगा मले राव होळकर यांच्याकडे सोपवण्यात आली. तथापि, जबाबदारी घेण्यास फारच लहान असल्यामुळे मल्हार रावांनी अहिल्याबाईंना कारभारी म्हणून नेमले. हे धाडसी पाऊल म्हणजे मल्हाररावांच्या अहिल्याबाईंच्या प्रशासकीय क्षमतेवरील विश्वास आणि राज्याविषयीच्या दूरदृष्टीचा पुरावा होता.१७६६ मध्ये मल्हार राव आणि १७६७ मध्ये त्यांच्या मुलाच्या मृत्यूनंतर, अहिल्याबाईंनी राज्याचा संपूर्ण ताबा घेतला. अशा प्रकारे एका स्त्रीच्या राजवटीला सुरुवात झाली जी आपल्या दूरदर्शी नेतृत्वाने माळवा राज्याचा कायापालट झाला. १७६७ मध्ये तिला अधिकृतपणे राणी म्हणून राज्याभिषेक करण्यात आला. तिच्या मार्गदर्शनाखाली, माळव्याने लवकरच अभूतपूर्व समृद्धी आणि प्रगतीचा काळ अनुभवला. पण त्यावेळचे प्रमुख राज्यकर्ते पेशवे यांनी अहिल्याबाईंचा अधिकार नाकारला तेव्हा पेशव्यांकडे अर्ज करून अहिल्याबाईंनी आपल्यातल्या मुत्सुद्देपणाची



अहिल्या
मानसी चिटणीस
राष्ट्रसंचार

चमक दाखवली आणि माळवा प्रांतावर शासन करण्याचा अधिकार मिळवला.

पेशव्यांनी परवानगी दिल्यावर, ज्या माणसाने तिला विरोध केला होता त्यालाच चाकरीत घेऊन, तुकोजीराव होळकर (मल्हाररावांचा दत्तक पुत्र) यास सैन्याचा मुख्य करून, अहिल्यादेवी होळकरांनी पूर्ण दिमाखात माळव्यास प्रयाण केले. पेशवा रघुनाथराव याला होळकरांच्या राज्याचा व दौलतीचा लोभ सुटला. त्याने पेशवाईत होळकरांचे राज्य विलीन करण्यासाठी पन्नास हजारांची फौज घेऊन इंदोर वर चढाई केली. हे वृत्त तेजस्विनी अहिल्याबाईला कळताच खचून न जाता त्यांनी रघुनाथरावांना खलिता पाठविला त्या म्हणतात,"आपण माझे राज्य हिरावून घेण्याचे कपट रचून आलात आमच्याकडील फितूरास गाठले. मला दुबळी समजलात की खुळी? दुःखात बुडालेल्यास आधिक बुडवावे हा तुमचा दुष्ट हेतू? आता आपली गाठ रणांगणात पडेल! माझ्याबरोबर युद्धात पारंगत असणाऱ्या स्त्रियांची फौज असेल मी हरले तर कीर्ती करून जाईल.पण आपण हरलात तर आपल्याला तोंड दाखवायला जागा उरणार नाही. म्हणून लढाईच्या भरीस न पडाल तर बरे. मी अबला आहे असे समजू नका. मी खांद्यावर भाले घेऊन समोर उभे राहिले तर पेशव्यांना भारी पडेल. वेळ पडली तर हत्तीच्या पायी साखळीशी बांधून तुमचे स्वागत न केले तर होळकरांच्या सुनेचे नाव लावणार नाही." मुत्सद्दी अहिल्या म्हणजे तळपती समशेर आणि लखलखती वीज होती. त्यांनी आपल्या आयुष्य लोककल्याणकारी कार्यासाठी वेचत असताना प्रदेशाची मर्यादा न घालता संपूर्ण भारतात कार्य केलेले आहे. संपूर्ण भारतात अनेक विहिरी ,तलाव ,कुंड, घाट बांधले आहेत. रस्ते,पूल निर्माण केले आहेत. जे काम भारताच्या शासन व्यवस्थेत सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत केले जाते ते काम लोकमाता अहिल्याबाईंनी केले. उद्योगधंद्यांना व त्याच्या विकासाला प्राधान्य दिले.अहिल्यादेवींनी पडदा प्रथा कधीच पाळली नाही. त्या रोज जनतेचा दरबार भरवीत असत व लोकांची गाऱ्हाणी ऐकण्यास नेहमीच उपलब्ध असत. जरी राज्याची राजधानी ही नर्मदातीरावर असलेल्या महेश्वर येथे होती तरीही, इंदूर या खेड्याचा विकास करून त्याचे सुंदर मोठ्या शहरात रूपांतर करणे, हे अहिल्यादेवींनी केलेले फार मोठे काम होते. त्यांनी माळव्यात रस्ते व किल्ले बांधले, अनेक उत्सव भरवले, हिंदूमंदिरांमध्ये कायमस्वरूपी पूजा सुरू रहावी म्हणून अनेक दाने दिली.

अहिल्यादेवींनी जनतेच्या/रयतेच्या काळजीपोटी अनेक गोष्टी केल्या. त्यांनी अनेक विधवांना पतीची मिळकत त्यांच्यापाशीच ठेवण्यात मदत केली. अहिल्यादेवींच्या राज्यात कोणीही विधवा मुलाला दत्तक घेऊ शकत असे. एकदा त्यांच्या एका मंत्र्याने लाच घेतल्याशिवाय दत्तक घेण्याच्या मंजुरीस नकार दिला, तेव्हा अहिल्यादेवींनी दत्तकविधानाचा कार्यक्रम स्वतः प्रायोजित करून, रीतसर कपडे व दागिन्यांचा आहेर दिला. भिल्ल व गोंड या राज्याच्या सीमेवर असलेल्या जमातींमधील वाद अहिल्यादेवी सोडवू शकल्या नाहीत. तरीही, त्यांनी त्या लोकांना पहाडातील निरुपयोगी जमीन दिली आणि त्यांना, त्या क्षेत्रातून जाणाऱ्या सामानावर थोडा 'कर'घेण्याचा अधिकार दिला. यासाठी रायगंण सुभ्यावर नवापुर या ठिकाणी ठिंगळे भिल्ल सरदार यांना नेमले त्यामुळे भिल्ल जमाती होळकराच्या सैन्यात आले व त्यांनी सुरते वर वचक बसवला. याही बाबतीत, (आंग्ल लेखक)'माल्कम' यांच्यानुसार, अहिल्यादेवींनी'त्यांच्या सवयींवर लक्ष ठेवले'.

महेश्वर येथील अहिल्यादेवींची राजधानी ही जणू काव्य, संगीत, कला व उद्योग यांची संस्थाच होती. महाराष्ट्रातील प्रसिद्ध मराठी कवी मोरोपंत व शाहीर अनंत फंदी यांना व संस्कृत विद्वान खुशालीराम यांना अहिल्याबाईंनी आश्रय दिला. कारागरांना, मूर्तिकारांना व कलाकारांना त्यांच्या राजधानीत सन्मान व वेतन मिळत असे. अहिल्याबाई होळकर यांचे कला, संस्कृती आणि स्थापत्यशास्त्रातील योगदान अतुलनीय आणि दूरगामी होते. ते केवळ तिची परिष्कृत सौंदर्याची जाणीव आणि बौद्धिक कुतूहलच नव्हे तर समाजातील कला आणि संस्कृतीच्या भूमिकेबद्दल तिची सखोल समज देखील प्रतिबिंबित करतात. तिचे स्थापत्यकलेवरील प्रेम तिने तिच्या राज्यात आणि भारताच्या इतर भागात बांधलेल्या असंख्य मंदिरे, धर्मशाळा (विश्रांतीगृहे), विहिरी आणि घाटांवरून दिसून आले. समाजाची सेवा करण्याव्यतिरिक्त, या वास्तू त्या काळातील सौंदर्यविषयक संवेदनशीलतेचा पुरावा म्हणून उभ्या होत्या. महेश्वरमधील भव्य अहिल्येश्वर मंदिर हे सर्वोत्कृष्ट उदाहरणांपैकी एक आहे, जे तिच्या धार्मिक सहिष्णुतेचा आणि स्थापत्य दृष्टीचा पुरावा आहे. अहिल्याबाई होळकर यांचे कला, संस्कृती आणि स्थापत्यशास्त्रातील योगदान अतुलनीय आणि दूरगामी होते. ते केवळ तिची परिष्कृत सौंदर्याची जाणीव आणि बौद्धिक कुतूहलच नव्हे तर समाजातील कला आणि संस्कृतीच्या भूमिकेबद्दल तिची सखोल समज देखील प्रतिबिंबित करतात.

१८ व्या शतकात एक महिला शासक म्हणून, अहिल्याबाईंनी सामाजिक नियमांचे अडथळे तोडून महिला सक्षमीकरण आणि नेतृत्वाचा आदर्श ठेवला. तिची कथा प्रेरणा देत राहते, ती महत्त्वाकांक्षी नेत्यांसाठी एक दीपस्तंभ म्हणून काम करते आणि प्रबुद्ध नेतृत्वाच्या क्षमतेचा दाखला देते. अशा महान शासनकर्त्या पुण्यश्लोक महाराणीला मनाचा मुजरा !!!

# शब्द वैभवाचा शिल्पकार कवी डॉक्टर शंतनू चिंधडे

डॉक्टर शंतनु चिंधडे गेल्याची बातमी समजली. डॉक्टर शंतनु माझा सगळ्यात वयाने मोठा असलेला चुलत भाऊ. डॉक्टर शंतनु निष्णात डोळ्याचा डॉक्टर तसाच कवीही होता . नेत्रतज्ञ म्हणून दोन हजार पेक्षा जास्त शस्त्रक्रिया त्याने केल्या तसेच हजारो पेशंट तपासले आहेत. अनेक ठिकाणी नेत्र शिबिरे घेतली.त्याची डोळ्या संबंधी आठ पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. त्यातील डोळ्यावरील त्याच्या डॉक्टर :माझे डोळे या एका पुस्तकाला राज्य सरकारचे पारितोषिक मिळाले होते.

वैद्यकीय शिक्षण आणि नोकरी निमित्ताने आठ वर्ष इंग्लंड मध्ये राहिला. इंग्लंडमध्ये शिकून आल्यानंतर पुणे येथे डेक्कन जिमखाना परिसरात प्रेस्टीज चेंबर मध्ये कन्सल्टिंग रूम १९७८ मध्ये सुरू केले. त्या वेळचे जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री म.रा.वाईकर साहेब यांच्या हस्ते त्याचे उद्‌घाटन झाले होते. शतायुषी या आरोग्य विषयक दिवाळी अंकामध्ये तो अनेक वर्ष सहसंपादक होता. २०० पेक्षा जास्त इंग्रजी वैद्यकीय लेखांचे त्याने भाषांतर केले होते.

कवी म्हणून त्याची दोन पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत."इंग्लंडच्या कविता"आणि "चंद्रचाफा"हे दोन कवितासंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. या कवितासंग्रहांना अनेक पारितोषिक मिळाली.'शब्दवैभव', हे साहित्यप्रेमी मंडळ पुण्यामध्ये तो गेले पस्तीस वर्षात चालवत होता. पुण्यात २५ पेक्षा जास्त कवितासंग्रह संपादित केले आहेत. अनेक नवीन कवींना सातत्याने मार्गदर्शन केले.

अखिल भारतीय साहित्य संमेलनात भोपाळ, गोवा, धुळे,पुणे येथे निमंत्रित कवी

शब्द वैभव
मिलिंद मधुकर चिंधडे
राष्ट्रसंचार

म्हणून अनेक वेळा सहभाग नोंदवला. १५० पेक्षा जास्त कवी संमेलनांचे संचालन त्याने केले होते. आकाशवाणी आणि दूरदर्शन वर अनेक वेळा कविता वाचन झाले आहे. गेले साठ वर्ष कवितेची तपस्या केली . इंग्रजीमध्ये देखील कविता अतिशय सहजपणाने करत होता. कविता त्याच्याकडे सहजपणे आली याचे सगळ्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे डॉक्टर शंतनु याचे आजोबा आणि वडील उत्तम कवी होते. वसंतराव चिंधडे म्हणजे वडिलांकडून छंदोबद्ध कवितेचा वारसा मिळाला.

त्याने अनेक गावी कविता विषयक कार्यक्रमात सहभाग नोंदवला होता. नासिकला बी.वाय.के.कॉलेज येथील काव्य करंडक कविता स्पर्धेच्या पारितोषिक वितरण करणे करता तो आला होता. माझा मित्र कैलासवासी सुरेश मेणे यांच्या कवितासंग्रहाच्या प्रकाशनाला, डॉक्टर पूर्णपात्रे यांच्या कवींच्या संस्थेच्या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून आला होता. जवळजवळ सर्वच कविता विषयक मासिके, दिवाळी अंक नियतकालिके, वर्तमानपत्रे यात सातत्याने कविता लेखन केले होते. त्याची कविता गेय आणि छंदोबद्ध होती. प्रामुख्याने प्रेमभावना व निसर्ग संवेदना त्याच्या कवितेतून प्रगट होत होती.

पुण्याला गेलो की अनेक वेळेला त्याच्याकडे जाऊन सुखदुःखाच्या गोष्टी केल्या. त्याचे आशीर्वाद घेतले. डॉक्टर आणि कवी या दोन्ही कामाचे उत्कृष्ट संतुलन त्याने साधले होते. असा शब्द वैभवचा शिल्पकार कवी डॉक्टर शंतनु चिंधडे याचे साहित्य आणि वैद्यकीय काम सर्वांना प्रेरणा देत राहील हे नि:संशय.

# वॉटरलाईट फिरता कंदील

## एक ऊर्जानिर्मितीचा अभिनव उपक्रम

ऊर्जेचा तुटवडा (विशेषतः अविकसित देशात) हे जागतिक वास्तव आहे . विकसित देश अनेक कारणासाठी ऊर्जेचा अतिवापर करून ग्लोबल वॉर्मिंग सारखी समस्या निर्माण करत आहेत. हवामानातील ह्या बदलांचे सर्वात मोठे कारण म्हणजे मानवाकडून सर्व नैसर्गिक स्रोतांचा होणारा अवाजवी, अमर्याद, अविचारी वापर! गेली शंभर वर्षे विकसित देशांचे राहणीमान उच्चच राहिले आहे. त्यांच्याकडील ह्या उच्च जीवनशैलीचे लाड पुरवण्यासाठी मुख्यतः तिसऱ्या जगातील (म्हणजे द. अमेरिका, आफ्रिका व आशिया खंडातले काही देश) कच्चा माल मोठ्या प्रमाणात वापरला जातो. ह्यामध्ये लाकूडफाट्यापासून खनिजांपर्यंत अनेक नैसर्गिक वस्तूंचा समावेश आहे. शिवाय गेल्या दोन दशकांत जगातल्या विकसनशील देशांतील जीवनमान देखील एकंदरीने उंचावल्यामुळे तेथेही ही लाट पोचली आहे (ह्यामध्ये अर्थात आपला भारत आणि त्यामधले आपण सगळे आलोच!). परिणामी पर्यावरणाचा पूर्वापार नैसर्गिक समतोल ढासळला आहे. ह्याचे परिणाम आपणांस आत्ता कोठे जाणवू लागले आहेत असेच म्हणावे लागेल कारण पुढच्या पिढ्यांना अक्षरशः दैनंदिन जीवनात ह्या समस्यांना तोंड द्यावे लागेल (पिण्याच्या पाण्याच्या तुटवड्याचे एकच उदाहरण येथे पुरेसे आहे). विजेची जगभरातील मागणी दरवर्षी वाढत आहे आणि पारंपारिक जीवाश्म इंधन संसाधने कमी होत आहेत. जागतिक आरोग्य संघटनेने (डब्ल्यूएचओ) असे सूचित केले आहे की जगभरातील ८४ कोटी लोक सध्या वीजेशिवाय जीवन जगत आहेत. हा मोठा विरोधाभास आहे . आता वेळ आली आहे ती उपाय शोधायची . ह्यातील एक स्तुत्य उपक्रम दक्षिण अमेरिकेतील कोलंबिया देशात राबवला जात आहे. हा प्रयोग भारततही राबवला जाऊ शकतो .

दक्षिण अमेरिकेतील अभियंत्यांनी वॉटरलाईट हे अभिनव उपकरण विकसित केले आहे - एक हाताने धरलेले उपकरण जे फक्त दोन कप समुद्रातील खाऱ्या पाण्याने



ऊर्जानिर्मिती
डॉ. दीपक शिकारपूर
राष्ट्रसंचार
deepak@deepakshikarpur.com
लेखक संगणक साक्षरता प्रसारक आहेत

प्रकाश आणि वीज निर्माण करू शकते. वॉटरलाईट हा एक फिरता कंदील आहे जो अर्धा लिटर कार्य पाण्याचे अशा ऊर्जेत रूपांतर करतो कि ज्यायोगे ४५ दिवस चार्ज न करता प्रकाश देईल कोलंबियन अक्षय ऊर्जा स्टार्ट-अप ई-डीना आणि डब्ल्यूपीपीच्या वंडरमन थॉम्पसन कोलंबिया विभागाने हे उपकरण विकसित केले आहे . हे उपकरण आयनीकरणाद्वारे कार्य करते. जेव्हा मिठाच्या पाण्याचे इलेक्ट्रोलाइट्स उपकरणाच्या आत मॅग्नेशियमवर प्रतिक्रिया देतात तेव्हा विद्युत ऊर्जा तयार होते. या प्रक्रियेत मीठ आणि पाणी वेगळे होतात. म्हणून जेव्हा वॉटरलाईट जेव्हा प्रकाश देणे थांबवते तेव्हा उरलेले पाणी स्वयंपाकासाठी वापरले जाऊ शकते. विकसकांनी हे कंदील दक्षिण अमेरिकेच्या उत्तरेकडील टोकावरील किनारी वाळवंट असलेल्या गुआजिरा द्वीपकल्पातील लोकांना हे दिवे प्रदान केले आहेत. हा प्रदेश गरिबीने ग्रस्त आहे आणि रहिवाशांना खरोखर वीज उपलब्ध नाही. हे उपकरण जलरोधक (वॉटरप्रूफ) आहे आणि पुनर्वापर करता येण्याजोग्या कच्च्या मालापासून बनवलेले आहे आणि त्याचे अपेक्षित आयुष्य सुमारे ५,६०० तास आहे जे दोन किंवा तीन वर्षांच्या वापरा एवढे आहे, हे कंदील बनवायची किंमत सध्या रु पाच हजार एवढी आहे पण मोठ्या प्रमाणावर निर्मिती झाली तर किंमत कमी होऊ शकते

हे दिवे रॉकेल किंवा तेल-आधारित कंदिलांना बदलू शकतात कारण ते त्यांच्यासाठी मुबलक प्रमाणात उपलब्ध असलेल्या एखाद्या वस्तूवर चार्ज केले जाऊ शकतात - समुद्राचे पाणी. उपरोक्त द्वीपकल्पातील वायू जमातीचे सदस्य त्यांच्या बोटींवर हे कंदील यशस्वीरीत्या वापरात आहेत, ज्यामुळे त्यांना रात्री मासेमारी करता येते. तसेच हे कंदील , यूएसबी पोर्टद्वारे लहान उपकरणे देखील चार्ज करू शकते आणीबाणीच्या परिस्थितीत जर खारे पाणी उपल्बध नसेल तर मानवी लघवीचा वापर ऊर्जानिर्मिसाठी केला जाऊ शकतो.

# रिझर्व्ह बँक, राष्ट्रीयकृत बँकांचा केंद्राला भरघोस लाभांश!

**मार्च २०२४ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षांमध्ये सार्वजनिक क्षेत्रातील बारा राष्ट्रीयकृत बँकांची नेत्रदीपक कामगिरी झाली असून त्यांनी केंद्र सरकारला भरघोस लाभांश दिला आहे. त्याचप्रमाणे देशाच्या मध्यवर्ती रिझर्व्ह बँकेने या वर्षासाठी तब्बल २ लाख १० हजार ८७४ कोटी रुपये ऐतिहासिक लाभांश केंद्राला जाहीर केला आहे. राष्ट्रीयीकृत बँकांना तब्बल १.४० लाख कोटी रुपयांचा निव्वळ नफा झाला आहे. मागील वर्षाच्या तुलनेत त्यात ३५ टक्के वाढ झाली आहे. त्यांची वार्षिक व्यवसाय वृद्धी ३४ टक्क्यांच्या घरात गेली आहे. मार्च २०२३ या तुलनेत या बँकांनी ३० टक्के जास्त लाभांश केंद्र सरकारला दिला आहे. राष्ट्रीयकृत बँकांच्या कामगिरीचा धावता आढावा.**



केंद्र सरकारची प्रमुख मालकी असलेल्या सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी मार्च २०२४ अखेरच्या वर्षांमध्ये उत्तम आर्थिक कामगिरी केलेली आहे. केवळ मुदत ठेवींमध्ये वाढ न करता कर्जवाटपामध्ये सुद्धा या बँकांनी चांगली कामगिरी नोंदवली आहे. सार्वजनिक क्षेत्रातील एकूण १२ बँकांपैकी स्टेट बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ महाराष्ट्र, कॅनरा बँक व बँक ऑफ इंडिया या चार बँकांनी दहा टक्क्यांपेक्षा जास्त वार्षिक वाढ नोंदवलेली आहे. साहजिकच या बँकांचे वर्षा अखेरचे नफ्याचे प्रमाण तुलनात्मकरित्या चांगले राहिले असून या ।वर्षी त्यांनी विक्रमी नफा मिळवलेला आहे. परिणामतः गुंतवणूकदारांना व विशेषतः केंद्र सरकारला यामुळे मोठा लाभांश मिळणार आहे. मार्च २०२३ या वर्षी अखेरीस या सर्व बँकांनी केंद्र सरकारला तब्बल १३ हजार ८०४ कोटी रुपये लाभांश दिला होता. त्यात यावेळी भरघोस म्हणजे तब्बल ३० टक्के वाढ होत असून यावर्षी अखेरीस केंद्राला लाभांशापोटी १८ हजार कोटी रुपये मिळणार आहेत. केंद्र सरकारला सर्वाधिक लाभांश देणाऱ्या बँकांमध्ये स्टेट बँक ऑफ इंडियासह बँक ऑफ बडोदा, कॅनरा बँक व इंडियन बँक यांचा समावेश आहे. बँक ऑफ इंडिया व इंडियन ओव्हरसीज बँक या दोन्ही बँकांचा लाभांश लवकरच जाहीर होईल.

सर्व राष्ट्रीयकृत बँकांच्या जोडीलाच देशाची मध्यवर्ती बँक असलेल्या रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ने मार्च २०२४ या वर्षासाठी केंद्र सरकारला ऐतिहासिक लाभांश नुकताच जाहीर केला. ही रक्कम तब्बल २ लाख १० हजार ८७४ कोटी रुपये इतकी आहे. यामुळे केंद्रीय अंदाजपत्रकातील चालू आर्थिक वर्षातील वित्तीय तूट भरून काढण्यास मोठा हातभार लागणार आहे. सर्व राष्ट्रीयकृत बँकांप्रमाणेच रिझर्व्ह बँकेची या वर्षातील एकूण कामगिरी खूप उत्तम झाल्याचे हे द्योतक आहे. रिझर्व्ह बँकेला परकीय चलन, सरकारी रोख्यांची खरेदी विक्री, ठेवी, अल्पमुदतीची बँकांना कर्जे तसेच राज्य व केंद्र सरकार यांच्या कर्जातील कमिशन यातून उत्पन्न होते.

सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचा निव्वळ नफा गेल्या वर्षाच्या तुलनेत यावर्षी ३७ टक्क्यांनी वाढलेला असून तो जवळजवळ १ कोटी ४० लाख रुपये झाला आहे. स्टेट बँक ऑफ इंडियाने या सर्व बँकांमध्ये सर्वोत्तम नफा कमावला आहे. त्यांनी ६१ हजार ७७ कोटी रुपये नफा मिळवला आहे. या बँकेच्या शेअरची दर्शनी किंमत एक रुपया असून त्यांनी सर्वाधिक म्हणजे प्रति शेअर १३.७० रुपये लाभांश दिला आहे. मार्च २०२३ अखेरच्या वर्षात हा लाभांश ११.३ रुपये होता. केंद्र



तंत्रज्ञान
प्रा. नंदकुमार काकिर्डे
राष्ट्रसंचार

सरकारला सार्वजनिक क्षेत्रातील बँकांकडून मिळणाऱ्या लाभांशापैकी ३९ टक्के लाभांश केवळ स्टेट बँक ऑफ इंडिया कडून मिळणार आहे. त्या खालोखाल बँक ऑफ बडोदा या बँकेने ही दोन रुपये दर्शनी मूल्य असलेल्या शेअरवर ७६० रुपये लाभांश जाहीर केला आहे. हा दर्शनी मूल्यावर ३८० टक्के लाभांश होतो. स्टेट बँक ऑफ इंडिया पाठोपाठ बँक ऑफ बडोदा केंद्र सरकारला सुमारे १४ टक्के लाभांश देते. या पाठोपाठ कॅनरा बँकेनेही लाभांश नुकताच जाहीर केला असून केंद्र सरकारच्या एकूण लाभांशापैकी दहा टक्के लाभांश कॅनरा बँकेचा होणार आहे. या बँकेने दहा रुपये दर्शनी मूल्याच्या शेअरवर १६.१० रुपये लाभांश दिला आहे. टक्केवारीच्या आकड्यात सांगायचे झाले तर या बँकेने १६१टक्के लाभांश दिला आहे. मार्च २०२३ मध्ये त्यांनी १२ रुपये लाभांश दिलेला होता. या तीन प्रमुख बँकांच्या पाठोपाठ इंडियन बँकेच्या संचालकांनीही नुकताच त्यांचा प्रति शेअर १२ रुपये लाभांश जाहीर केला आहे. गेल्या वर्षी या बँकेने ८.६० रुपये लाभांश दिलेला होता. त्यांनी नफ्यात ५३ टक्के वाढ नोंदवून ८ हजार ६३ कोटी रुपये नफा कमावला आहे. केंद्र सरकारला मिळणाऱ्या एकूण लाभांशामध्ये या बँकेचा सुमारे ७ टक्के वाटा आहे. पंजाब नॅशनल बँकेने 8 हजार २४५ कोटी रुपयांचा निव्वळ नफा मिळवला असून त्यात गेल्या वर्षाच्या तुलनेत २२८ टक्के वाढ झाली आहे. युनियन बँक ऑफ इंडिया ने १३ हजार ६४९ कोटी रुपयांचा निव्वळ नफा मिळवला असून गेल्या वर्षीच्या तुलनेत त्यात ६२ टक्के वाढ झाली आहे. सेंट्रल बँक ऑफ इंडिया ने ही गेल्या वर्षीच्या तुलनेत नफ्यामध्ये ६१ टक्के वाढ नोंदवून २ हजार ५४९ कोटी रुपये नफा मिळवला आहे. बँक ऑफ इंडिया ने ५७ टक्के वाढ नोंदवून ६ हजार ३१८ कोटी रुपये नफा मिळवला आहे. मात्र या १२ बँकांपैकी केवळ पंजाब आणि सिंध या बँकेने गेल्या वर्षाच्या तुलनेत ५५ टक्के कमी नफा मिळवला. १३१३ कोटी रुपयांवरून तो केवळ ५९५ कोटी रुपयांवर घसरला आहे.

केंद्र सरकारने गेल्या काही वर्षांमध्ये अनुत्पादित कर्जांबाबत आखलेले सर्वंकष धोरण तसेच थकीत कर्जाची वसुली धोरण सहाय्यकारी ठरले आहे. बँकांना भाग भांडवली सहाय्या पोटी गेल्या पाच वर्षात ३ लाख १० हजार ९९७ कोटी रुपये दिले. वित्तीय यंत्रणेमध्ये केलेल्या विविध सुधारणांपोटी राष्ट्रीयकृत बँकांची कामगिरी चांगली झाली आहे. सर्व बँकांची कर्ज वाटपाची कामगिरीही वाढलेली असून मार्च २०२४ या वर्षाच्या अखेरीस त्यांच्या कर्ज वाटपात १६.३ टक्क्यांची वाढ झालेली आहे.नुकत्याच सुरू झालेल्या नवीन आर्थिक वर्षात म्हणजे मार्च २०२५ अखेरच्या वर्षांमध्ये कर्ज वाटपामध्ये साधारणपणे 11 ते १२ वाढ टक्के वाढ अपेक्षित आहे. दरम्यान केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी मोठ्या प्रकारच्या प्रकल्प कर्जांवर भर देण्यापेक्षा छोट्या व किरकोळ कर्जांवर जास्त भर द्यावा असे सुचवलेले आहे. अर्थात कर्ज वाटपातील हा बदल लगेचच होणे अपेक्षित नसले तरी नजीकच्या भविष्यकाळात सर्वच बँकांनी किरकोळ कर्जांवर जास्त भर दिला पाहिजे असे मत त्यांनी व्यक्त केले आहे.

पुणेस्थित एकमेव राष्ट्रीयकृत असलेल्या बँक ऑफ महाराष्ट्रची मार्च २०२४ अखेरची कामगिरी ही सर्वोत्तम झालेली आहे. बँकेने यावर्ष अखेरीस १५.९४ टक्क्यांची सर्वाधिक म्हणजे पहिल्या क्रमांकाची वाढ नोंदवलेली आहे. त्या खालोखाल स्टेट बँक ऑफ इंडिया यांनी १४.१२ टक्क्यांची दुसऱ्या क्रमांकाची वाढ नोंदवली. मात्र स्टेट बँक ऑफ इंडिया चा एकूण ठेवी व कर्ज व्यवसाय हा ७९ लाख ५२ हजार ७८४ कोटी रुपये इतका प्रचंड आहे.त्या तुलनेत बँक ऑफ महाराष्ट्राचा एकूण ठेवी व कर्ज व्यवसाय ४ लाख ७४ हजार ४११ रुपये इतका आहे. म्हणजे त्यांच्यापेक्षा १६.०७ पटीने स्टेट बँकेचा एकूण व्यवसाय आहे. तरीही बँक ऑफ महाराष्ट्रने मुदत ठेव संकलनात 15.66 टक्क्यांची वाढ नोंदवली तर स्टेट बँकेच्या बाबतीत ही वाढ ११.०७ टक्के आहे. त्या तुलनेत बँक ऑफ इंडिया ची मुदत ठेव वाढ ११.०५ टक्के आहे तर कॅनरा बँकेची १०.९८ टक्के आहे. बँक ऑफ महाराष्ट्र ची सर्वात उत्तम कामगिरी ही कमी खर्चाची बचत खाते चालू खाते म्हणजे ज्याला'कासा'( CASA) म्हणतात त्यात ५२.७३ टक्के इतकी सर्वाधिक वाढ राष्ट्रीयकृत बँकांमध्ये नोंदवलेली आहे.

SUNDAY EDGE
02•06•2024
BREAKING NEWS AND MORE
राष्ट्रसंचार
www.rashtrasanchar.com @rashtrasanchar





एक्झिट पोलचे निष्कर्ष

# केंद्रात पुन्हा मोदी सरकार

## भाजपच्या रालोआला ३५९ जागा, तर इंडिया आघाडीला १५४ जागा

## सट्टा बाजाराचा कौल भाजपलाच

लोकसभा निवडणुकीच्या शेवटच्या टप्प्यासाठी शनिवारी मतदान होणार आहे. त्यानंतर ४ जून रोजी मतमोजणी होऊन निकाल सर्वांसमोर येणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.निवडणुकीच्या निमित्ताने सट्टेबाजीचा बाजारही तापला असून, सट्टेबाजाराने भाजपच्या रालोआच्या पारड्यात कौल टाकला आहे. भाजपला ३१५ ते ३२५ आणि काँग्रेसला ४५ ते ५५ जागा मिळतील, असा सट्टाबाजाराचा अंदाज आहे.

भाजपच्या नेतृत्वाखालील रालोआ उत्तर प्रदेशमध्ये ६४ ते ६६ जागा जिंकण्याचा अंदाज वर्तवत आहे. त्यानुसार रालोआ २०१९ च्या कामगिरीची पुनरावृत्ती करू शकते. एवढेच नाही तर अनेक जागांवरही सट्टा लावला जात आहे. यामध्ये अमेठी, रायबरेली, मैनपुरी आणि कन्नौज या जागांचा समावेश आहे. सट्टा बाजाराच्या अंदाजानुसार अमेठीची जागा पुन्हा एकदा भाजपच्या खात्यात जाऊ शकते, येथून भाजपच्या स्मृती इराणी यांना विजय मिळू शकतो. रायबरेलीच्या जागेवर काँग्रेसची सत्ता कायम राहणार आहे. या जागेवरून राहुल गांधी विजयी होऊ शकतात आणि डिंपल यादव पुन्हा एकदा मैनपुरीमधून निवडणूक जिंकू शकतात.

एनडीएचा दावा आहे की, याशिवाय भाजपचे राजनाथ सिंह लखनऊमध्ये अडीच लाख मतांच्या फरकाने विजयी होतील. तर सपा अध्यक्ष अखिलेश यादव कन्नौज लोकसभा मतदारसंघातून आणि अरुण गोविल मेरठमधून निवडणूक जिंकू शकतात.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील रालोआ आघाडी ३५९ जागांसह सलग तिसऱ्यांदा सरकार स्थापन करेल. ३५-५० वर्षांच्या मतदारांनी पीए मोदी यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत, पुन्हा एकदा त्यांना पंतप्रधान करण्यासाठी केलेले मतदान भाजपला तिसऱ्यांदा विजयी करणारे ठरले आहे, असा कौल एक्झिट पोलमधून समोर आला आहे. ४५ टक्के मतदारांना मोदीच पुन्हा पंतप्रधान हवे आहेत. हेच भाजपच्या विजयाचे कारण ठरणार आहे. काँग्रेसपेक्षा प्रादेशिक पक्षांनी भाजपसमोर देशभरात आव्हान उभे केले, असे दिसून येते.


राजधानी दिल्लीतील ७ पैकी ७ ही जागा भाजपला मिळतील, असे स्पष्ट संकेत आहेत. अरविंद केजरीवाल यांनी त्यांना भ्रष्टाचाराच्या आरोपावरून झालेल्या अटकेचे राजकीय भांडवल केले असले, तरी जनतेने त्यांना नाकारले आहे. गेल्या वर्षी विधानसभेच्या निवडणुकीत कर्नाटकात काँग्रेसची सत्ता आल्याने, तेथे काँग्रेसला चांगल्या जागा मिळतील, असा इंडिया आघाडीला विश्वास होता. मात्र, कर्नाटकातही भाजप २८ पैकी २१ जागा मिळवेल.

देशातील सर्वात मोठे राज्य म्हणून ज्या उत्तर प्रदेशचा लौकिक आहे, त्या उत्तर प्रदेशात भाजप ६९ ते ७४ जागांवर विजयी होईल. काँग्रेस आघाडीला ६ ते ११ जागा मिळू शकतात.

### आयोगाने मांडले सर्वांचे आभार

भारताच्या निवडणूक आयोगाने मतदानात सहभागी असलेल्या सर्व संबंधितांचे आभार मानले आहेत, ज्यात मतदार, मतदान कर्मचारी, सुरक्षा दल, प्रसारमाध्यमे आणि राजकीय पक्ष यांचा समावेश आहे, कारण सात टप्प्यांत झालेल्या लोकसभा निवडणुकीसाठी मतदान संपले आहे. लोकसभा निवडणुकीसाठी पहिल्या टप्प्यात १९ एप्रिल रोजी मतदानाला सुरुवात झाली, त्यानंतर २६ एप्रिल, ७ मे, १३ मे, २० मे, २५ मे आणि १ जून रोजी मतदान झाले. ४ जून रोजी निकाल जाहीर होतील.

# महाराष्ट्रात महायुतीचेच पारडे जड




महाराष्ट्रातील ४८ मतदारसंघापैकी ७ ठिकाणी तिरंगी लढत होत असून, महायुती विरोधात महाविकास आघाडी अशीच लढत सर्वत्र आहे. संपूर्ण महाराष्ट्र या निवडणुकीने ढवळून काढला. अनेक अनपेक्षित धक्के बसलेले पहायला मिळणार आहेत. बहुतांश ठिकाणी महायुतीचे पारडे जड असून, शिवसेनेने चुकीचा उमेदवार दिल्याने, त्याचा फायदा उद्धव ठाकरे गटाला होताना दिसून येत आहे. काही तिरंगी लढतीत महायुतीचे पारडे जड असल्याचे दिसून येते, तर काही मतदारसंघात चुरशीच्या लढती पहायला मिळत आहेत.

### अकोला (भाजप)

प्रकाश आंबेडकर यांच्याविरोधात काँग्रेसने उमेदवार दिल्याने मतविभागणी होऊन भाजपला फायदा होत आहे. भाजप उमेदवार अनुप धोत्रे यांच्या विजयाची शक्यता आहे. उच्चवर्गीय आणि ओबीसी मतांच्या जोरावर भाजप ही जागा जिंकेल.

### संभाजीनगर (शिवसेना)

एमआयएमचे जलील आणि उध्दव गटाचे खैरे यांच्यात लढत होईल, असा अंदाज होता. मात्र, शिवसेनेने सांदीपान भुमरे यांच्या रूपाने ग्रामीण भागातील उमेदवार दिल्याने खैरेंना ही निवडणूक जड जाणार आहे. भाजपने येथे पूर्ण तयारी केली होती. ही जागा शिवसेनेला सोडल्याने ती मते भुमरे यांना मिळतील.

### सांगली (भाजप)

सांगली येथील लढत विशाल पाटील (काँग्रेस बंडखोर) विरुद्ध संजय पाटील अशीच होत असून, उध्दव गटाचे पैलवान चंद्रहार पाटील येथे लढतीत असले तरी ते काँग्रेसचे नुकसान करणार आहेत. या भागात भाजपला मानणारा मतदार असून, दोन आमदारही आहेत.

### हातकणंगले (चुरशीची लढत)

राजू शेट्टी विरुद्ध माने या लढतीत उध्दव गटाचे सत्यजित पाटील आल्याने ती रंजक झाली आहे. माने यांच्या विरोधात स्थानिक लोकांमध्ये तीव्र नाराजी असून, त्यांनी मोदींच्या विरोधात केलेली वक्तव्ये याला कारणीभूत आहेत. राजू शेट्टी मैदानात उतरल्याने ग्रामीण भागातील शेतकऱ्यांनी केलेले मतदान आणि जैन मतदान निर्णायक ठरली. ही लढत अत्यंत चुरशीची असून, येथे विजयाचे अंतर फार कमी असेल.

### भिवंडी (भाजप)

अपक्ष उमेदवार सांबरे विरोधात बाळ्या मामा म्हात्रे हे पवार गटातून उभे आहेत. सांबरे हे काँग्रेसचे असूनही अपक्ष उभे आहेत. आगरी विरुद्ध कुणबी अशी लढत असल्याने इथे चुरस कायम आहे. केंद्रीय मंत्री कपिल पाटील भाजपचे उमेदवार आहेत. उत्तर भारतीय मतदार मोठ्या संख्येने आहे. कपिल पाटील आघाडीवर आहेत.

### नंदुरबार (भाजप)

ही जागा अनुसूचित जमातीसाठी राखीव असून, काँग्रेसचा गड म्हणून ओळखले जाते. २०१४ मध्ये भाजप पहिल्यांदाच येथे जिंकली. हिना गावित यांच्या विरोधात नाराजी असली, तरी शिरपूर, साक्री आणि नंदुरबार येथून मिळणारे मताधिक्य भाजपसाठी निर्णायक ठरेल. अक्कलकुवा आणि नवापूर मधून काँग्रेसला मदत होईल. शिवसेनेचे अमश्या पाडवी अक्कलकुवामधून किती मदत करतात, यावर काँग्रेसचे मताधिक्य कमी होईल.

### ठाणे (शिवसेना)

भाजपच्या मतदानामुळे नरेश म्हस्के येथे जिंकत आहेत.

### रायगड (राष्ट्रवादी)

सुनील तटकरे विरुद्ध अनंत गीते हा सामना तितकासा एकतर्फी नव्हता. तटकरे यांना भाजपची मते मदत करणार आहेत. मतदानापूर्वीचा एक आठवडा निर्णायक ठरला, असे स्थानिकांचे म्हणणे आहे.

### रत्नागिरी सिंधुदुर्ग (भाजप)

नारायण राणे विरुद्ध विनायक राऊत या सामन्यात राणे यांचे कार्यकर्त्यांचे जाळे, स्वतःची हक्काची मते आणि भाजपची मिळालेली साथ यामुळे राणे ही जागा जिंकतील.

### कोकण (मुंबई प्रांत)

कोकण हाच शिवसेनेचा आधार असून, ठाणे हा सेनेचा गड आहे. एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्या विरोधात बंड केल्यामुळे तसेच शिवसेनेचे धनुष्यबाण आणि नाव आपल्या नावावर केल्यानंतर होत असलेली ही पहिलीच निवडणूक आहे. जागावाटप हे महायुती तसेच मविआ यांच्यासमोरील आव्हान ठरले. असे असतानाही, कोकण मुंबई प्रांतातील निवडणूक चुरशीची ठरली नाही.

### पालघर (भाजप)

हितेंद्र ठाकूर यांच्या बविआ विरोधात भाजपचे हेमंत सावरा अशी लढत पालघरला आहे. उध्दव गटाचा उमेदवार तुलनेत दुबळा आहे. संघाचे आदिवासी भागातील काम, विष्णू सावरा यांचा मतदार आणि वसई विरार पट्ट्यातील आणि पट्ट्या बाहेरील उत्तर भारतीय मतदार भाजपकडे असल्याने भाजपला फायदा झाला. २०१४ आणि २०१७ मध्ये भाजपने ही जागा जिंकली होती.

### धुळे (भाजप)

भाजपचाच विजय.

### रावेर (भाजप)

उमेदवार तोच ठेवूनही जातीय समीकरणे. भाजपचा एकतर्फी विजय. एकनाथराव खडसे यांची सून उमेदवार असल्याने त्यांनी सुनेसाठी इथे प्रयत्न केले आहेत. लेवा पाटील समाज मोठ्या प्रमाणात असून, तो पूर्वापार भाजपचा मतदार आहे.

### खानदेश

खानदेश हा भाजपचा बालेकिल्ला आहे, असे म्हणता येते. धुळे येथील उत्तमराव पाटील भाजपचे पहिले प्रदेशाध्यक्ष होते. खानदेश कायमच भाजपच्या मागे उभा असल्याचे दिसून येते.

### कल्याण (शिवसेना)

मुख्यमंत्र्यांचा मुलगा येथे उमेदवार असल्याने एकतर्फी लढत अपेक्षित होती. मात्र, अनेक स्थानिक समीकरणे प्रतिकूल होती. भाजपने ही जागा सेनेला सोडली. भाजपची मते निर्णायक ठरतील आणि श्रीकांत शिंदे विजयी होतील.

### पालघर (भाजप)

ठाण्याच्या बदल्यात भाजपला पालघर मिळाले. तिरंगी लढतीमुळे भाजपचे पारडे जड. उत्तर भारतीयांचे मतदान निर्णायक ठरणार. ठाकूर यांची बविआ विजयी होणार नाही.

### भिवंडी (भाजप)

तिरंगी लढतीत भाजपच्या मतांच्या जोरावर कपिल पाटील यांचा विजय निश्चित.

### उत्तर मुंबई (भाजप)

पियूष गोयल किती मताधिक्यांनी विजयी होणार याचीच प्रतिक्षा.

### उत्तर पश्चिम मुंबई (शिवसेना)

रविंद्र वायकर विरुद्ध अमोल किर्तीकर लढतीत भाजपने केलेल्या मतदानाच्या जोरावर शिवसेना विजयी होणार.

### उत्तर मध्य मुंबई (भाजप)

उज्ज्वल निकम यांना उमेदवारी देत, भाजपने संपूर्ण मुंबईचे गणित सोपे केले. निकम यांच्याविरोधात झालेला प्रचार संपूर्ण राज्यात मविआचे मताधिक्य कमी करणारा ठरला.

### उत्तर पूर्व मुंबई (भाजप)

मिहीर कोटेचा यांच्या मताधिक्याची प्रतिक्षा. भाजपचा विजय निश्चित.

### दक्षिण मध्य मुंबई (शिवसेना)

राहुल शेवाळे विरुद्ध अनिल देसाई ही प्रतिष्ठेची लढत असून, यात शेवाळे यांना फायदा होत आहे.

### दक्षिण मुंबई (शिवसेना)

भाजपने शिवसेनेला दिलेली ही जागा. शिवसेनेचा विजय निश्चित मानला जातो.

### जळगाव (भाजप)

भाजपचा पाया भक्कम असल्याने एकतर्फी विजय. कमळ हाच उमेदवार.

### अमरावती (काँग्रेस)

अमरावती येथे काँग्रेसला अनुकूल वातावरण आहे. बच्चू कडू यांच्या उमेदवारीमुळे महायुतीच्या नवनीत राणांना निवडणूक जड ठरेल. काँग्रेसचा विदर्भ हा बालेकिल्ला असल्याचा मविआला फायदा होत आहे. नवनीत राणा या गेल्यावेळी एनसीपी पुरस्कृत अपक्ष म्हणून जिंकल्या होत्या.

### पश्चिम महाराष्ट्र +उत्तर महाराष्ट्र

काँग्रेस आणि राष्ट्रवादीचा बालेकिल्ला म्हणून या प्रदेशाकडे पाहिले जाते. काँग्रेसच्या अनेक नेत्यांनी येथूनच सुरुवात केली. भाजपसाठी हा भाग आव्हानात्मक असाच राहिला. २०१४ नंतर काँग्रेसची घसरण सुरू असतानाही, या भागात काँग्रेसने चांगली कामगिरी केली आहे. सहकार क्षेत्र हे काँग्रेस आणि राष्ट्रवादीचे कुरण राहिले आहे. लोकसभा निवडणुकीत याच भागात महायुतीला आव्हान मिळाले आहे.

### कोल्हापूर (शिवसेना)

ग्रामीण भागातून मिळणाऱ्या मताधिक्यावर शिवसेना ही जागा जिंकेल.

### सांगली (भाजप)

मोदी लाटेत संजय पाटील विजयी होतील.

### पुणे (भाजप)

भाजपचे मुरलीधर मोहोळ येथे मोठ्या मताधिक्याने जिंकतील. काँग्रेसचे रविंद्र धंगेकर यांच्या उमेदवारीने येथील लढत रंजक झाली. मात्र, स्थानिक कार्यकर्ते नाराज असल्याचा फटका काँग्रेसला बसला.

### मावळ (शिवसेना)

या मतदारसंघात निम्मा कोकण आणि निम्मा पुणे जिल्हा आहे. भाजप आणि राष्ट्रवादी यांच्या मतांच्या जोरावर येथे शिवसेना विजयी होईल.

### अहमदनगर (भाजप)

यापूर्वी ही जागा भाजपने जिंकलेली आहे. लंके यांची पारनेर मतदारसंघात प्रतिमा चांगली असली, तरी मतदान कमळासाठी मोठ्या प्रमाणात झाले.

### सोलापूर (भाजप)

संघटनात्मक ताकद आणि हिंदुत्ववादी मते यांच्या जोरावर भाजप ही जागा जिंकेल, अशी शक्यता आहे. लिंगायत मते येथे निर्णायक ठरणार असून, ती एकगठ्ठा भाजपकडे जाताना दिसून आली. शिंदे यांना सोलापूर मध्य मधून मताधिक्य मिळेल. उर्वरित ठिकाणी भाजपला मताधिक्य असेल.

### नाशिक (उद्धव ठाकरे गट)

जागावाटपाला झालेला विलंब पराभवाचे कारण. शिवसेनेने उमेदवार बदलायला हवा होता, अशी भावना आहे. आज तरी उद्धव ठाकरे यांचे पारडे जड.

### हातकणंगले (चुरशीची लढत)

राजू शेट्टी, शिवसेना आणि उध्दव गट यांच्यातील कोणीही कमी मताधिक्याने येथून विजयी होईल. अंदाज बांधता येत नाही.

### सातारा (भाजप)

श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले विरुद्ध शशिकांत शिंदे अशी ही लढत, रंजक झाली नाही. भाजपला फायदा होत आहे.

### बारामती (राष्ट्रवादी)

बारामती हा शरद पवार यांचा बालेकिल्ला. दोन्ही पवारांनी प्रतिष्ठेच्या केलेल्या या लढतीत अजित पवारांनी बाजी मारली असल्याचे दिसते.

### शिरूर (चुरशीची लढत)

येथील लढतीत कोण विजयी होणार हे सांगता येणे अवघड असले, तरी भाजपची मते निर्णायक ठरतील. कमी मताधिक्याने ही जागा जिंकली जाईल.

### शिर्डी (उद्धव ठाकरे गट)

उद्धव ठाकरे गट ही जागा जिंकेल. नाराजी असतानाही लोखंडे यांना दिलेली उमेदवारी महागात पडेल. भाजपची मते मिळूनही शिवसेनेला येथे विजय मिळवणे अवघड झाले.

### माढा (चुरशीची लढत)

येथील लढत चुरशीची असून, धनगर मते निर्णायक ठरतील.

### दिंडोरी (चुरशीची लढत)

भारती पवार या केंद्रीय मंत्री असूनही भाजपसाठी ही जागा सोपी नाही. येथे अनपेक्षित निकाल लागू शकतो.

### नांदेड (भाजप)

अशोक चव्हाण यांच्या भाजप प्रवेशाने काँग्रेसचा हा गड भाजपकडे येत आहे. अशोक चव्हाण यांनी ही लढत प्रतिष्ठेची केली आहे.

### विदर्भ

- विदर्भ हा काँग्रेसचा बालेकिल्ला. मात्र, नितीन गडकरी आणि देवेंद्र फडणवीस यांच्या जोरावर भाजप येथे जनाधार वाढवत आहे.
- नागपूर (भाजप), वर्धा (भाजप), चंद्रपूर (काँग्रेस), भंडारा गोंदिया (भाजप), गडचिरोली (भाजप), अकोला (भाजप) असे स्वरुप असेल.
- अमरावती (काँग्रेसला फायदा)- येथील तिरंगी लढतीत काँग्रेसला फायदा होईल.
- रामटेक (शिवसेना)

### मराठवाडा

हैदराबाद संस्थान मधील पूर्वीचा हा भाग स्वातंत्र्यानंतर महाराष्ट्रात सामील झाला. महाराष्ट्रातील सर्वात कमी विकसित प्रदेश अशी या भागाची ओळख. पूर्वीच्या काळी हा देखील काँग्रेसचा गड होता. मराठा आंदोलनाचे केंद्र म्हणून वर्षभरात मराठवाडा चर्चेत आले. गोपीनाथ मुंडे यांच्या रूपाने भाजपला मिळालेले नेतृत्व याच भागातील. येथील मराठा समाज मोठ्या प्रमाणात भाजप विरोधात गेला. परिणामी इतर ओबीसी जातींचे ध्रुवीकरण येथे झाले. येथे महायुती आणि मविआ यांना समान संधी असल्याचे दिसून येते.

### संभाजीनगर (शिवसेना)

एमआयएमचे जलील आणि उध्दव गटाचे खैरे यांच्यात लढत होईल, असा अंदाज होता. मात्र, शिवसेनेने सांदीपान भुमरे यांच्या रूपाने ग्रामीण भागातील उमेदवार दिल्याने खैरेंना ही निवडणूक जड जाणार आहे. भाजपने येथे पूर्ण तयारी केली होती. ही जागा शिवसेनेला सोडल्याने ती मते भुमरे यांना मिळतील.

### जालना (भाजप)

रावसाहेब दानवे येथून पुन्हा एकदा निवडून येतील, अशी शक्यता आहे. मराठा आंदोलनाची सुरुवात येथूनच झाली. दानवे यांचा दांडगा जनसंपर्क त्यांना विजयी करणारा ठरेल.

### बीड (भाजप)

गोपीनाथ मुंडे यांची कन्या पंकजा मुंडे यांचे पारडे जड आहे. मराठा विरुद्ध वंजारी असे या लढतीचे स्वरुप. वंजारी समाजाचे मतदान सर्वात जास्त झाले.

### हिंगोली (उद्धव ठाकरे गट)

उमेदवार चुकीचा दिल्याने, उद्धव ठाकरे गटाची शक्यता वाढली आहे.

### धाराशिव (उद्धव ठाकरे गट)

उद्धव ठाकरे गट कमी मताधिक्याने येथून विजयी होतील.

### परभणी (रासप)

मराठा तसेच धनगर यांचे सर्वाधिक मतदान असलेल्या या मतदारसंघात भाजपने रासपच्या जानकर यांच्यासाठी ही जागा सोडून चांगला निर्णय घेतला, असे मानले जाते. मराठा मते निर्णायक ठरतील.

### लातूर (भाजप)

येथून भाजपला गेल्या दोन्ही लोकसभेत मतदान झाले.

Extra Special
Beyond the News
१
रविवार, ०२ जून २०२४
www.rashtrasanchar.com @rashtrasanchar

### संशोधन समाजाला उपयोगी पडावे : कुलगुरु प्रा. डॉ. सुरेश गोसावी

## अण्णासाहेब मगर महाविद्यालयात राष्ट्रीय मराठी पीएच.डी.कोर्सवर्क संपन्न



**पुणे :** मराठी साहित्य हे आपले सांस्कृतिक वैभव आहे. साहित्यिक, लेखक, कवी, नाटककार हे द्रष्टे असतात. समाजात परिवर्तन घडवण्याची क्षमता त्यांच्यात असते. समाजाचे प्रतिबिंब साहित्यात पडलेले असते. समाजाच्या संबंधीचे विषय, प्रश्न साहित्यात मांडले जातात. त्याविषयी विश्लेषण करून साहित्यातील मूल्ये समाजापर्यंत पोहचवली पाहिजेत. संशोधन समाजाला उपयोगी पडायला हवे. असे प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी यांनी केले.

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या अण्णासाहेब मगर महाविद्यालयाच्या मराठी संशोधन केंद्राच्या वतीने पीएच.डी.कोर्सवर्कचे २ ते ३१ मे २०२४ दरम्यान ऑनलाइन व ऑफलाईन स्वरूपात आयोजन करण्यात आले होते. या कोर्सवर्कच्या समारोप समारंभ प्रसंगी त्यांनी संशोधक विद्यार्थ्यांशी संवाद साधला. या कोर्सवर्कच्या समारोप प्रसंगी महाराष्ट्र शासनाच्या उच्च शिक्षण पुणे विभागाचे सह संचालक प्रा. डॉ. केशव तुपे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या आंतरविद्याशाखीय अभ्यास शाखेचे अधिष्ठाता प्रा. डॉ. प्रभाकर देसाई उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन घोरपडे यांनी स्वागत केले. साहित्याचा अभ्यास करताना सामाजिकशास्त्रीय परिप्रेक्षातून विचार करायला हवा. साहित्यात येणारे समाज, संस्कृती, इतिहास, तत्वज्ञान, आर्थिक, राजकीय इत्यादी आंतरविद्याशाखीय अनुबंध तपासायला हवेत. असे मत डॉ. प्रभाकर देसाई यांनी व्यक्त केले.

### जिल्ह्यातील चारही लोकसभा मतदार संघात

# मतमोजणीसाठी यंत्रणा सज्ज



EXTRA special story
जनादेश

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकींतर्गत जिल्ह्यातील सर्व चार लोकसभा मतदार संघाची मतमोजणी येत्या ४ जून रोजी होत असून मतमोजणीसाठी निवडणूक यंत्रणा सज्ज आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी दिली. डॉ. दिवसे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधला. यावेळी पोलीस उपायुक्त स्मार्तना पाटील, रोहिदास पवार, उप जिल्हा निवडणूक अधिकारी मीनल कळसकर आदी उपस्थित होते.

बारामती आणि पुणे लोकसभा मतदार संघांची मतमोजणी कोरेगाव पार्क येथील भारतीय अन्न महामंडळाच्या गोदामामध्ये, शिरुर लोकसभा मतदार संघाची मतमोजणी रांजणगाव, ता. शिरुर येथील महाराष्ट्र औद्योगिक वखार महामंडळाच्या गोदामामध्ये तर मावळ लोकसभा मतदार संघाची मतमोजणी शिवछत्रपती क्रीडा संकुल बालेवाडी येथील वेटलिफ्टिंग हॉलमध्ये होणार आहे.

सकाळी ईव्हीएम यंत्रे आणि टपाली मतपेट्या ठेवलेल्या सुरक्षा कक्षांचे (स्ट्रॉंग रुम) सील निवडणूक निरीक्षक, निवडणूक निर्णय अधिकारी आदी तसेच उमेदवार आणि उमेदवारांचे प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत काढल्यानंतर आवश्यक ती प्रक्रिया करुन मतमोजणीला प्रारंभ केला जाईल. प्रारंभी सकाळी ८ वाजता टपाली मतदान आणि ईटीपीबीएस मतांची मोजणी सुरू होईल. ईव्हीएमच्या मतमोजणीची सुरूवात ८ वाजून ३० मिनिटांनी होईल. मतमोजणी कक्षातील सर्व कामकाजाचे सीसीटीव्हीद्वारे संपूर्ण रेकॉर्डिंग करण्यात येणार असून याशिवाय व्हिडीओ कॅमेराद्वारेही चित्रीकरण करण्यात येणार आहे.

#### मतमोजणी केंद्रात मोबाईल आणण्यास मनाई

निवडणूकीच्या मतमोजणीची फेरीनिहाय आकडेवारी मतमोजणी केंद्राच्या ठिकाणाहून ध्वनीक्षेपकाद्वारे वेळोवेळी घोषित केली जाईल. मतमोजणी केंद्रामध्ये उमेदवार, निवडणूक प्रतिनिधी तसेच मतमोजणी प्रतिनिधी यांना मोबाईल सोबत बाळगण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. वैध ओळखपत्र नसलेल्या कुठल्याही अनधिकृत व्यक्तीला मतमोजणी कक्षात प्रवेश दिला जाणार नाही.

#### मतमोजणीसाठी टेबल आणि फेऱ्यांची रचना

प्रत्येक लोकसभा मतदार संघात विधानसभा मतदारसंघनिहाय स्वतंत्रपणे मतमोजणी टेबल लावण्यात येणार आहेत. मावळ लोकसभेची मतमोजणी प्रक्रिया ११६, पुणे लोकसभा ११२, बारामती-१२४ व शिरुर लोकसभा निवडणुकीची मतमोजणी प्रक्रिया ११२ टेबलद्वारे होणार आहे. मावळ मधील पनवेल आणि चिंचवड विधानसभा मतदारसंघासाठी प्रत्येकी २४ टेबल लावण्यात येणार असून मतमोजणीसाठी २३ फेऱ्या होणार आहेत. कर्जत आणि उरण विधानसभा मतदारसंघासाठी प्रत्येकी १४ टेबल आणि २४ फेऱ्या तर मावळ आणि पिंपरी विधानसभा मतदार संघासाठी १६ टेबल लावण्यात येणार मावळसाठी २४ तर पिंपरीसाठी २५ फेऱ्या होणार आहेत. तसेच पोस्टल व ईटीपीबीएस मतमोजणीसाठी ८ टेबल लावण्यात येणार आहेत.

पुणे लोकसभाअंतर्गत वडगाव शेरी २२, शिवाजीनगर, पुणे कॅन्टोंमेंट, कसबा पेठ प्रत्येकी १४, कोथरुड २० तर पर्वती विधानसभा मतदार संघ क्षेत्रासाठी १८ टेबलवर मतमोजणी होणार असून पोस्टल व ईटीपीबीएस मतमोजणीसाठी १० टेबलची व्यवस्था असेल. वडगाव शेरी २१, शिवाजीनगर, कोथरुड, पर्वती, कसबा पेठ व पुणे कॅन्टोंमेंटसाठी प्रत्येकी २० फेऱ्यांमध्ये मतमोजणी होईल.

बारामती लोकसभा मतदार संघातील दौंड मतदारसंघासाठी १४ टेबल व २३ फेऱ्या, इंदापूर १६ टेबल व २१ फेऱ्या, बारामती १८ टेबल व २२ फेऱ्या, पुरंदर २० टेबल व २२ फेऱ्या, भोर २४ टेबल व २४ फेऱ्या तर खडकवासला विधानसभा मतदार संघासाठी २२ टेबल व २४ फेऱ्या होतील.

शिरुर लोकसभा मतदार संघातील जुन्नर मतदारसंघासाठी १४ टेबल व २५ फेऱ्या, आंबेगाव १४ टेबल व २४ फेऱ्या, खेड-आळंदी १६ टेबल व २४ फेऱ्या, शिरुर १६ टेबल व २७ फेऱ्या, भोसरी २० टेबल व २३ फेऱ्या तर हडपसर विधानसभा मतदार संघासाठी २० टेबल व २६ फेऱ्या होतील. पोस्टल व ईटीपीबीएस मतमोजणीसाठी १२ टेबल लावण्यात येणार आहेत.

#### मतमोजणीसाठी मनुष्यबळाची नियुक्ती

ईव्हीएम मतमोजणीसाठी एकूण ६५६ मतमोजणी सहायक, ६०० मतमोजणी पर्यवेक्षक आणि ६४० सूक्ष्म निरीक्षक असे एकूण १ हजार ८९६ मनुष्यबळ तर टपाली व ईटीपीबीएस मतमोजणीसाठी ४७ मतमोजणी पर्यवेक्षक, ६९ मतमोजणी सहायक आणि ५८ सूक्ष्म निरीक्षक असे १७४ याप्रमाणे एकूण २ हजार ७० मनुष्यबळ नियुक्त करण्यात आले आहे.

मावळ लोकसभा मतदार संघाच्या ईव्हीएम मतमोजणीसाठी १६२ मतमोजणी सहायक, १३७ मतमोजणी पर्यवेक्षक आणि १५८ सूक्ष्म निरीक्षक, पुणे लोकसभेसाठी १६८ मतमोजणी सहायक, १५९ मतमोजणी पर्यवेक्षक आणि १६३ सूक्ष्म निरीक्षक, बारामतीसाठी १६४ मतमोजणी सहायक, १५२ मतमोजणी पर्यवेक्षक आणि १५३ सूक्ष्म निरीक्षक, शिरुरसाठी १६२ मतमोजणी सहायक, १५२ मतमोजणी पर्यवेक्षक आणि १६६ सूक्ष्म निरीक्षकांची नेमणूक करण्यात आली आहे.

पोस्टल व ईटीपीबीएस मतमोजणीसाठी मावळ लोकसभा मतदार संघात १४ मतमोजणी सहायक, ७ मतमोजणी पर्यवेक्षक आणि ८ सूक्ष्म निरीक्षक, पुणे लोकसभेसाठी १९ मतमोजणी सहायक, १२ मतमोजणी पर्यवेक्षक आणि १४ सूक्ष्म निरीक्षक, बारामतीसाठी २० मतमोजणी सहायक, १० मतमोजणी पर्यवेक्षक आणि १८ सूक्ष्म निरीक्षक तर शिरुर लोकसभा मतदार संघासाठी १६ मतमोजणी सहायक, प्रत्येकी १८ मतमोजणी पर्यवेक्षक आणि सूक्ष्म निरीक्षक यांची नेमणूक करण्यात आली आहे.

#### वाहनतळ व्यवस्था


पुणे व बारामती लोकसभा मतदार संघाच्या मतमोजणीसाठी येणारे मनुष्यबळ व उमेदवार तसेच उमेदवारांचे प्रतिनिधी, नागरिक यांच्यासाठी वाहनतळाची पुरेशी व्यवस्था करण्यात आलेली आहे. पुज्य कस्तुरबा गांधी शाळा नॉर्थ मेन रोड, कोरेगाव पार्क येथे ६०० ते ७०० वाहनक्षमता असलेले दुचाकी वाहनतळ फक्त अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. तसेच नागरिकांसाठी रोही व्हिला लॉन्स लेन नं.७, कोरेगाव पार्क येथे ६०० ते ७०० वाहनक्षमतेचे दुचाकी व चारचाकी वाहनतळ तर द पूना स्कूल ॲन्ड होम फॉर द ब्लाईंड ट्रस्ट, नॉर्थ मेन रोड, कोरेगाव पार्क येथे प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी व नागरिकांसाठी ८०० ते ९०० वाहनक्षमता असलेल्या चारचाकी वाहनतळाचे नियोजन करण्यात आले आहे.

याशिवाय सदर दिवशी वाहतुकीला अडथळा येऊन वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी वाहतूक वळविण्याचे आदेश पोलीस प्रशासनास दिले आहेत. मतमोजणीसाठी येणाऱ्या सर्व घटकांना कोणतीही असुविधा होणार नाही यासाठी निवडणूक प्रशासन सर्व ती काळजी घेत असून नागरिकांनीही सहकार्य करावे, असे आवाहनही डॉ. दिवसे यांनी केले आहे.

## अवतीभवती

CITY UPDATE

### मनोज जरांगे लढवणार विधानसभेच्या २८८ जागा



**पुणे :** मनोज जरांगे पाटील यांच्या या घोषणेमुळे लोकसभा निवडणुकीच्या निकालाआधी सर्वांचेच टेन्शन वाढवले आहे. मनोज जरांगे पाटील हे २०१३ मधील एका फसवणूक प्रकरणासाठी पुण्याच्या शिवाजीनगर न्यायालयामध्ये हजर झाले होते. याप्रकरणात मनोज जरांगे पाटील यांना दिलासा देत कोर्टाने त्यांचे अटक वारंट रद्द केले आहे. याप्रकरणाच्या सुनावणीनंतर माध्यमांशी संवाद साधताना मनोज जरांगे पाटील यांनी मोठी घोषणा करत सरकारवर देखील निशाणा साधला.

मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळाले नाही तर विधानसभेला २८८ जागांवर उमेदवार देणार', अशी घोषणा मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी केली. पुण्यातून त्यांनी ही मोठी घोषणा केली आहे. मनोज जरांगे पाटील यांनी माध्यमांशी संवाद साधताना सांगितले की,'मी जातीवाद काही करत नाही बीडमध्ये मी आव्हान केलं आहे. मी फक्त विरोध करणाऱ्यांना पाडा असं म्हणालो होतो. ४ तारखेपासून पुन्हा अमरण उपोषणाला बसणार आहे.' तसंच, 'मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळालं नाही तर विधानसभेला २८८ जागांवर उमेदवार देणार असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्टपणे सांगितले. त्यांच्या या वक्तव्यामुळे आता राजकीय वर्तुळात चर्चा रंगल्या आहेत.

### साठेबाजांमुळे साखरेचे दर तेजीत राहण्याचा अंदाज

**पुणे :** केंद्राने मे महिन्यासाठी साखरेचा २७ लाख ५० हजार टन इतका मुबलक कोटा घोषित केला होता. त्यामुळे कोटा घोषित होताच साखरेच्या दरात क्विंटलला पन्नास रुपयांनी घसरण पाहावयास मिळाली होती. मात्र, ही घसरण तात्पुरती ठरून साखरेचे दर पुन्हा तेजीकडे झुकले. कारण, साठेबाजांच्या वाढलेल्या सक्रियतेमुळे साखरेचे दर पुन्हा वाढले. केंद्र सरकारने जून महिन्यासाठी २५ लाख ५० हजार टन साखरेचा कोटा खुला केला आहे. मात्र, मागणीच्या तुलनेत कोटा वाजवी असूनही साठेबाजांमुळे साखरेचे दर तेजीत राहण्याचा अंदाज बाजारपेठेतून वर्तविण्यात येत आहे. साठेबाजांची साखर व्यापारात वाढलेली सक्रियता हेच दर तेजीत राहण्याचे कारण असल्याचे सांगण्यात येत आहे.

जून महिन्यासाठी जाहीर करण्यात आलेला २५.५० लाख टन इतका साखरेचा कोटा मागणीच्या तुलनेत योग्य असल्याचा सूर घाऊक बाजारपेठेतून आळविण्यात येत आहे. मात्र, साठेबाजांची तेजीची धारणा आणि त्यांची बाजारावर असलेली घट्ट पकड, यामुळे दरावर कोणताच फरक मंगळवारी पडला नाही. याबाबत माहिती देताना व्यापारी म्हणाले की, जून महिना म्हटले की शाळा महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांचा प्रवेश, वह्या-पुस्तके, गणवेश खरेदीवर खर्च अधिक होतो. त्यामुळे बाजारपेठेत ग्राहकांची खरेदी रोडावते, तसेच जून महिना असल्याने पावसामुळेही मागणी कमी राहते. अशा स्थितीत साखरेचे दर स्थिरावणे अपेक्षित आहे. मात्र, साठेबाजांच्या सक्रियतेमुळे दरात कोणताही बदल झाला नाही. एस ३० ग्रेड साखरेचा क्विंटलचा दर ३९०० ते ३९५० रुपयांवर स्थिरच होता. १ जूनपासून नवीन कोट्यातील साखरेच्या निविदा निघतील. त्यावेळी नेमकी स्थिती समोर येईल.

### पालिकेला दोषी ठरवत

## वाहतूक पोलिसांनी थेट दहा रस्त्यांची यादीच ठेवली उपमुख्यमंत्र्यांपुढे

**पुणे :** शहरातील प्रमुख रस्त्यांवरील अडथळ्यांची यादीच पोलिसांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना सादर केली असून, ही कोंडी सोडविण्यासाठी पालिकेने नक्की काय उपाययोजना कराव्यात हे त्यात दिले आहे. शहरातील वाहतूक कोंडीचे खापर पोलिसांनी महापालिकेवर फोडले आहे. त्यानंतर महापालिका आयुक्तांसह विभागीय आयुक्त, वाहतूक पोलिसांच्या यंत्रणेने शहरातील दिवसभर रस्त्यांची पाहणी करून उपाययोजनांचे आदेश दिले.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नुकताच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ चौकातील दुमजली उड्डाणपुलाच्या कामाचा आढावा घेतला. यावेळी शहरातील वाहतूक कोंडीच्या प्रश्नाबाबत चर्चा झाली. यावेळी वाहतूक पोलिसांनी थेट दहा रस्त्यांची यादीच उपमुख्यमंत्र्यांपुढे मांडली.

आयत्यावेळी पोलिसांकडून ही यादी पुढे आणण्यात आल्याने पालिकेचे अधिकारीही गडबडले. विशेष म्हणजे या यादीत नक्की कशामुळे



वाहतूक कोंडी होते आणि त्यावर पालिका प्रशासनाकडून कशा पध्दतीने काहीच उपाययोजना होत नाहीत, हे स्पष्ट करण्यात आले होते. त्याबाबत पालिकेच्या अधिकाऱ्यांना मात्र काहीच उत्तरे देता आली नाहीत. त्यामुळे ही बैठक संपताच विभागीय आयुक्त, महापालिका आयुक्त आणि वाहतूक पोलीस उपायुक्त यांनी एकत्रित या सर्व रस्त्यांची पाहणी करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार सकाळी सुरू झालेली ही पाहणी रात्री दहा वाजेपर्यंत सुरू होती. या पाहणीनंतर कोंडी फोडण्यासाठी कोणत्या विभागाने काय उपाययोजना करायच्या याबाबत पुन्हा या सर्व विभागांची एकत्रित बैठक बोलाविण्यात आली असल्याचे आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी सांगितले.

#### या दहा रस्त्यांची पहाणी

- गंगाधाम ते लुल्लानगर चौक
- नॉर्थ मेन रस्ता कोरेगाव पार्क
- पुणे-बंगळुरू महामार्ग
- बाणेर-सूस रस्ता
- गणेशखिंड रस्ता
- सोलापूर रस्ता (पीएमपी डेपो)
- पुणे-नगर रस्ता (वाघोली)
- कात्रज- मंतरवाडी रस्ता
- जुना मुंबई-पुणे महामार्ग
- थेऊरफाटा-लोणीकंद रस्ता

## RS NEWS DIGEST

### पतीने पत्नीला डिझेल ओतून जिवंत जाळले, गुन्हा दाखल

**पुणे :** शहरातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. घरगुती वादातून पतीने पत्नीला जिवंत जाळले आहे. आरोपी भाजी विक्रीचा व्यवसाय करतो. गंभीर जखमी झालेल्या महिलेला रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. ही धक्कादायक घटना पुण्यातील गणपती माथा वारजे-माळवाडी परिसरात घडली आहे. प्रवीण बाबासाहेब चव्हाण (वय २६, रा. अहिरे गाव) असे आरोपीचे नाव असून पूजा प्रवीण चव्हाण असे मृत तरुणीचे नाव आहे. दाम्पत्यामध्ये झालेल्या वादातून ही घटना घडल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. रागाच्या भरात पतीने डिझेल पत्नीच्या अंगावर ओतले व तिला आग लावली. गंभीर भाजलेल्या पत्नीला त्याने रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, घटनेनंतर आरोपी रुग्णालयातून पळून गेला. वारजे-माळवाडीचे पोलीस निरीक्षक मनोज शेंडगे यांनी सांगितले की, आरोपींच्या अटकेसाठी आम्ही एक पथक तयार केले आहे. मृत महिलेचा भाऊ अमोल पवार यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार आरोपींविरुद्ध भादंवि कलम ३०२ आणि ४९८ (अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### प्रांत कटारेंवर कारवाई होईल - जिल्हाअधिकारी

**पुणे :** प्रांतस्तरीय अधिकाऱ्यांची बदली राज्य शासनाकडून होते, जिल्हाधिकारी अशी बदली करू शकत नाहीत. पुणे-नाशिक द्रुतगती रेल्वेमार्ग आणि वर्तुळाकार रस्ता या प्रकल्पांच्या भूसंपादनाबाबत चौकशी करण्यात येत असून, या अनुषंगाने तपासणी देखील करण्यात येत आहे. अशी माहिती जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी दिली. पुण्याचे जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांचे खेड विधानसभा मतदारसंघाच्या विद्यमान आमदारांसोबत घनिष्ठ राजकीय संबंध असून, ते त्यांच्या प्रभावाखाली काम करीत आहेत, असा आरोप खेडचे प्रांताधिकारी तथा खेड-आळंदी विधानसभा मतदारसंघाचे सहायक निवडणूक निर्णय अधिकारी जोगेंद्र कट्यारे यांनी केला आहे.

माझ्याकडे प्रत्यक्ष, मेलवर आणि पत्राने भूसंपादनाबाबत अनेक तक्रारी आल्या होत्या. या तक्रारी अतिशय गंभीर स्वरूपाच्या आहेत. त्यामुळे भूसंपादनाचे पैसे वाटपाचे काम त्यांच्याकडून काढून दुसऱ्या अधिकाऱ्याकडे देण्याचे आदेश काढले होते. या आदेशाने ते बहुधा व्यस्थित झाले असावेत. तसेच या तक्रारींच्या अनुषंगाने दोन अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांची चौकशी समिती नेमली होती. हितसंबंध नसताना पैसे वाटप करणे, तक्रार अर्जाची चौकशी करून निर्णय दिल्यानंतर त्याचे पालन न करणे, काही प्रकरणात पैसे न्यायालयात जमा न करणे, काही निर्णय फिरविण्यात आले. एखाद्या कामाचे फेरवाटप करणे, काम काढून घेणे आणि दुसऱ्याकडे देणे हे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना आहेत. दफ्तर तपासणी करणे हे अधिकार देखील जिल्हाधिकाऱ्यांकडे असतात. केंद्रीय निवडणूक आयोगाने तपासणी करूनच माझी पुणे जिल्हाधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे. त्यांच्या आरोपांवर शासनस्तरावर कारवाई केली जाईल, असे जिल्हाधिकारी दिवसे यांनी सांगितले.

कटारे यांनी मागणी केली आहे, की मतमोजणीपूर्वी डॉ. दिवसे यांची बदली करावी; अन्यथा आगामी विधानसभा निवडणुकीत स्थानिक अधिकारी, कर्मचारी पारदर्शकपणे काम करू शकणार नाहीत, अशा आशयाचे पत्र कट्यारे यांनी केंद्रीय निवडणूक आयुक्त, राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी आणि महाराष्ट्राचे प्रधान सचिव यांना पाठविले. लोकसभा निवडणुकीची मतमोजणी अवघ्या दोन दिवसांवर येऊन ठेपली असताना या पत्रामुळे जिल्हा प्रशासनात एकच खळबळ उडाली आहे. डॉ. दिवसे यांनी पुणे जिल्ह्यातच गेल्या अनेक वर्षांपासून विविध पदांवर काम केले आहे. लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता सुरू असताना त्यांनी माझे भूसंपादनाचे अधिकार काढून घेतले. तसेच यापूर्वी सुरू असलेल्या भूसंपादनाच्या कामाची चौकशी सुरू असताना माझ्या आणि खेड तहसीलदार यांच्या कार्यालयावर छापा टाकून झडती घेतली असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे.

### खडकवासला धरण चौपाटीवरील वाहतूक कोंडीकडे दुर्लक्ष

**पुणे :** खडकवासला धरण चौपाटीला पर्यटक येत असल्याने विक्रेत्यांची संख्या वाढत आहे. खडकवासला ग्रामपंचायत होती त्यावेळी पूर्ण भाग ग्रामीण पोलीस दलात होता. वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी जिल्हा अधीक्षक कार्यालयाकडून जादा बंदोबस्त दिला जात होता. आता गावाचा समावेश पुणे महापालिकेत झाला आहे. परंतु पोलीस दप्तरी गाव अद्यापही ग्रामीण विभागाकडेच आहे. ते शहर पोलीस आयुक्तालयात जाण्याच्या वाटेवर आहे. त्यामुळे धरण चौपाटीवरील वाहतूक कोंडीकडे दुर्लक्ष केले होत आहे का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

खडकवासला धरण चौपाटीवर मागील पंधरवड्यापासून शनिवार, रविवारी वाहतूक कोंडी होत आहे. वाहतूक कोंडी का होते, कोंडी होऊ नये, कोणत्या उपाययोजना केल्या पाहिजे, त्या कोणी कराव्यात, याबाबत प्रशासकीय अनास्था दिसून येत आहे. त्यामुळे कोंडीचा प्रश्न दिवसेंदिवस जटिल होत आहे. येथील रस्ता अरुंद होता, त्यावेळी दर शनिवारी आणि रविवारी चौपाटीवरील विक्रेत्यांना बंदी केली होती. या दोन्ही दिवशी हातगाड्यांना बंदी घातली होती. हातात डबे घेऊन विक्री करून दिली जात होती. हा प्रयोग यशस्वी होता, कारण विक्रेते नसल्याने येथे पर्यटक जास्त थांबत नव्हते. मात्र गेल्या काही दिवसांपासून पर्यटक आणि विक्रेत्यांची संख्या वाढली आहे.



खडकवासला चौपाटीला पावसाळ्यात पर्यटकांची प्रचंड गर्दी असते. जादा अधिकारी, कर्मचाऱ्यांची मागणी केली आहे. विक्रेत्यांशी चर्चा करून रस्त्यालगत बॅरिकेड्स करण्याच्या सूचना दिल्या आहेत. यामुळे पुण्याला जाणाऱ्या रस्त्यावर वाहने उभी करता येणार नाहीत. पाऊस झाला की, वाहनांचा वेग मंदावतो. बॅरिकेड्स आणि जादा बंदोबस्तामुळे वाहतूक कोंडी होणार नाही, यासाठी आमचे प्रयत्न असतील."

**— कैलास ढोले पाटील**
उपविभागीय पोलिस अधिकारी, हवेली.

**शिक्रापूर :** येथील सुमनबाई मुळावकर या रांजणगाव गणपती येथे श्रीकृष्ण देवाच्या कार्यक्रमासाठी गेलेल्या असताना पुणे-नगर महामार्गावर रस्ता ओलांडताना समोरून आलेल्या बसची सुमनबाई यांना धडक बसून अपघात झाला. यावेळी नागरिकांनी सदर महिलेला उपचारासाठी शिक्रापूर ग्रामीण रुग्णालयात आणले असता डॉक्टरांनी सुमनबाई दत्तात्रय मुळावकर वय ७० मृत्यूझाल्याचे जाहीर केले.

### महामार्गाचे रुंदीकरण : सिंमेटचे दुभाजक ठरताहेत अडचणीचे

# अरुंद रस्त्यामुळे वाहतुकीचा खोळंबा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुरंदर :** तालुक्यातील दौंडज ते पिसुर्टी दरम्यान पुणे-पंढरपूर पालखी महामार्गाच्या विस्तारीकरणाचे काम जलद गतीने सुरू असल्याने वाहतुकीत वेळोवेळी बदल केला जात आहे. अशातच वाल्हे येथील बसस्थानक परिसरातील महामार्गावर, दुहेरी मार्ग तयार होण्यापूर्वीच रस्त्याच्यामध्ये सिमेंटचे दुभाजक लावून एकेरी मार्ग सुरू केल्याने या अरुंद रस्त्यावर वाहतुकीची वेळोवेळी वाहतूककोंडी होत असल्याचे चित्र पाहिला मिळत आहे.

पुणे-पंढरपूर पालखी महामार्गावरील वाल्हे येथील महर्षि वाल्मिकी विद्यालय ते माळवाडी दरम्यान महामार्गाचे काम तसेच या मार्गावरील पुलाचे व सर्विस रस्त्याचे काम मागील काही दिवसांपासून जलद गतीने सुरू करण्यात आले आहे. मात्र, दुहेरी मार्ग तयार होण्याआधीच पूर्वीच्या अरूंद असलेल्या रत्याच्या मधोमध सिंमेटचे दुभाजक लावल्याने अत्यंत अरुंद झालेल्या रस्त्यावर अनेक वाहन चालकांना महामार्गाचा अंदाज येत नसल्याने अपघातास सामोरे जावे लागत आहे.

त्यातच श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर पुणे-पंढरपूर पालखी महामार्गाचे विस्तारीकरणाचे काम जलद गतीने सुरू असताना वाहन चालक व प्रवाशांच्या सोईसुविधांकडे रस्ते महामंडळ दुर्लक्ष करत असल्याचा आरोप येथील नागरिकांमधून व्यक्त केला जात आहे. मागील महिन्याभरात जेजुरी औद्योगिक वसाहत ते पिसुर्टी फाटा या मार्गावर संबंधित ठेकेदाराच्या मनमानी आणि चुकीच्या कार्यपद्धतीमुळे अनेक लहान-मोठे अपघात घडले असून, यामध्ये काहींचा मृत्यू झाला आहे.

तसेच अनेकांना कायमचे अपंगत्व आले आहे. पालखी महामार्गाच्या विस्तारीकरणात वाल्हे बसस्थानक जमीनदोस्त करण्यात आले असून, पुर्ण उन्हाळ्यात प्रवाशीवर्गाला उन्हात उभे राहून एसटी बसची वाट पाहत थांबावे लागत होते. अशातच प्राथमिक आरोग्य केंद्रच्या गेट शेजारीच एसटी बसची वाट पाहत थांबलेल्या प्रवाशांना घेण्यासाठी किंवा उतरण्यासाठी बस थांबल्यास, दुतर्फा वाहनांच्या रांगा लागत आहेत. त्यातच रस्त्यावर गर्दी होऊन वाहनचालकांची देखील शाब्दिक बाचाबाची आणि वाद होत आहे.

महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी यामध्ये त्वरित लक्ष घालून प्रवाशांची व वाहन चालकांच्या अडचणी सोडविण्यासाठी प्रयत्न करावेत अन्यथा ठेकेदाराच्या विरुद्ध आंदोलन छेडण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

**अत्यावश्यक सेवेत अडथळा; ग्रामस्थांची नाराजी**

● वाल्हे बसस्थानक परिसरात होत असलेल्या वाहतूक कोंडीतून, अत्यावश्यक सेवेची गरज असलेल्या रुग्णास उपचारास घेऊन जाताना अडथळे निर्माण होत असल्याचेही प्रवाशीवर्गामधून सांगण्यात येत आहे. त्यामुळे येथील दुहेरी मार्ग सुरू करून स्थानिकांसह, प्रवाशीवर्गाची गैरसोय दूर करण्याची मागणी ग्रामस्थांमधून होत आहे.

### दैनिक राष्ट्रसंचारच्या बातमीनंतर आकाशचिन्ह विभागाची कारवाई

# वाघोलीत धोकादायक होर्डिंग जमीनदोस्त

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क





वीज महावितरणच्या एनओसी परवानगी नाही; भविष्यात दुर्घटना घडल्यास मोठी हानी

वाघोलीत वीज वाहिन्यांवर उभारण्यात आले धोकादायक होर्डिंग

२९ मे २०२४

राष्ट्रसंचार IMPACT

**वाघोली :** येथील पुणे-नगर महामार्गासह परिसरातील धोकादायक होर्डिंग्ज बुधवारी व गुरुवार नगररोड वडगावशेरी क्षेत्रीय कार्यालयाच्या आकाश चिन्ह विभागाच्या पथकाने आव्हाळवाडी फाट्यावरील धोकादायक होर्डिंगसह सात होर्डिंग्ज क्रेनच्या सहाय्याने जमीनदोस्त केले.

धोकादायक होर्डिंग्जवर मनपा प्रशासनाने केलेल्या कारवाईमुळे नागरिकांमधून समाधान व्यक्त केले जात आहे. "वाघोलीत वीज वाहिन्यांवर उभारण्यात आले धोकादायक होर्डिंग" अशा आशयाची बातमी दैनिक राष्ट्रसंचार वृत्तपत्रात दि. २९ रोजी प्रसिद्ध करण्यात आली होती. बातमी प्रसिद्ध होताच वाघोली येथील बेकायदेशीर धोकादायक होर्डिंगवर प्रशासनाच्यावतीने कारवाई करण्यास सुरुवात झाली.

मुंबईतील घाटकोपर होर्डिंग दुर्घटनेनंतर पुणे महापालिका प्रशासन ॲक्शन मोडवर आले असून, उपायुक्त किशोर शिंदे व नगररोड वडगावशेरी क्षेत्रीय कार्यालयाचे सहाय्यक आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली वाघोलीतील धोकादायक होर्डिंगवर गुरुवारी (दि. ३०) पोलीस बंदोबस्तात हटविण्यात आले. आव्हाळवाडी फाटा येथील वर्दळीच्या ठिकाणी असलेले धोकादायक होर्डिंगसह अन्य ठिकाणचे सात होर्डिंग आकाश चिन्ह विभागाचे मुख्य निरीक्षक गणेश भारती यांच्या पथकाने क्रेनच्या सहाय्याने काढून जमीनदोस्त करण्यात आले. पुणे-नगर महामार्गासह परिसरातील धोकादायक होर्डिंग्जवर कारवाई करण्यात येणार असल्याचे आकाश चिन्ह विभागाचे मुख्य निरीक्षक गणेश भारती गणेश भारती यांनी सांगितले. मनपा प्रशासनाने वेळीच गांभीर्याने लक्ष देवून होर्डिंगसह परवान्याची तपासणी करून अनधिकृत, धोकादायक ठिकाणचे होर्डिंग काढण्यात यावे, असे प्रकाश जमधडे सामाजिक कार्यकर्ते यांनी सांगितले. तसेच इतरही अनधिकृत होर्डिंग्ज हटविण्यात यावे, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.-

## राजमाता अहिल्यादेवी जयंती उत्साहात साजरी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जुन्नर:** राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची २९९ वी जयंती जुन्नरमधे मोठ्या उत्साही, आनंदी वातावरणामध्ये साजरी करण्यात आली. क्षत्रिय हिंदू खाटीक समाज जुन्नरचे अनिल घोणे, अशोक घोटणे, विकास घोणे, संदिप घोणे, संतोष घोणे, आदींसह समाज बांधव यावेळी मोठ्या संख्येने सहभागी झालेले होते. राजमाता अहिल्यादेवी यांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले. तसेच राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीदिनी शासकीय सुट्टी जाहीर करण्याची मागणी यावेळी समाज बांधवांच्यावतीने करण्यात आली. एक कुशल महिला प्रशासक म्हणून त्यांची ओळख आजही कायम आहे. आपल्या धर्माचे पालन करून आपल्या संस्कृतीचे त्यांनी जतन केले.

# आयकर विभागाच्या धाडीची चर्चा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**रांजणगाव गणपती :** येथील औद्योगिक वसाहतीमधील एका बड्या नामांकीत बहुराष्ट्रीय कंपनीतील दोन बड्या अधिकाऱ्यांच्या घरी आयकर विभागाने छापे टाकले असल्याची चर्चा दबक्या आवाजात रांजणगाव औद्योगिक परिसरात सुरू आहे.

मंगळवारी व बुधवारी हा प्रकार घडला आहे. रांजणगाव औद्योगिक वसाहतीमधील एका बड्या नामांकीत बहुराष्ट्रीय कंपनीतील कंपनी व्यवस्थापन अधिकारी व मनुष्यबळ विकास अधिकारी म्हणुन काम करत असलेल्या दोन अधिकारी यांच्या पुण्यातील घरी आयकर विभागाने धाडी टाकून करोडो रुपयांची रोख रक्कम, अडीच ते तीन किलो सोने व पुणे शहर व जिल्ह्यात असलेल्या फ्लॅट व प्लॉटसारख्या मालमत्तेची कागदपत्रे हस्तगत केली असल्याची चर्चा रांजणगाव एमआयडीसी परिसरात जोर धरु लागली आहे. याबाबत संबंधित आधिकारी यांच्याशी संपर्क साधला असता संपर्क होऊ शकला नाही. दरम्यान, कामगार व ठेकेदारांच्या लोणी खाणाऱ्या या अधिकाऱ्यांवर कंपनी प्रशासन काय कारवाई करणार का, असा प्रश्न सध्या उपस्थित केला जात आहे. तसेच यावर कारवाई होणार की हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.

# लग्नास नकार दिला म्हणून मारहाण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**उरुळी कांचन:** मेहुणीबरोबर लग्न का केले नाही म्हणून ४ ते ५ जणांच्या टोळक्याने एका तरुणाला व भांडणे सोडवण्यासाठी आलेल्या तिघांना तलवार, लाकडी दांडक्याने बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. याप्रकरणी उरुळी कांचन पोलीस ठाण्यात दोन महिलांसह चौघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

उरुळी कांचन ग्रामपंचायत हद्दीतील लक्ष्मीआई मंदीराजवळील, वडार वस्ती, बाजारमैदानजवळ मंगळवारी (दि. २८ ) रात्री दहा ते अकरा वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. चैत्राली शिवाजी जाधव, प्रकाश कचरू पवार, अंजली कचरू पवार सर्व (रा. पांढरेमळा हडपसर), शिवाजी जाधव रा. वडारवस्ती बाजार मैदान उरूळी कांचन ता. हवेली) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या चौघांची नावे आहेत.

याप्रकरणी अजय उर्फ प्रमोद भानुदास जाधव (वय २६), धंदा मजुरी (रा. लक्ष्मीआई मंदीराजवळ वडारवस्ती बाजारमैदान ऊरूळी कांचन) यांनी उरुळी कांचन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी शिवाजी जाधव व फिर्यादी अजय जाधव हे सख्खे भाऊ आहेत. तर चैत्राली जाधव भाऊजय आहे. चैत्राली तिची लहान बहिण आहे. शिवाजी जाधव व चैत्राली मागील एका वर्षापासून अजय याला लहान बहिणीसोबत लग्न कर, असे सांगत आहेत. मात्र अजय हा लग्न करण्यास टाळाटाळ करीत होता. मंगळवारी (दि. २८) रात्री दहा वाजण्याच्या सुमारास भावजय चैत्राली हिने चिडून जाऊन तिचा भाऊ प्रकाश पवार, बहिण अंजली पवार यांना हडपसर येथून बोलावून लग्न न केलेच्या कारणावरून भाऊ शिवाजी, भावजय चैत्राली, प्रकाश पवार, अंजली पवार यांनी अजयला लाथा बुक्याने मारहाण करण्यास सुरुवात केली. यावेळी प्रकाश पवार हा रिक्षातून तलवार घेवुन आला.

यावेळी वडिलांनी सर्वांना घराबाहेर काढून अजय याला घरात थांबवुन ठेवले. प्रकाश पवार याने घराबाहेर तलवार हवेत फिरवीत दहशत माजवत आज अजयला जिवेच मारतो, अशी धमकी दिली.

दरम्यान, भांडणे सोडवण्यास गेलेले शेजारी सहदेव जाधव व बापु जाधव यांच्या हातास तलवार लागली. पुजा जाधव हिला भावजय चैत्राली हीने मारहाण केली.

### साहित्य, पत्रकार आणि कलाकार यांचा समावेश

# अत्रे प्रतिष्ठानचे राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क


केदार शिंदे


डॉ. संगीता बर्वे


जयंत माईणकर

**सासवड :** आचार्य अत्रे विकास प्रतिष्ठान दरवर्षी आचार्य प्र. के. अत्रे यांच्या १३ जून या स्मृतिदिनी "आचार्य अत्रे पुरस्कार" सोहळा कार्यक्रम घेत असते. आचार्य अत्रे विकास प्रतिष्ठान, पुरंदर व महाराष्ट्र साहित्य परिषद, सासवड शाखा यांच्या संयुक्त सहकार्याने ५५ वा अत्रेंचा स्मृतिदिन साजरा करीत आहे.

या दिवशी आचार्य प्र. के. अत्रे यांच्या स्मृति रसिकांसमोर सतत राहाव्यात या उद्देशाने आचार्य अत्रे 'साहित्य', आचार्य अत्रे 'पत्रकारिता' व आचार्य अत्रे 'कलाकार' पुरस्कार दिले जातात. या पुरस्काराचे हे ३४ वे वर्ष आहे. आचार्य अत्रे पुरस्काराची घोषणा करण्यात आली असून, यावर्षीचा आचार्य अत्रे "साहित्य पुरस्कार" मराठी साहित्यातील ज्येष्ठ लेखिका डॉ. संगीता बर्वे यांना जाहीर झाला आहे. आचार्य अत्रे "पत्रकारिता पुरस्कार" ज्येष्ठ पत्रकार जयंत माईणकर यांना, तर आचार्य अत्रे "कलाकार पुरस्कार" ज्येष्ठ दिग्दर्शक केदार शिंदे यांना जाहीर करण्यात आला आहे.

पुरस्कार वितरण कार्यक्रम आचार्य अत्रे स्मृती प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष ॲड. बाबुराव कानडे यांच्या शुभहस्ते १३ जून २०२४ रोजी "डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन" सासवड येथे दुपारी ४ वाजता संपन्न होणार असून, कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून भारती सहकारी बँकेचे चेअरमन सी. ए. भाऊसाहेब कड उपस्थित राहणार आहेत. अशी माहिती प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजय कोलते यांनी दिली.

पुरस्कार वितरण सोहळ्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन म. सा.प. सासवड शाखेचे अध्यक्ष आण्णासाहेब खाडे यांनी केले आहे. यात्रसंगी प्रतिष्ठानचे सचिव शांताराम पोमण, बंडूकाका जगताप, ॲड. दिलीप निरगुडे, वसंतराव ताकवले, डॉ. राजेश दळवी, कुंडलिक मेमाणे, शिवाजी घोगरे व पदाधिकारी उपस्थित होते.

## » Selected



## लालपरी @ ७६; सासवड आगारात वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा

**सासवड :** राज्यातील नागरिकांना सुरक्षित व किफायतशीर प्रवासी सेवा देणाऱ्या महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ अर्थात एसटीचा १ जून रोजी ७६ वा वर्धापन दिन सासवड आगारात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी सासवड आगारातील सर्व बसेसची आकर्षक सजावट करून पूजन करण्यात आले. यावेळी उपस्थित प्रवाशांना व कर्मचाऱ्यांना साखर व पेढे वाटण्यात आले. मुंबई मध्यवर्ती कार्यालयातील वरिष्ठ सांख्यिकी अधिकारी सुरेश लोणकर आगार प्रमुख सागर गाडे, स्थानक प्रमुख राजाराम गायकवाड वाहतूक नियंत्रक, वाहक ,चालक, कार्यशाळा कर्मचारी व प्रवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते. याच कार्यक्रमाचे औचित्य साधत सासवड येथील ब्रँडेड कलेक्शन या दुकानाचे मालक अतुल कुंभारकर यांनी सामाजिक भावनेतून सासवड आगाराला २५० मार्गफलक मोफत दिले. यावेळी रमाकांत खेडेकर, सागर गाडे, राजाराम गायकवाड यांसह कर्मचारी वर्ग उपस्थित होते.




## दौंड नगरपालिकेकडून शहरात प्लास्टिकमुक्त अभियान

**दौंड :** नगरपालिका हद्दीत स्वच्छ सर्वेक्षण २०२४ आणि माझी वसुंधरा अभियान ४.० अंतर्गत प्लास्टिक बंदी मोहीम राबवण्यात आली. सदर मोहीम दौंड नगरपालिकेच्या मुख्याधिकारी विद्या पोळ यांच्या मार्गदर्शनाखाली पार पाडण्यात आली. प्लास्टिक बंदी मोहीम राबवत असताना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून फिल्ड ऑफिसर संदीप पाटील, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी विशाल भंडारे , दौंड नगरपरिषद आरोग्य विभाग प्रमुख शाहूमहाराज पाटील, आरोग्य विभागाचे कर्मचारी सागर सोनवणे, रोहन साळवे, महादेव माने, सचिन दळवी, निरंजन वाघमारे, विनोद चितारे, शहर समन्वयक शुभम चौकटे इत्यादींनी दौंड शहरातील कपड्याची दुकाने, हॉटेल, भाजी मार्केट, फळ मार्केट इत्यादींची पाहणी करून पाच हजार रुपये दंड वसूल केला. तसेच भेट दिलेल्या सर्व दुकान मालकांना कापडी पिशव्या वापराव्यात, याबद्दल सूचना देण्यात आल्या. दौंड शहरातील नागरिकांनी खरेदी करण्यासाठी जाताना कापडी पिशवीचा वापर करावा, असे आवाहनही दौंड नगरपरिषदेने केले.

## पाबळमधून कत्तलीसाठी नेणाऱ्या जनावरांना तरुणांमुळे जीवदान

**शिक्रापूर :** पाबळ येथील केंदूर रस्त्याने कत्तलीसाठी जाणाऱ्या सात जनावरांना जीवदान देत जनावरांची वाहतूक करणाऱ्या दोघांना बजरंग दलाच्या सतर्कतेणे अटक करण्यात आली असून, प्रकाश धोंडीबा गावडे व इनामअली हसनअली इनामदार असे पोलिसांनी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. पाबळ येथील केंदूर रस्त्याने एका पिकअप वाहनातून काही जनावरे कत्तलीसाठी जाणार असल्याची माहिती बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांना मिळाली. त्यांनतर बजरंगदलाचे ऋषिकेश नऱ्हे, कुणाल थिटे, दिनेश झोडगे, पियुष चौधरी, जितेंद्र जाधव हे पाबळ गावात थांबलेले असताना त्यांना पिकअप गाडी आलेली दिल्याने युवकांनी पिकअपची पाहणी केली. त्यावेळी त्यामध्ये सात जनावरे दाटीवाटीने बांधून कत्तलीसाठी घेऊन चालल्याचे दिसून आले. दरम्यान, त्यांनी पिकअपसह चालकाला पोलिसांच्या ताब्यात दिले. याबाबत ऋषिकेश शामराव नऱ्हे (वय २३) वर्षे रा. नऱ्हे बेंद पाबळ यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी प्रकाश धोंडीबा गावडे (वय ३३) रा. ढूगाव ता. आंबेगाव जि. पुणे व इनामअली हसनअली इनामदार (वय ५४) रा. मंचर या दोघांवर गुन्हा दाखल करत अटक केली.

### तरूणांना भुरळ : कॅफेत आलिशान सोय; प्रशासन पालकांचे दुर्लक्ष

# शहरात पब, तर ग्रामीण भागात कॅफे धोकादायक!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**शिक्रापूर :** काही दिवसांपूर्वी पुण्यात पोर्शे कारमुळे झालेल्या अपघातात दोन जणांना आपला जीव गमवावा लागला. या प्रकरणानंतर पुणे शहरातील पबसंसस्कृती पुन्हा एकदा चर्चेचा विषय बनली. पबमुळे युवा पिढी व्यसनाधीन झाली आहे. पबमुळे त्यांच्या व्यसनाला आसरा मिळत असल्याचे दिसून येत आहेत. शहरी भागातील पबप्रमाणे ग्रामीण भागातील ठराविक कॅफे युवक व युवतींना वाईट मार्गाला घेऊन जात असल्याचे दिसून येत असल्याची माहिती आहे.

पुण्यातील कथित पबमधून निघालेल्या युवकाकडून घडलेला भयानक अपघात देशभरात चर्चेचा विषय बनला आहे. या अपघाताने वेगेळे वळण घेतल्याने काही पोलीस अधिकारी तसेच डॉक्टरांवर कारवाई होऊन निलंबन झाले आहे. मात्र, शहरी भागामध्ये जसे पब धोकादायक आहेत, त्याच पद्धतीने ग्रामीण भागांमध्ये अनेक ठिकाणी शाळा व महाविद्यालयांच्या शेजारी असलेले कॅफे हे युवक व युवतींना वेगळ्या वळणावर घेऊन जात आहेत.

अनेक कॅफे चालकांनी कॅफे व हॉटेलमध्ये बेकायदेशीर पार्टीशन टाकून युवकांना अश्लील चाळे करण्यासाठी एक आसरा दिल्याचे उघड झाले असून, यापूर्वी शिरुर तालुक्यात काही ठिकाणी पोलिसांनी कारवाया केल्या आहेत. मात्र, अद्यापही परिस्थिती 'जैसे थे' आहे.

कॅफे चालकांनी युवक व युवतींना बसण्यासाठी अलिशान पद्धतीने सोय केली असून, सवलत देऊन त्यांच्याकडून ठराविक रक्कम घेतली जात आहे. यामुळे कित्येक ठिकाणी युवतींचे विनयभंग झाल्याच्या घटना घडल्या आहेत. कॅफेमध्ये येणारे युवक युवती अल्पवयीन असून काही युवक अलिशान दुचाक्या घेऊन भरधाव वेगाने चालवत असल्याने अपघात घडत आहेत. याकडे प्रशासन पालक जाणीपूर्वक दुर्लक्ष करत असल्याने शहरी भागातील पबप्रमाणे ग्रामीण भागामध्ये कॅफे धोकादायक असल्याचे दिसत आहेत.

**स्वतंत्र बैठक व्यवस्था बंद झाली पाहिजे**

● ग्रामीण भागामध्ये असेलली कॅफे पद्धत चांगली आहे, मात्र त्यामध्ये युवक व युवतींसाठी करण्यात येणारी स्वतंत्र व्यवस्था ही बंद झाली पाहिजे. संबंधित जागा मालक अथवा गाळा मालकांनी याकडे लक्ष देणे गरजेचे आहे, तसेच पोलीस प्रशासनानेदेखील यावर अंकुश ठेवणे गरजेचे असल्याचे सीमाई महिला आधार फाउंडेशनच्या अध्यक्षा सिमा पवार यांनी सांगितले.

#रा

## इमारतींवर अनाधिकृत होर्डिंग उभारल्यास गुन्हे दाखल होणार

# सहकारी गृहनिर्माण सोसायट्यांचे धाबे दणालले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पिंपरी :** घाटकोपर येथील होर्डिंग दुर्घटनेनंतर राज्यातील अनाधिकृत होर्डिंगचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. प्रशासनाने प्रत्येक शहरातील अनाधिकृत होर्डिंग हटवण्याचा सपाटा लावला आहे. तसेच बेकायदेशीरपणे होर्डिंगची उभारणी करणाऱ्यांवर कारवाईचा बडगाही उगारला आहे. पिंपरी चिंचवड शहरातील काही गृहनिर्माण सोसायट्यांनी इमारतींवर होर्डिंग्ज (जाहिरात फलक) उभारले आहेत. या होर्डिंगधारकांविरोधात महापालिकेकडून कारवाई करण्यात येत आहे. विनापरवाना होर्डिंग उभारणाऱ्या सहकारी गृहनिर्माण सोसायट्यांवर गुन्हे दाखल केले जाणार आहेत, असा इशारा महापालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांनी दिला.

मुंबईतील घाटकोपर पाठोपाठ पिंपरी-चिंचवडमधील मोशी येथे पंधरा दिवसांपूर्वी होर्डिंग कोसळले होते. त्यानंतर, महापालिकेने शहरातील होर्डिंगचे सर्वेक्षण केले. त्यात २४ होर्डिंग अनधिकृत आढळून आले होते. त्याप्रकरणी होर्डिंगधारक, होर्डिंगवरील जाहिरातदार व जागामालक अशा ७२ जणांविरुद्ध गुन्हे दाखल केले आहेत. परवानगीपेक्षा मोठ्या आकाराच्या ३४१ होर्डिंगधारकांना नोटिसा बजावल्या होत्या. आठ दिवसांत वाढीव होर्डिंगचा आकार कमी करण्यास सुचविले होते. त्यानुसार, कार्यवाही करण्यात आली आहे. शहरातील अनाधिकृत होर्डिंगबाबत बोलताना सिंह म्हणाले, "महापालिका अधिनियम आणि जाहिरात व फलक नियंत्रण नियमानुसार, खासगी जागेत होर्डिंग उभारण्यासाठी महापालिकेची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे. मात्र, शहराच्या सौंदर्य टिकविण्यासाठी सर्व अनधिकृत होर्डिंग काढले आहेत. परंतु, काही सहकारी गृहरचना संस्था आणि सोसायट्यांनी त्यांचा नियमित खर्च भागविण्यासाठी त्यांच्या मालकीच्या जागेत अथवा इमारतींच्या गच्चीवर होर्डिंग्ज उभारल्याचे आढळले आहेत. ज्या गृहनिर्माण संस्था परस्पर होर्डिंग्ज उभ्या करतील, त्यांच्यावर भारतीय दंड संहिता, महाराष्ट्र मालमत्ता विरुपनास प्रतिबंध अधिनियम, महापालिका अधिनियम आणि मुंबई प्रांतिक महापालिका नियमानुसार कारवाई करण्यात येईल. त्यासाठी महापालिकेस येणारा खर्च गृहनिर्माण संस्थांकडून वसूल केला जाईल. तसेच त्यांच्याविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात येणार आहेत.

### या इमारतींना परवानगी नाही...

- होर्डिंग अधिसूचना मे २०२२ नुसार, ज्या इमारतींना स्थैर्य प्रमाणपत्र अर्थात स्ट्रक्चर स्टॅबिलिटी सर्टिफिकेट नाही.
- ज्या इमारतींबाबत अधिनियम १९६६ अन्वये महापालिका स्तरावर अथवा न्यायालयात कारवाई प्रलंबित असेल.
- ज्या इमारतीच्या मालकाला कायदेशीररीत्या काम थांबविण्याची नोटीस बजावण्यात आली आहे तसेच संपूर्ण इमारत अनधिकृत असेल.
- जी इमारत अंशतः किंवा पूर्णतः धोकादायक म्हणून घोषित करण्यात आली अथवा कायद्यान्वये तिला धोकादायक म्हणून नोटीस बजावली आहे.

### या इमारतींना मिळणार परवानगी

- स्ट्रक्चरल ऑडिट झालेल्या, सरकार किंवा महापालिका संरचना अभियंत्याकडून स्ट्रक्चरल प्रमाणपत्र मिळालेल्या इमारती.
- परवानगी अर्जासोबत सहकारी गृहरचना संस्थेच्या सर्वसाधारण सभेने होर्डिंगसाठी परवानगी दिल्याचे ना हरकत प्रमाणपत्र.
- अथवा गृहरचना संस्थेच्या सभासदांपैकी दोन तृतीयांश सभासदांच्या सहमतीने दिलेले ना हरकत प्रमाणपत्र असणाऱ्या सोसायटी.
- गृहरचना संस्थेच्या ना हरकत प्रमाणपत्रास संस्थेच्या सर्वसाधारण सभेने रितसर मंजुरी दिलेल्या ठरावाची प्रमाणित प्रत असलेल्या सोसायटी.

Selected



## शाळा प्रवेशाबाबत पालकांचे प्रबोधन

**पिंपरी :** नवीन शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी आवश्यक दाखले मिळविण्यासाठी सांगवी विकास मंचाच्यावतीने पालकांचे मार्गदर्शन व प्रबोधन करण्यात येत आहे. अनेकदा कागदपत्रांच्या त्रुटी, वेळेत आवश्यक कागदपत्रांची पूर्तता न केल्यामुळे विद्यार्थी आणि पालकांचा वेळ वाया जातो. त्यामुळे, आवश्यक दाखले वेळेत मिळावे यासाठी सांगवी विकास मंचाच्यावतीने विद्यार्थी, पालकांना कागदपत्रांबद्दल माहिती व प्रबोधन करण्यात येत आहे. अधिवास, नॉनक्रिमिलेअर, उत्पन्नाचा दाखला, ईडब्ल्यूएस आदींबाबत हे मार्गदर्शन केले जात आहे. सांगवी विकास मंचाचे कार्याध्यक्ष ओंकार भागवत म्हणाले,"अनेक वेळा पालकांना आवश्यक दाखले मिळविण्यासाठी लागणाऱ्या कागदपत्रांची माहिती नसते. त्यामुळे वेळ वाया जातो. बहुतांश दाखले ऑनलाइन मिळतात. परंतु, त्यासाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करावी लागते. विद्यार्थी व पालकांचा वेळ वाचावा यासाठी सांगवी विकास मंचाच्यावतीने माहिती देण्यात येत आहे."

## अहिल्यादेवी होळकर यांना अभिवादन

**पिंपरी :** अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशदाब्दी जयंती निमीत्ताने भारतीय मजदूर संघ पुणे जिल्हाच्यावतीने सारसबाग समोरील पुतळ्याला पुष्प हार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी भारतीय मजदूर संघ पुणे जिल्हा अध्यक्ष अर्जुन चव्हाण ,महाराष्ट्र विज कंत्राटी कामगार संघाचे सरचिटणीस सचिन मेंगाळे,महिला विभाग पदाधिकारी अॅड संध्या खरे, सुजाता वाळुंज, सुनंदा मानकर, शारदा थोरात, सुनिता साठ्ये, अभय वर्तक, ऊमेश विस्वाद, गणेश टिंगरे, विवेक ठकार, संतोष कुंभार, उल्हास देवपुरकर आदी पदाधिकारी व विविध ऊद्योगातील पदाधिकारी उपस्थित होते. या त्रिशदाब्दीच्या निमित्ताने भारतीय मजदुर संघ राष्ट्रीय स्तरावर व पुणे जिल्हामध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. संघटीत असंघीटत क्षेत्रातील महिला कामगारांना एकत्रित करून कल्याणकारी योजना, महिला कामगारांसाठी धोरण, तसेच विविध विषयांवर चर्चा सत्रांचे आयोजन व महिला संमेलन आयोजित करणार आहे. या मध्ये महिला कामगारांनी मोठ्या प्रमाणात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

## गोरेगाव वांगी येथे पेरे-पाटील यांचे व्याख्यान

**पिंपरी :** गोरेगाव (वांगी, ता. खटाव) येथे माऊली सोशल फाऊंडेशनच्यावतीने आज रविवार ( दि. २ जून) रोजी सायंकाळी



६.३० वाजता पाटोदा (जि.बीड) चे आदर्श सरपंच भास्करराव पेरे-पाटील यांचे व्याख्यान व पुरस्कार वितरण सोहळा होणार असल्याची माहिती अध्यक्ष सुनिल सावंत, सचिव शिवाजी खाडे यांनी दिली. या कार्यक्रमाचे यंदा तिसरे वर्ष आहे. यावेळी श्री. पेरे-पाटील यांच्या व्याख्यानाबरोबरच समाजातील विविध क्षेत्रांत काम करणाऱ्या मान्यवरांचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात येणार आहे. तसेच यावेळी आर्थिक दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात येणार आहे. येथील जिल्हा परिषद शाळेच्या मैदानात हा कार्यक्रम होणार असून नागरिकांनी बहुसंख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन संयोजकांनी केले आहे.

## आरटीईच्या ऑनलाइन अर्जासाठी पालकांची धावाधाव

**पिंपरी :** न्यायालयाच्या आदेशानुसार आरटीई प्रवेश प्रक्रियेत आता खासगी विनाअनुदानित इंग्रजी माध्यमाच्या शाळा समाविष्ट आल्या आहेत. त्यामुळे, पूर्वी ऑनलाइन अर्ज सादर केलेल्या पालकांनीही आता आपल्या पाल्यासाठी नव्याने अर्ज भरला असून प्रवेश प्रक्रियेला त्यांचा चांगला प्रतिसाद मिळाला आहे. शेवटच्या दिवशी शहरातील सुमारे १० हजार पालकांनी अर्ज भरले. मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार कायद्यानुसार मोठ्या खासगी इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये गरीब विद्यार्थ्यांना मोफत प्रवेश दिला जातो. त्यासाठी २५ टक्के जागा राखीव ठेवण्यात आली आहे.

राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स रा

## मावळ खरेदी विक्री संघाचा बारामती अभ्यास दौरा

मावळ तालुका सहकारी खरेदी विक्री संघाच्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनी नुकताच बारामती तालुका सहकारी खरेदी विक्री संघाच्या विविध प्रकल्पांचा पाहणी दौरा केला. बारामती संघाप्रमाणे मावळ तालुक्यातील संघालाही आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविणारे प्रकल्प राबविण्याचा संकल्प पदाधिकाऱ्यांनी दौऱ्यानंतर व्यक्त केला.
दोन महिन्यांपूर्वी मावळ संघाची निवडणूक झाल्यानंतर दुसऱ्याच मासिक सभेत नूतन संचालक मंडळाने बारामती संघाला भेट देऊन तेथील प्रकल्प व कामकाज याची माहिती घेण्याचा निर्णय केला होता. त्यानुसार, या दौऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. त्यात प्रामुख्याने बारामती संघाच्यावतीने, चालविण्यात येणारे पेट्रोल पंप, सीएनजी पंप, औषधे विक्री व्यवसाय, खते, औषधे, बी- बियाणे, धान्य आदींची विक्री व गोदामे, व्यापारी संकुल, प्रस्तावित मंगल कार्यालय व वेअर हाऊस आदी प्रकल्पांचा समावेश होता. बारामती संघाचे अध्यक्ष विक्रम भोसले, संचालक शिवाजीराव टेंगळे, रवींद्र माने, उदयसिंग धुमाळ, व्यवस्थापक लोणकर यांनी सर्व प्रकल्पांबाबत सविस्तर माहिती दिली. तालुक्यातील महायुतीच्या नेत्यांनी आमच्यावर विश्वास ठेऊन आम्हाला खरेदी विक्री संघाचे प्रतिनिधीत्व करण्याची संधी दिली आहे. हा विश्वास सार्थ ठरविण्याच्या दृष्टीने अभ्यास दौऱ्यापासून आम्ही सुरवात केली असून आगामी काळात संघाचे आर्थिक उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने नवनवीन प्रकल्प राबविण्याचा आम्ही प्रयत्न करणार आहोत. लवकरच याबाबत विशेष सभा घेऊन निर्णय घेण्यात येणार आहे



## परीक्षा नकोच...!

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**पिंपरी :** लोकसभा निवडणुकीच्या मतमोजणीच्या दिवशी घेण्यात येणाऱ्या परीक्षा रद्द अशी मागणी पिंपरी - चिंचवड अॅडव्होकेट्स बार असोसिएशन व एन.एस.यु.आय कडून करण्यात आली.

# मतमोजणीच्या दिवशी असणाऱ्या परीक्षा रद्द करा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठांतर्गत येणाऱ्या एलएलबी या अभ्यासक्रमाच्या शेवटच्या वर्षाच्या शेवट सत्राच्या परीक्षेचा पहिला पेपर दि.०४ जून २०२४ रोजी होत आहे. परंतु सदर दिवशी देशातील अठरावी लोकसभा निवडणूक २०२४ची मतमोजणी असल्याने या कामकाजासाठी अनेक शासकीय अधिकारी आणि कर्मचारी, पदाधिकारी यांची नेमणूक असणार आहे. असे अनेक शासकीय अधिकारी व कर्मचारी जे एलएलबी सोबतच इतर अभ्यासक्रमाचा अभ्यास करीत आहे अशा बहुतांशी अधिकारी व कर्मचारी यांची दि. ०४ जून २०२४ रोजी मतमोजणी कामकाजासाठी नेमणूक असण्याची शक्यता आहे.

तसेच यंदाची ही निवडणूक देशातील तरुणांनी हाती घेतलेली असल्याने तरुणांसोबतच सामाजिक व राजकीय पदाधिकारी कार्यकर्ते, पत्रकार बांधव हेदेखील मतमोजणीच्या दिवशी व्यस्त असण्याची शक्यता आहे. म्हणून विधी आणि इतर ज्या कोणत्या अभ्यासक्रमाच्या परीक्षा दि. ०४/०६/२०२४ रोजी असणारा पेपर पुढे ढकलण्यात याव्यात अथवा अशा निवडणूक कर्तव्यार्थ ज्या कर्मचा-यांच्या नेमणुका आहेत आणि जे शासकीय अधिकारी व कर्मचारी यांची सदर दिवशी परीक्षा आहे यांच्यासाठी अन्य दिवशी पर्यायी व्यवस्था करण्यात यावी अशी संयुक्तिक मागणी पिंपरी - चिंचवड अॅडव्होकेट्स बार असोसिएशन आणि महाराष्ट्र प्रदेश विद्यार्थी कॉंग्रेस (एन.एस.यु.आय.) वतीने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरू पराग काळकर यांच्याकडे निवेदन देऊन करण्यात आली.

# मतमोजणी दरम्यान बालेवाडी परिसरात वाहतूक बदल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मावळ :** लोकसभेच्या मवाळ मतदारसंघाची मतमोजणी येत्या मंगळवारी (दि.४) होणार आहे. ही मतमोजणी बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल येथे होणार आहे. या कालावधीत सुरक्षितता व वाहतूक कोंडी टाळण्यासाठी बालेवाडी परिसरातील वाहतूक मार्गात बदल केला आहे, अशी माहिती पिंपरी-चिंचवड वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त विशाल गायकवाड यांनी दिली आहे. हा बदल मंगळवारी (दि. ४) पहाटे ५ पासून रात्री साडे अकरा पर्यंत आवश्यकतेनुसार गर्दी संपेपर्यंत अथवा वाहतूक सुरळीत होईपर्यंत राहणार आहे.

- वाहतूक कोंडी टाळण्यासाठी वाहन चालकांनी पुढील पर्यायी मार्गांचा वापर करावा.
- बालेवाडी स्टेडीयम मुख्य प्रवेशव्दारा समोरील रस्ता उत्तम स्विट (पुणेरी स्विट) चौक ते म्हाळुंगे पोलिस चौकीपर्यंत सर्व प्रकारच्या वाहनांकरीता बंद राहील.
- पर्यायी मार्ग : चांदे- नांदे व म्हाळुंगे गावातून येणारी वाहने ही उत्तम स्विट (पुणेरी स्विट) चौक येथून उजवीकडे वळून म्हाळुंगे पोलिस चौकी येथून पुढे राधा चौकाकडे व इच्छितस्थळी जातील.
- राधा चौकातून येणारी वाहने ही म्हाळुंगे पोलीस चौकी येथे डावीकडे वळून पुढे म्हाळुंगे गाव, चांदे- नांदे व पुढे इच्छित स्थळी जातील.
- मंगळवारी पहाटे ५ ते रात्री साडे अकरा या वेळेत जड व अवजड वाहनांना म्हाळुंगे गाव ते राधा चौक आणि राधा चोक ते म्हाळुंगे गाव या मार्गावर प्रवेश बंद राहील.
- पर्यायी मार्ग : चांदे नांदे येथून येणारी जड अवजड वाहने ही गोदरेज सर्कल येथून डावीकडे वळून माण मार्गे हिंजवडी येथे येऊन इच्छित स्थळी जातील, व बाणेर रस्ता व राष्ट्रीय महामार्गावरून येणारी जड अवजड वाहने ही राधा चौकातून उजवीकडे वळून वाकड नाका मार्गे हिंजवडी व पुढे इच्छित स्थळी जातील.

- म्हाळुंगे पोलीस चौकी ते उत्तम स्विट (पुणेरी स्वीट) चौक या



मधला रस्ता महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांना थांबण्यासाठी राखीव ठेवण्यात आला आहे. या ठिकाणी येणाऱ्या महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांच्या वाहनांसाठी राधा चौकातून पुढे डाव्या बाजुला खंडोबा मंदिराच्या पाठिमागील मोकळ्या जागेमध्ये पार्किंगकरीता व्यवस्था केली आहे.
- ऑर्किड हॉटेल महामार्ग प्रवेशव्दारापासून सुरू होणारा सेवारस्ता हा मुळा नदी ब्रिज पर्यंत रहदारीसाठी बंद ठेवला असून हा रस्ता महायुतीच्या कार्यकर्त्यांना थांबण्यासाठी राखीव ठेवला आहे. महायुतीच्या कार्यकर्त्यांसाठी पार्किंगची व्यवस्था त्या सेवारस्त्यावर केली आहे.
- इतर पक्षाचे उमेदवार व त्यांचे कार्यकर्ते यांच्यासाठी माध्यमिक विद्यालय म्हाळुंगे या शाळेमध्ये पार्किंगची व्यवस्था केली आहे.

# गॅस पाईपलाईनचे खोदकाम बंद करा

■ राष्ट्रसंचार न्यूज नेटवर्क

**तळेगाव दाभाडे :** पावसाळ्यात नगरपरिषदेला रस्त्यांचे डांबरीकरण करणे शक्य होणार नाही. या कारणास्तव पुढील आदेश होईपर्यंत गॅस पाईपलाईन टाकण्याचे खोदकाम काम बंद ठेवावे, असा लेखी आदेश तळेगाव दाभाडे नगरपरिषदेचे मुख्याधिकारी एन.के.पाटील यांनी एमएनजीएल कंपनीला दिले.

घरगुती वापराची गॅस पाईपलाईन टाकण्याकरिता एमएनएलजीएल कंपनीने रस्ता खोदण्याची नगरपरिषदेकडे परवानगी मागितलेली होती. त्यावर परिषदेने काही अटी-शर्तीसह कंपनीला मागणी नोटिस पाठविली. त्याला अनुसरून कंपनीने १८ एप्रिल २०२४ ला ७ कोटी १७ लाख ६८ हजार ७०० रुपये इतकी रक्कम नगरपरिषदेच्या कोशागारात भरली. त्यानुसार, कंपनीने रस्ते खोदाईचे काम सुरू केले आहे. परंतु, काही महिन्यांपूर्वीचे सुस्थितीमधील रस्ते पाईपलाईन टाकण्यासाठी खोदले जाणार असल्याने काही नागरिकांनी त्याला विरोध केला आहे.

## पुणे-हिंजवडी प्रवास केवळ ४० मिनिटांत होणार

# ...आता मेट्रोचे काम ६८ टक्के पूर्ण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चिंचवड :** शिवाजीनगर ते हिंजवडी मेट्रोचे काम प्रगतिपथावर आहे. या मेट्रो मार्गाचे काम येत्या दोन वर्षांत म्हणजे २०२६ पर्यंत पूर्ण होणार आहे. सध्या त्याचे ६८ टक्के काम पूर्ण झाले आहे. त्यामुळे, वाकड, हिंजवडी परिसरातील नागरिकांना पुण्यात जाणे-येणे सोयीचे होणार आहे. सर्व कामे जलदगतीने सुरू आहेत. या मेट्रो मार्गामुळे नागरिकांची वाहतूक कोंडीमधून बऱ्याच अंशी सुटका होणार आहे.



शिवाजीनगर ते हिंजवडी-माण या तिसऱ्या मेट्रो मार्गाच्या कामासाठी वाकड आणि हिंजवडी (फेज १) या भागात गर्डर आणि खांबावर पिअर कॅप बसविण्याचे काम वेगाने सुरू आहे. माण-हिंजवडी-शिवाजीनगर हा २३ किलोमीटरचा मेट्रो मार्ग आहे. पुणे महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) यांच्याकडे या प्रकल्पाचे संनियंत्रण आहे.

सार्वजनिक-खासगी भागीदारी (पीपीपी) तत्त्वावर टाटा समूहाने हे काम हाती घेतले आहे. या प्रकल्पासाठी ८ हजार ३१३ कोटी रुपयांचा खर्च होणार आहे. सध्या हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो मार्गाचे खांब बसविण्याचे काम पूर्ण झाले आहे. स्थानक उभारणी सुरू आहे. रूळ बसविण्याचेही काम सुरू झाले आहे. त्याचे आतापर्यंत २५ टक्के काम पूर्ण झाले आहे.

### या स्थानकांचा समावेश

- मेगापोलिस सर्कल, एम्बेसी क्वाड्रॉन बिझनेस पार्क, डोहलर, इन्फोसिस फेज २, विप्रो फेज २, पाल इंडिया, शिवाजी चौक, हिंजवडी, वाकड चौक, बालेवाडी स्टेडियम, एनआयसीएमएआर, रामनगर, लक्ष्मीनगर, बालेवाडी फाटा, बाणेर गाव, बाणेर, कृषी अनुसंधान, सकाळनगर, विद्यापीठ, आरबीआय, कृषी महाविद्यालय, शिवाजीनगर आणि दिवाणी न्यायालय आदी.

### पुणे-हिंजवडीत ४० मिनिटांत

- शिवाजीनगर ते हिंजवडी मेट्रोचा हा मार्ग पूर्ण झाल्यास पुणे आणि परिसरातून हिंजवडी आयटी पार्कमध्ये येणाऱ्या प्रवाशांच्या वेळेची बचत होणार आहे. अवघ्या ३५ ते ४० मिनिटांत या मार्गावर प्रवास करता येणार आहे.

#रा



“कोणाच्याही जीवनात प्रशिक्षकाला खूप महत्त्व असतं. प्रशिक्षकाचे मार्गदर्शन आणि निरंतर प्रशिक्षण हे कुणाच्याही जीवनाला आकार देणारं असतं. मग ते मैदानावर असो किंवा मैदानाबाहेर. त्यामुळे प्रशिक्षकाची निवड समजूतदारपणे केली पाहिजे,” — सौरव गांगुली

हार्दिकची आंतरराष्ट्रीय कामगिरी पाहता, मी शिवम दुबेऐवजी पंड्याला प्राधान्य देईल. २०१६ मध्ये भारतीय संघात सामील झाल्यापासून पंड्याने सर्व फॉरमॅटमध्ये अष्टपैलू कामगिरी केली आहे. तथापि, २०१८ आशिया चषक स्पर्धेत पाठीच्या दुखापतीमुळे आणि २०१९ विश्वचषकातील शस्त्रक्रियेमुळे, तो त्याच्या सर्वोत्तम कामगिरीकडे परत येऊ शकला नाही. — संजय मांजरेकर



### एचरइ पॉवर सिस्टीम महाराष्ट्र राज्य महिला निवड फिडे रेटेड बुद्धीबळ स्पर्धेत

# जळगावच्या भाग्यश्री पाटील हिला विजेतपद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** बुद्धिबळ क्रीडा ट्रस्ट यांच्या वतीने आयोजित व पुणे जिल्हा बुद्धीबळ सर्कल (पीडीसीसी), एआयसीएफ, एमसीए यांच्या मान्यतेखाली होत असलेल्या एचरइ पॉवर सिस्टीम महाराष्ट्र राज्य महिला निवड फिडे रेटेड बुद्धीबळ स्पर्धेत जळगावच्या भाग्यश्री पाटील हिने ७.५ गुणांसह अव्वल क्रमांक पटकावत विजेतपद संपादन केले.

कर्वे रोड येथील अश्वमेध हॉल या ठिकाणी पार पडलेल्या या स्पर्धेत आठव्या फेरीत जळगावच्या भाग्यश्री पाटीलने कोल्हापूरच्या दिव्या पाटीलचा पराभव करून ७.५ गुणांसह प्रथम क्रमांक पटकावला. १९ वर्षीय इंडियन ऑइल यांची शिष्यवृत्ती लाभलेल्या भाग्यश्री हीने आपल्या डावास सेमिस्लाव्ह पद्धतीने खेळास सुरुवात करत १९ चालींमध्ये दिव्या पाटीलला बरोबरीत रोखले. भाग्यश्री ही संत ज्ञानेश्वर महाविद्यालयात




बीएच्या दुसऱ्या वर्षाला शिकत आहे. कोल्हापूरच्या दिव्या पाटीलने ६.५ गुणांसह दुसरा क्रमांक पटकावला. तर, पुण्याच्या अनुष्का कुतवळने संभाजीनगरच्या सानी देशपांडेला बरोबरीत रोखले व तिसरा क्रमांक पटकावला. स्पर्धेतील विजेत्या भाग्यश्री पाटील हिला करंडक व १५००० रुपये, उपविजेत्या दिव्या पाटीलला करंडक व १३००० रुपये अशी पारितोषिके देण्यात आली. स्पर्धेतील जळगावच्या भाग्यश्री पाटील, कोल्हापूरच्या दिव्या पाटील, पुण्याच्या अनुष्का कुतवळ, संभाजीनगरच्या सानी देशपांडे या अव्वल चार महिला खेळाडूंची निवड आगामी तामिळनाडू येथे ३० जुन ते १० जुलै २०२४ रोजी होणाऱ्या राष्ट्रीय महिला बुद्धिबळ स्पर्धेत होणार असून हे खेळाडू महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व करणार आहेत. स्पर्धेचे पारितोषीक वितरण गरवारे कॉलेजचे प्रोफेसर सुधीर गाडे, कुंटे चेस अकादमीच्या संचालिका मृणालिनी कुंटे - औरंगाबादकर, पीडीसीसीचे उपाध्यक्ष प्रकाश कुंटे आणि आयए राजेंद्र शिदोरे हस्ते करण्यात आले. यावेळी चीफ आरबीटर आयए दिप्ती शिदोरे, एफए श्रद्धा विंचवेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

**निकाल: आठवी फेरी: व्हाईट व ब्लॅक यानुसार:**

- भाग्यश्री पाटील (७.५गुण, जळगाव) बरोबरी वि.दिव्या पाटील (६.५गुण, कोल्हापूर);/ सानी देशपांडे (६.५ गुण,संभाजीनगर)बरोबरी वि.अनुष्का कुतवळ(६.५ गुण, पुणे);
- दिशा पाटील(६ गुण, कोल्हापूर) वि.वि.शर्वरी कबनुरकर (५.५गुण, कोल्हापूर);/ सई पाटील(५.५गुण, पुणे) बरोबरी वि. अदिती कयाळ(५.५गुण, पुणे);/ ईश्वरी जगदाळे(६ गुण, सांगली) वि.वि.प्रतिती खंडेलवाल (५ गुण, पुणे);
- प्रिशा मर्गज(५ गुण, मुंबई उपनगर) पराभुत वि. राजराजेश्वरी देशमुख (६ गुण, पुणे);/ भूमिका वाघळे(५.५ गुण,संभाजीनगर) बरोबरी वि.श्रावणी उंडाळे (५.५ गुण, पुणे);/ ईशा कोळी (५.५ गुण, सातारा)वि.वि. तनिष्का राठी (४.५ गुण, नाशिक);
- अनुष्का गांधी (४.५ गुण, पुणे)पराभुत वि.मृण्मयी बागवे (५.५ गुण, पुणे);
- राधिका तिवारी(४ गुण, संभाजीनगर) पराभुत वि.निहिरा कौल(५ गुण, पुणे);
- सारा हरोळे(४.५ गुण, सांगली)बरोबरी वि.श्रावी बाकलीवाल(४.५ गुण,पुणे);
- साजिरी देशमुख(४.५ गुण,सातारा) बरोबरी वि.पल्लवी यादव(४.५ गुण, रायगड);/ ईश्वरी गणबोटे(४.५ गुण, सोलापूर)बरोबरी वि.नीती गुप्ता(४.५ गुण, मुंबई उपनगर);/ कशिश सानप(५ गुण, नाशिक)वि.वि.पल्लवी डे(४ गुण,ठाणे);/ मानसी ठाणेकर(5गुण, पुणे) वि.वि.एरिना मोदी(४गुण,कोल्हापूर);
- तन्मयी घाटे(५गुण, सातारा)वि.वि. रिद्धी बारस्कर(४गुण, मुंबई उपनगर);
- देवांशी गावंडे (४.५गुण,अकोला) बरोबरी वि.दुर्वा बोंबळे (४.५ गुण, पुणे).



## अजय चव्हाण क्रिकेट, अगस्त्य क्रिकेट ॲकॅडमी उपांत्य फेरीत!

**पुणे :** महाराष्ट्रीय मंडळाच्या क्रिकेट नेक्स्ट ॲकॅडमी तर्फे आयोजित ‘कै. कॅप्टन शिवरामपंत व्हि. दामले करंडक’ १९ वर्षाखालील आंतरक्लब टी-२० क्रिकेट स्पर्धेत अजय चव्हाण क्रिकेट ॲकॅडमी आणि अगस्त्य क्रिकेट ॲकॅडमी या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून उपांत्य फेरी गाठली. सिंहगड रस्ता येथील कोद्रे फार्म्स मैदानावर झालेल्या सामन्यात ओम पचोरे याने केलेल्या अचूक गोलंदाजीच्या जोरावर अगस्त्य क्रिकेट ॲकॅडमीने टेंभेकर फार्म ॲकॅडमीचा ३ गडी राखून पराभव केला. पहिल्यांदा फलंदाजी करताना टेंभेकर फार्म ॲकॅडमीने २० षटकामध्ये १३४ धावांचे आव्हान उभे केले. आयुष शर्मा याने ४२ धावा आणि साहील दाबके याने २६ धावा करून संघाच्या डावाला आकार दिला. ओम पचोरे याने ९ धावात ५ गडी बाद करताना टेंभेकर संघाच्या धावसंख्येला वेसण घातले. हे लक्ष्य अगस्त्य क्रिकेट ॲकॅडमीने १९.२ षटकात व ७ गडी गमावून पूर्ण केले. अमन सिंग याने ३० चेंडूत ९ चौकार आणि ३ षटकारांच्या मदतीने ६२ धावांची खेळी केली. ओम पचोरे याने २२ धावांचे योगदान देत संघाचा विजय साकार केला. राजवर्धन शितोळे याने टाकलेल्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर अजय चव्हाण क्रिकेट ॲकॅडमीने २२ यार्डस संघाचा १०७ धावांनी सहज पराभव करून उपांत्य फेरी गाठली. पहिल्यांदा फलंदाजी करताना अजय चव्हाण क्रिकेट ॲकॅडमीने २२२ धावांचा डोंगर उभा केला. भार्गव पाठक याने ६२ धावांची खेळी केली. अनिकेत पातारे (४८ धावा), शिव हरपाळे (४७ धावा) आणि विश्वजीत फेडगे (३० धावा) यांनीसुध्दा धावांचे योगदान दिले. राजवर्धन याने १३ धावात ५ गडी बाद करून २२ यार्डस ॲकॅडमीच्या डावाला खिंडार पाडले. त्यांचा डाव ११५ धावांवर मर्यादित राहीला.

## चाहत्यांनी आझम खानला केले ट्रोल

**नवी दिल्ली :** पाकिस्तानचा विकेट किपर बॅट्समनचा एक व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल होत आहे. इंग्लंडविरूद्ध सुरू असलेल्या टी २० मालिकेत चौथ्या सामन्यात पाकिस्तानने पुन्हा एकदा निराशा केली. २५ वर्षाचा आझम खान तर ५ चेंडूंचा सामना करत शुन्यावर बाद झाला. विशेष म्हणजे त्याने फिल्डिंग करताना काही साधे झेल देखील सोडले होते. आझम खान हा गेल्या काही टी २० सामन्यात खराब फॉर्मधून जात आहे. तो पाकिस्तानचा माजी विकेटकिपर मोईन खानचा मुलगा आहे. टी २० वर्ल्डकप संघात त्याची झालेली निवड देखील चर्चेचा विषय ठरली होती. टी २० वर्ल्डकप विजेता संघ इंग्लंडने नाणेफेक जिंकत पाकिस्तानला १५७ धावात रोखलं. लेग स्पिरन आदिल राशिदने २७ धावात २ विकेट्स घेतल्या. तर फलंदाजीत इंग्लंडने दमदार सुरूवात केली. फिल सॉल्टने ४५ तर कर्णधार जॉस बटलरने ३९ धावा करत ७ षटकातच ८२ धावांची सलामी दिली. त्यानंतर हॅरी ब्रुकने हारिस राऊफला षटकार मारत सामना संपवला.

### ध्येय साध्य करण्यासाठी प्रत्येक मॅच अंतिम म्हणूनच खेळा!

# ‘कोल्हापूर टस्कर्स’च्या जर्सीचे पुनीत बालन यांच्या हस्ते अनावरण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे:** ‘महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन’च्या माध्यमातून आयोजित करण्यात येणाऱ्या ‘महाराष्ट्र प्रिमीअर लीग’चा (MPL) २ रा सीझन २ जूनपासून सुरू होत असून ‘एमपीएल’मध्ये सहभागी झालेल्या पुनीत बालन यांच्या ‘कोल्हापूर टस्कर्स’च्या संघाच्या जर्सीचे संघ मालक पुनीत बालन यांच्या हस्ते अनावरण झाले. यावेळी “‘एमपीएल’मध्ये यश प्राप्त करण्यासाठी प्रत्येक मॅच ही अंतिम मॅच असल्याचे समजून खेळा,” अशा शब्दांत त्यांनी खेळाडूंना मार्गदर्शन केले आणि त्यांच्यात जिद्द निर्माण केली.

‘महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन’च्या माध्यमातून गेल्या वर्षीपासून राज्यात भव्य स्वरुपात ‘महाराष्ट्र प्रिमीअर लीग’चे (MPL) आयोजन करण्यात येत




आहे. यामुळे राज्यातील अनेक गुणी आणि होतकरु खेळाडूंना संधी मिळत आहे. यंदा ‘एमपीएल’चा दुसरा हंगाम सुरु होत असून यासाठी युवा उद्योजक पुनीत बालन यांचा ‘कोल्हापूर टस्कर्स’ हा संघही अनुभवी खेळाडू केदार जाधव याच्या नेतृत्त्वाखाली या स्पर्धेत सहभागी झाला आहे. या संघासाठीच्या जर्सीचे आज अनावरण करण्यात आले. यावेळी संघमालक पुनीत बालन यांनी उपकर्णधार म्हणून श्रीकांत मुंडे याच्या नावाची घोषणा केली. खेळाडूंना शुभेच्छा देताना ते म्हणाले, “या सीझनमधील प्रत्येक मॅच खेळताना ती अंतिमच आहे, असे समजून प्रत्येकाने खेळले पाहिजे. त्यासाठी शक्य असेल तितकी जास्त घ्या. मेहनत आणि एकाग्रता या बळावरच तुम्ही तुमचे उद्दीष्ट साध्य साधू शकाल”. ावेळी कर्णधार केदार जाधव म्हणाले, “यंदाच्या मॅचेससाठी आमची खूप चांगली तयारी झाली आहे. त्यासाठी प्रत्येक खेळाडूने चांगले कष्ट घेतले आहे. त्यामुळे यंदा आम्हीच जिंकू, असा आमचा आत्मविश्वास आहे. यासाठी प्रत्येक खेळाडूने कसून सराव केला आहे. त्यामुळे आगामी महाराष्ट्र प्रिमीअर लीगमधील सर्वोत्तम संघ म्हणून आम्हीच असू”.

“कोल्हापूर टस्कर्स’ने गतवर्षीच्या हंगामात चांगली खेळी केली, परंतु अंतिम यश मात्र मिळू शकले नाही. यंदा आमच्या संघामध्ये सर्वच खेळाडू हे प्रतिकूल परिस्थितीतही आपली गुणवत्ता सिद्ध करु शकतील, असे आहेत. त्यामुळे यंदा आमच्यासाठी यश दूर नाही.”

-पुनीत बालन,
(संघ मालक व युवा उद्योजक)





## फ्रेंड्स क्रिकेट अकादमी संघाची विजयाची हॅट्रिक

**पुणे :** बी अ स्पोर्ट क्रिकेट अकादमी यांच्या वतीने आयोजित बी अ स्पोर्ट क्रिकेट अकादमी करंडक १४ वर्षाखालील क्रिकेट स्पर्धेत फ्रेंड्स क्रिकेट अकादमी संघाने आपली विजयी मालिका कायम ठेवत तिसरा विजय मिळवला. चिखली येथील सिल्व्हर स्पोर्टस क्रिकेट मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत पहिल्या सामन्यात समीर मानके (६८ धावा व २-१६) याने केलेल्या अष्टपैलू खेळीच्या जोरावर फ्रेंड्स क्रिकेट अकादमी संघाने बी अ स्पोर्ट क्रिकेट अकादमी क संघाचा ६० धावांनी पराभव केला. दुसऱ्या सामन्यात रुदांश पांढरे (१५ धावा व ४-२६) याने केलेल्या सुरेख कामगिरीच्या जोरावर बी अ स्पोर्ट क्रिकेट अकादमी अ संघाने क्रीकबेसिक्स क्रिकेट अकादमी संघाचा ३९ धावांनी पराभव करत पहिला विजय मिळवला.

## दिनेश कार्तिकने सर्व क्रिकेट फॉरमॅटमधून घेतली निवृत्ती

**नवी दिल्ली :** भारताचा अनुभवी यष्टिरक्षक-फलंदाज दिनेश कार्तिकने आज क्रिकेटच्या सर्व फॉरमॅटमधून निवृत्ती जाहीर केली. तमिळनाडूच्या फलंदाजाने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म इन्स्टाग्रामवर एक भावनिक पोस्ट लिहित निवृत्तीची घोषणा



केली त्याने त्याच्या संपूर्ण कारकिर्दीत त्याला पाठिंबा दिल्याबद्दल त्याचे कुटुंब आणि चाहत्यांचे आभार मानले. दिनेश कार्तिकने आयपीएलमध्ये आपली चांगली छाप सोडली. दिनेश कार्तिकने आयपीएलच्या पहिल्या हंगामापासून खेळतोय. त्याने २५७ सामने खेळले आहेत. तो आयपीएलमध्ये सर्वाधिक सामने खेळणाऱ्यांच्या यादीत रोहित शर्मासोबत संयुक्तरित्या दुसऱ्या स्थानावर आहे. या दोघांच्या वरती फक्त महेंद्रसिंह धोनीचे नाव आहे. त्याने आयपीएलमध्ये २६४ सामने खेळले आहेत. दिनेश कार्तिकने २६ कसोटी सामन्यात १०२५ धावा केल्या आहेत. ९४ सामन्यात १७५२ धावा केल्या आहेत. तर एकूण मिळून ४०१ टी २० क्रिकेटमध्ये दिनेश कार्तिकने ७४०७ धावा केल्या आहेत.

### ‘कै. रवि कुंभार करंडक’ १४ वर्षाखालील एकदिवसीय क्रिकेट स्पर्धा

# क्रिडा क्लचर, साई एमजे स्पोटर्स संघांची विजयी कामगिरी!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** ग्रेसिया क्रिकेट ॲकॅडमी तर्फे आयोजित ‘कै. रवि कुंभार करंडक’ १४ वर्षाखालील आंतरक्लब एकदिवसीय (५०-५० षटकांच्या) क्रिकेट स्पर्धेत क्रिडा क्लचर क्रिकेट ॲकॅडमी आणि साई एमजे स्पोटर्स ॲकॅडमी या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून स्पर्धेत विजयी सलामी दिली.

धायरी येथील डिएसके विश्व स्टार क्रिकेट ॲकॅडमीच्या मैदानावर झालेल्या सामन्यात ऋषभ कुलकर्णी





याने केलेल्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर क्रिडा क्लचर क्रिकेट ॲकॅडमीने साई एमजे स्पोटर्स ॲकॅडमीचा ७ गडी राखून सहज पराभव केला. पहिल्यांदा फलंदाजीस आलेल्या साई एमजे स्पोटर्स ॲकॅडमीचा डाव १९ षटकात ५२ धावांवर गडगडला. मध्यमगती गोलंदाज ऋषभ याने ७ धावांमध्ये ४ गडी बाद करून साई एमजे संघाच्या डावाला खिंडार पाडले. ऋषभ याने ६ षटके गोलंदाजी करताना ३ निर्धाव षटके टाकत ७ धावांत ४ गडी टिपले. क्रिडा क्लचर क्रिकेट ॲकॅडमीने हे लक्ष्य ११.२ षटकात व ३ गडी गमावून पूर्ण केले. अहान जोशी याने नाबाद १६ धावा आणि क्षितीज मोरगांवकर याने १५ धावा करून संघाला सहज विजय मिळवून दिला.

हृषीकेश देशमुख याने केलेल्या ७९ धावांच्या जोरावर साई एमजे स्पोटर्स ॲकॅडमीने पुणे पोलिस संघाचा ३८ धावांनी पराभव केला. पहिल्यांदा फलंदाजी करताना साई एमजे संघाने १८३ धावा धावफलकावर लावल्या. यामध्ये हृषीकेश याने १०९ चेंडूत ११ चौकारांसह ७९ धावांची खेळी केली. त्याला यश दराडे (२४ धावा) आणि अर्णव कुलकर्णी (२२ धावा) यांनी योग्य साथ दिली. याला उत्तर देताना पुणे पोलिस बॉईजचा डाव १४५ धावांवर मर्यादित राहीला. अश्वथचंद्र तोरा याने ५९ धावांची खेळी केली. साई एमजे संघाच्या आराध्य जोरी (३-२३), युग जाधव (२-२५) आणि श्रेयस वाघमोडे (२-३०) यांनी उत्तम गोलंदाजी करून संघाचा विजय साकार केला.

### शौरेन सोमण याला दुहेरी मुकुट

# रूचिता दारवटकर व तनया अभ्यंकर यांनाही विजेतपद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शारदा स्पोर्ट्स सेंटरतर्फे आयोजित केलेल्या शारदा ग्रुप व डेक्कन डाईज अँड केमिकल्स पुरस्कृत पहिल्या जिल्हा मानांकन टेबल टेनिस स्पर्धेतील मुलांच्या विभागात शौरेन सोमण याने दोन गटात विजेतपद पटकावित दुहेरी मुकुट मिळविला. मुलींच्या पंधरा वर्षाखालील गटात तनया अभ्यंकर तर सतरा वर्षाखालील गटात रुचिता दारवटकर हिने विजेतपद मिळविले.

ही स्पर्धा शारदा स्पोर्ट्स सेंटर येथे








पुणे जिल्हा टेबल टेनिस संघटनेच्या मान्यतेने सुरू आहे. या स्पर्धेतील मुलांच्या सतरा वर्षाखालील गटात तिसरे मानांकन असलेल्या शौरेन याने अंतिम सामन्यात अग्रमानातील खेळाडू प्रणव घोलकर याच्यावर ११-९,११-७,११-७ असा सफाईदार विजय मिळवला. त्याने फोरहँड टॉप स्पिन फटक्यांचा बहारदार खेळ करीत हा सामना सरळ तीन गेम्स मध्ये जिंकला. या सामन्यानंतर दहा मिनिटांनी झालेल्या पंधरा वर्षाखालील गटाच्या अंतिम फेरीत त्याने श्रेयस माणकेश्वर याच्यावर ११-४, ११-६,११-४ असा दणदणीत विजय नोंदविला. या सामन्यातही त्याने अव्वल मानांकनास साजेसा आक्रमक खेळ करीत निर्विवाद वर्चस्व गाजवले. तो एम्स अकादमीमध्ये नीरज घोलप यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करतो. तो सिम्बॉयसिस प्रशालेमध्ये दहाव्या इयत्तेत शिकत आहे.

मुलींच्या सतरा वर्षाखालील गटात द्वितीय मानांकित रुचिता दारवटकर विजेती ठरली तिने अंतिम सामन्यात अग्रमानांकित सई कुलकर्णी हिचा १२-१०,११-६,११-६ असा पराभव केला. तिने काउंटर अटॅक पद्धतीचा सुरेख खेळ केला. ती ओपन स्कूल योजनेतंर्गत दहाव्या इयत्तेत शिकत असून तिला इंडिया खेलेगा अकादमीत सन्मय परांजपे यांचे मार्गदर्शन

मिळत आहे. पंधरा वर्षाखालील गटात द्वितीय मानांकित तनया अभ्यंकर हिने अंतिम फेरीत चौथ्या मानांकित आद्या गवात्रे हिला ११-९,११-४,११-७ असे पराभूत केले. तिने अष्टपैलू खेळ केला. ती पीवायसी जिमखाना येथील टॉस अकादमी तिचे काका दीपेश अभ्यंकर यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करत आहे. ती सिंबायोसिस प्रशालेमध्ये नवव्या इयत्तेत शिकत आहे.

#रा